बँकेचे व्यवहार व साधनें

ग. कृ. भोपटकर

३/४६

बँकेचे व्यवहार व साधनें

लेखक

गणेश कृष्ण भोपटकर, एफ्. सी. आय्.
माजी प्रिन्सिपॉल, डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें, व महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें; माजी प्रोफेसर, टिळक महाविद्यालय, पुणें.

सुधारून वाढविलेली
आवृत्ति दुसरी

सन १९५२

किंमत अडीच रुपये

प्रकाशक
गणेश कृष्ण भोपटकर
$\frac{१२०६}{२६}$ अ, शिवाजीनगर, इंदिरानिवास,
पुणें नं. ४

मुद्रक
प्र. ज. पाध्ये
स्वाधीन मुद्रणालय,
१०१७ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

परमपूज्य कै० ती० वडील-मातोश्री
यांचे स्मृतीस

प्रस्तावना

बँका राष्ट्रांतील शिल्लक संचय एकत्रित करून त्यापासून निर्माण होणाऱ्या भांडवलाचा राष्ट्राची उत्पादनशक्ति वाढविणाऱ्या अशा उद्योगांत किफायतशीर व उपयुक्त विनियोग करतात अथवा केला जाण्यास उत्तेजन देतात म्हणून देशांतील उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस येण्यास बँकिंगच्या धंद्याच्या वाढीकडे जनतेनें उत्तरोत्तर अधिक लक्ष दिलें पाहिजे.

हिंदुस्थानांत बँकिंगचा धंदा बाल्यावस्थेंतच आहे. इतर प्रांतांच्या मानानें मुंबई इलाख्यांत बँकांची संख्या फार कमी आहे. समाईक भांडवलाच्या, सहकारी व लँड मॉर्गेज बँकांच्या विस्ताराला किती तरी वाव आहे व आणखी कितीतरी पटीनें बँकांची वाढ होण्याचीं फार आवश्यकता आहे. प्रत्यक्ष बँकिंग संस्थांची वाढ व्हावी का त्यांच्या कचेऱ्यांची (बँकिंग ऑफिसेस) वाढ व्हावी हा शास्त्रीय व वादग्रस्त विषय बाजूला ठेवून हल्लीं लोकसंख्येशीं बँकिंगच्या शहरानिहाय उपलब्ध असलेल्या सोयींचें जें प्रमाण पडत आहे त्याचा विचार करतां संस्था अगर कचेऱ्या कशाचीही कां होईना पण वाढ झाली पाहिजे इतकें खास.

बँकिंगच्या धंद्याची वाढ होण्यास सरकार, स्वतः बँकर्स व जनता या तिघांचें परस्परसहकार्य आवश्यक आहे. सरकारचें सहकार्य मध्यवर्ती बँकेमार्फत नाणेबाजारावर करण्यांत येणाऱ्या नियंत्रणद्वारें आणि या धंद्यांत दिवसेंदिवस जास्त जास्त पद्धतशीरपणा, चोखपणा नि सुरक्षितता राखिली जाईल व समाजाच्या हितास धोका पोंचणार नांहीं याबद्दल वाजवी खबरदारी घेतली जाईल असें घडवून आणणारी सरकारी नियंत्रणें, देखरेख व कायदेकानु करणें यांच्या द्वारें मिळत असते. बँकांनीं आपला व्यवसाय

चोखपणानें, खबरदारीनें, अनुभवी, तज्ञ, वाकबगार व निष्णात अधिकारी आणि नियामक मंडळाचे सल्ल्यानें, धोरणानें व देखरेखीखालीं चालवून जनतेला दिवसेंदिवस जास्त जास्त विश्वासांत घेऊन आणि विश्वास ठेवण्यास आपण पूर्णपणें पात्र आहोंत असें आपल्या चोख कारभाराचे अहवालावरून पटवून देऊन सहकार्य करावयाचें असतें. जनतेनें बँकांचे व्यवहार कोणकोणत्या प्रकारचे असतात, त्यांचीं साधनें काय आहेत, त्यांचा उपयोग कसा करावयाचा, आपापल्या व्यवसायाला बँकांपासून कोणकोणते फायदे अथवा उपयोग करून घेतां येतील याविषयीं माहिती संपादन करून प्राप्त होणाऱ्या ज्ञानामुळें दिवसेंदिवस बँकिंगच्या सोयीचा उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति वाढवून व बँकेशीं संबंध जडवून राष्ट्रांतील या फार महत्वाच्या धंद्याच्या वाढीशीं सहकार्य करावयाचें असतें.

जनतेचें सहकार्य ज्यावर अवलंबून आहे त्या बँकेच्या व्यवहारासंबंधीं व साधनासंबंधीं आवश्यक असणारी माहिती जनतेमध्यें प्रसृत करणें हा मूलभूत उद्देश धरून हें पुस्तक लिहिलें आहे. रुक्ष व कठीण समजल्या जाणाऱ्या अशा अर्थशास्त्रीय विषयांत मोडणाऱ्या या बँकिंगच्या धंद्याच्या विषयाची जितक्या सुलभतेनें मांडणी करतां येईल तितक्या सुलभतेनें ती करून अगदीं सामान्य वाचकालाही विषय रुक्ष न वाटून सहजसुलभ समजला जावा असा प्रयत्न करण्यांत आला आहे. पारिभाषिक शब्दांची योजना करणें कांहीं ठिकाणीं अपरिहार्य अगर अर्थाचा योग्य परिपोष करणारी वाटल्यावरून जरूर तेथें ते तसे, प्रसंगीं इंग्रजी उच्चारांतही, वापरले आहेत व कंसांत मराठी शब्द अगर अर्थ दिलेले आहेत. सर्वांच्या उपयोगी पडणारी पुष्कळ माहिती थोडक्यांत देण्याचा प्रयत्न पुस्तकांत केला आहे. ह्यांतील कित्येक भाग कांहींच्या परिचयाचा असला तरी त्यासंबंधीं सोपपत्तीक व कायदेशीर माहिती पुष्कळांना नसते असें आढळून

आल्यानें अशा लोकांनाही त्यांना पूर्वपरिचित असलेली माहिती रुचेल अशी आशा आहे.

मराठी भाषेंत व्यापारधंद्यांसंबंधीं माहितीचीं पुस्तकें फार थोडीं आहेत; व बँकिंगसारख्या विषयासंबंधीं तर हाताचे बोटांवर मोजण्याइतकींही नाहींत असें म्हटलें तरी चालेल. प्रस्तुत पुस्तकांत चर्चिलेल्या विषयासंबंधीं इंग्रजी भाषेमध्यें लिहिलेलीं परकीय व एतद्देशीय अशा ग्रंथकारांचीं पुस्तकें आहेत परंतु ज्यांना इंग्रजी येत नाहीं अशा समाजाकरितां मातृभाषेंतून लिहिण्यांत आलेलीं अशीं पुस्तकें जरूर आहेत. शिवाय इंग्रजीभाषेमध्यें लिहिलेल्या पुस्तकांवरून अपरिचित असा हा विषय समजणें जड जातें. मातृभाषेंतून लिहिलेल्या पुस्तकांचे आधारें इंग्रजींतील पुस्तकांचें परिशीलन केलें असतां तें सोपें जातें व जास्त उमगतें. या दृष्टीनेंही या पुस्तकाचा उपयोग होईलसें वाटतें. विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानाचे बाबतींत क्रमिक पुस्तक म्हणूनही या पुस्तकाचा उपयोग होऊं शकेल असें वाटतें. बँकेशीं व्यवहार करण्याबाबत जितकी व जशी माहिती पाहिजे तशी देणारें बँकेच्या गिऱ्हाइकाचे दृष्टीनें लिहिलेलें असें हें मराठी भाषेंतील पहिलेंच पुस्तक असावें असें वाटतें.

हें पुस्तक लिहिण्याचे कामीं मि. शेल्डन, प्रि. टॅनन व प्रो. दावर यांचें " लॉ अॅन्ड प्रॅक्टिस ऑफ बँकिंग, " मि. साईक्स यांचें बँकिंग अॅन्ड करन्सी, मि. स्टीड यांचें बँकर्स अॅडव्हान्सेस, प्रो. वा. गो. काळे यांचें " बँका आणि त्यांचे व्यवहार ", इम्पिरीयल गॅझीटीअर्स, टाइम्स प्रेसचें इंडियन इयरबुक, वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांतून आलेली माहिती आणि पुस्तकांत नमूद करण्यांत आलेल्या कित्येक संस्थांचे वार्षिक अहवाल, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे रिव्ह्यूज, वगैरे ग्रंथांचा व माहितीचा उपयोग झाला, त्याबद्दल त्या त्या ग्रंथकर्त्यांचा आणि संस्थांचा मी आभारी आहें.

बँकेचे व्यवहार व साधनें या माझ्या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति आज प्रसिद्ध होत आहे. आजतागायतच्या या विषयासंबंधींच्या सर्व महत्त्वाच्या घडामोडी लक्षांत घेऊन प्रस्तुत आवृत्तींत आवश्यक त्या सुधारणा आणि फेरफार करण्यांत आले असून जरूर अशी नवीन माहिती दिली आहे. त्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. विशेषतः पाठ्यपुस्तक म्हणून या पुस्तकाचा अलीकडे उपयोग होऊं लागल्यानें विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या दृष्टीनें व विद्यार्थिगणांच्या दृष्टीनें जरूर अशा बाबींचा परामर्ष या आवृत्तीमध्यें घेण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीनें प्रस्तुत आवृत्ति विशेष वाचनीय, मननीय व उपयुक्त वाटेल अशी खात्री आहे.

या दुसऱ्या आवृत्तिचे कामीं चि. अरविंद गणेश भोपटकर, बी. कॉम्. यांचें फार साहाय्य झालें, हें सकौतुक नमूद करीत आहे. तसेंच इतरही माझ्या सहकाऱ्यांच्या सूचना, सहकार्य व सहानुभूति याबद्दल आभार मानीत आहे.

मुद्रक श्री. प्र. ज. पाध्ये यांनींही तत्परतेनें व आस्थेवाईकपणानें छपाईचें काम करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानीत आहे.

कोणाकडून कांहीं सूचना यापुढें आल्यास त्यांचाही शक्य तो स्वीकार पुढील आवृत्तीचे वेळीं अवश्य करूं.

कार्तिक शु. १ शके १८७४
ता. १९ आक्टोबर १९५२ } गणेश कृष्ण भोपटकर

अनुक्रमणिका

बँकेचे व्यवहार व साधनें

प्रास्ताविक

कोणत्याहि राष्ट्रांतील व्यापारवृद्धीला पोषक आणि जरूर अशीं जीं अनेक साधनें आहेत त्यांपैकींच बँकिंग अथवा पेढीचा धंदा हें एक आहे राष्ट्रांत जितक्या जास्त प्रमाणांत बँका निघतील तितक्या जास्त प्रमाणांत व्यापार करण्यास खेळत्या भांडवलाचा पुरवठा होतो. व्यापाराला खेळत्या भांडवलाची गरज हरहमेश भासते आणि ही गरज बऱ्याच प्रमाणांत पुरी पाडणारी अशी जी ही बँक नांवाची संस्था, तिच्याशीं समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा संबंध असणें हितावह आहे. तिचा उपयोग काय, तिच्याशीं व्यवहार कसे करावयाचे याविषयीं प्रत्येक मनुष्यास माहिती असणें जरूर आहे.

उद्योग–धंद्यांत कायम स्वरूपाचें रूपानें भांडवल अगर पैसा गुंतविणें आपलें कार्यक्षेत्र नव्हे असें बँकांचें धोरण आहे व तें रास्तही आहे. कायम स्वरूपाचे भांडवलाचा पुरवठा करण्याकरितां इंडस्ट्रीयल फायनान्स कॉर्पोरेशनसारख्या संस्था असाव्या लागतात अगर असतात.

हिंदुस्थानांत पूर्वीपासून हा धंदा चालू आहे व तो सराफी पेढी या नांवानें प्रसिद्ध आहे. या पेढीचा जो धंदा तोच हल्लीं बँकिंग या नांवानें संबोधिला जात असून सध्या बऱ्याच विस्तृत प्रमाणांत व सुधारलेल्या पद्धतीवर केला जात आहे.

समाजांतील पैशांच्या ठेवी ठेवून घेणें व समाजास पैसा पुरविणें हें काम करणारी जी संस्था तिला बँक असें म्हणतात.

समाईक भांडवलांच्या तत्त्वावर कोणाहि कमींत कमी सात साधारणपणें ऐपतदार अशा गृहस्थांस अशा तऱ्हेचा बँकिंगचा धंदा करणारी संस्था

काढतां येते. या संस्थेचें मूळ भांडवल शेअर (भाग) काढून उभारतात. समाईक भांडवलाच्या कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें या संस्थेची नोंद सरकारांत करून घेतात. एका व्यक्तीलाहि बँकिंगचा धंदा करतां येतो. तसेंच दहापेक्षां जास्त भागिदार नाहींत अशा भागीदारी मंडळीलाही (फर्म) बँकिंगचा धंदा करतां येतो. मात्र सावकारी नियंत्रण कायदा अगर हिंदुस्थानचा बँकिंग कंपन्याबाबत १९४९ चा कायदा यातील तरतुदीस पात्र राहून धंदा केला पाहिजे.

बँकिंगचा जो रूढ अर्थ आहे अथवा जितक्या विस्तृत प्रमाणांत हा धंदा करावयास पाहिजे अथवा आधुनिक समाईक भांडवलाच्या बँका जितक्या प्रकारचे धंदे करतात तितक्या तऱ्हेचे धंदे एका व्यक्तीला अगर कांही थोडया व्यक्तींना पुरेशा भांडवलाचे अभावी–त्या धंद्यासाठीं लागणारी भांडवलाची गरज लक्षांत घेतां–करतां येणें फारच दुरापास्त असतें. बँकांच्या नानाविध धंद्यांपैकीं एखादा धंदा एका व्यक्तीला करतां येईल व त्याप्रमाणें तो हिंदुस्थानांत पूर्वापार चालूहि आहे. उदाहरणार्थ, जिनसांवर कर्जाऊ पैसे देणें अथवा कसर घेऊन हुंडया पटविणें वगैरे विशिष्ट प्रकारचे धंदे करणाऱ्या स्वतंत्र व्यक्ति अथवा पेढ्या पुष्कळ आहेत, परंतु आधुनिक बँकांचा जो सर्वांत मोठा धंदा–चालू खात्यावर ठेवी ठेवून घेणें व पैसे देणें–हा व्यक्तीला करणें फारच मुष्किलीचें आहे. राष्ट्राची वाढती गरज लक्षांत घेतां, मोठ्या प्रमाणांत हा धंदा चालू करणें अत्यंत आवश्यक आहे, व हें काम एका व्यक्तीला करणें दुरापास्त आहे. म्हणून आधुनिक प्रकारच्या बँकांचा प्रसार जितका जास्त होईल तितका होणें आवश्यक आहे. आणि हें समाजांत जितक्या जास्त प्रमाणांत बँकेशीं संबंध ठेवण्याची संवय (बँकिंग हॅबिट) वाढेल त्यावर अवलंबून आहे. अशी प्रवृत्ति वाढणें त्यासंबंधींच्या ज्ञान अगर माहितीच्या प्रसारावर अवलंबून आहे.

——

बँकांचे धंदे

बँका मुख्यत्वेंकरून खालीं दिलेले धंदे करतात :—

१. चालू खात्यावर ठेवी घेणें—करन्ट अकौंट.

२. मुदतीच्या ठेवी घेणें—फिक्स्ड डिपॉझीट.

३. संचय खात्यावर ठेवी घेणें—सेव्हींग अकौंट.

४. कसर घेऊन हुंडया पटाविणें—बिल्स डिस्काउंटिंग.

५. लोकांना त्यांच्या खात्यांवरील जमेपैकीं पैसे परत देणें, आणि कित्येक प्रसंगीं योग्य तारणावर खात्यावरील जमेच्या रकमेपेक्षां जास्त रक्कम काढूं देणें (ओव्हरड्राफ्ट).

६. लोकांतर्फे अडत्याचें काम करणें (to act as agents for others.)

७. कर्जाऊ रक्कम देणें.

यांखेरीज एक धंदा म्हणजे बँकेच्या नोटा काढणें. हा धंदा बहुधा देशांतील मध्यवर्ती बँक करते. हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेला अशा तऱ्हेच्या नोटा काढण्याचा अधिकार आहे.

बँकेचें उत्पन्न

बँकांच्या उत्पन्नाचीं कलमें म्हटलीं म्हणजे वरील सर्व बाबी होत. चालू खात्यावर ज्या ठेवी असतात त्यांपैकीं काढलेल्या रकमेवर—यास ' टर्न ओव्हर ' असें म्हणतात, म्हणजे काढलेल्या रकमांची एकंदर बेरीज—शेकडा चार आण्यांपासून सहा आण्यांपर्यंत बँक कमिशन घेते. चालू खात्यावर घेतलेल्या ठेवीवर बँक बहुतेक व्याज देत नाहीं. कारण या खात्यांत नेहमीं पैसे भरले जात असतात व काढले जात असतात, यामुळें व्याजाची आकारणी करणें फार त्रासदायक होतें व या खात्यावरील जमेच्या रकमा बँकेला दुसरीकडे फायदेशीर रीतीनें व्याजीं लावतां येत नाहींत; कारण त्यांची मागणी केव्हां होईल याचा नेम नसतो. तथापि

कित्येक बँका चालू खात्यांवर जी कमींत कमी बाकी कांहीं एक मुदतीपर्यंत राहिली असेल त्यावर व्याज देतात. यास मिनिमम बॅलन्स म्हणतात.

मुदतीच्या ठेवीवर बँक गिऱ्हाइकास व्याज देते. या व्याजाचा दर मुदतीवर अवलंबून असतो. जितकी जास्त मुदत तितका व्याजाचा दर मोठा असतो.

मुदत साधारण एक महिना, तीन महिने, सहा महिने व बारा महिने अशा प्रकारची असते. ज्या गिऱ्हाइकानें जी मुदत कबूल केली असेल त्या मुदतीपर्यंत अशा खात्यांतील रक्कम त्याला काढतां येत नाहीं. दुसरीहि एक मुदतीची अशी पद्धत असते कीं, कोणत्याहि प्रकारें मुदत निर्दिष्ट न करतां ही रक्कम केव्हांहि काढणें झाल्यास बँकेला सात दिवस, पधरा दिवस अथवा महिनाभर आगाऊ सूचना द्यावयाची असते. मुदत निर्दिष्ट केली असली तरी सुद्धां मुदत संपावयाच्या सुमारास बँकेला मुदत अमक्या दिवशीं संपत आहे अशा अर्थाची सूचना द्यावी लागते. जितकी जास्त मुदत तितका व्याजाचा दर अधिक असतो, परंतु मुदत जितकी थोडी असेल तितकें चांगलें. कारण जास्त मुदत कबूल केल्यानें बँकेच्या परिस्थितींत अपायकारक स्थित्यंतर झाल्यास अगर होत आहे असें दिसून आल्यास गिऱ्हाइकाला आपली रक्कम अडकवून बसणें भाग पडतें व जर कदाचित् बँक बुडाली तर नुकसान होण्याचा संभव असतो. करतां व्याजाचा दर कमी ठरला तरी पुरवला परंतु भांडवलाचा सुरक्षितपणा पाहणें जास्त हितावह आहे. याप्रमाणें या खात्यावर घेतलेल्या ठेवींपैकीं रकमा बँक दुसरीकडे गिऱ्हाइकाला देऊं केलेल्या व्याजाच्या दरापेक्षां जास्त दरानें व गिऱ्हाइकानें कबूल केलेल्या मुदतीपेक्षां कमी मुदतीनें व्याजीं देते व अशा तऱ्हेनें या दोन व्याजांच्या दरांमध्यें असणारा फरक ही बँकेच्या उत्पन्नाची बाब होय.

साधारण ऐपतीच्या लोकांना वरचेवर थोड्या थोड्या रकमा शिल्लक टाकून सांठवितां याव्या हा सेव्हींग बँकखात्याचा उद्देश असतो. या खात्यावर ज्या रकमा ठेवल्या जातात त्यापैकीं महिनाअखेरच्या कमीत कमी बाकीवर बँक गिऱ्हाइकास–खातेदारास–व्याज देते. व्याजाचा दर शेकडा दोन ते तीन टक्क्यांपर्यंत असतो. जास्तीत जास्त अमूक एका रकमेपर्यंतच्या शिलकेवरच व्याज दिलें जातें. अगदीं अल्प रकमेची ठेव ठेवून हें खातें सुरू करतां येतें. या खात्यांतून आठवड्याला फक्त एकदां अगर दोनदांच रक्कम काढतां येते. आठवडा साधारणतः सोमवार ते शनिवार असा समजला जातो.

बँक मुदतीच्या हुंड्या कसर घेऊन पटविते व ही कसर हें बँकेचें फायद्याचें कलम होय. समजा अला बकडून १०० रु. घेणें आहेत, व अला ते आज हवे आहेत; परंतु बजवळ १०० रु. नाहींत, तथापि ब तीन महिन्यांनीं देण्याचें कबूल करीत आहे. तेव्हां हें बचें वचन कागदावर लिहून घेऊन तो कागद–ज्याला हुंडी असें म्हणतात तो–अ बँकेला विकील, म्हणजे अ बचें वचन बँकेला विकतो व बँक हें वचन विकत घेते, आणि बनें ही कबूल केलेली रक्कम बँकेला तीन महिन्यांनीं भरावयाची असते. आतां या वचनाची आजची किंमत काय ठरणार ? तर बँक ज्या दरानें तीन महिन्यांच्या मुदतीनें १०० रुपये व्याजीं देत असेल त्या दरानें १०० रुपयांवरील तीन महिन्यांचें व्याज आकारून ती रक्कम हुंडीच्या रकमेंतून वजा करून बाकी राहिलेली रक्कम ही सदरहू हुंडीची आजची किंमत ठरेल व ती रक्कम बँक अला देईल. अशा तऱ्हेचे व्यवहार बँक नेहमींच करते व बँकेजवळच्या असंख्य द्रव्यनिधीमुळें तिला तें परवडतें व देशांतील लोकांचेंही मोठें काम होतें.

कलम पांचमध्यें दर्शविलेल्या धंद्यासंबंधीं जास्त लिहिण्यास पाहिजे असें नाहीं. तो सामान्य वाचकास सहज समजण्यासारखा आहे.

कलम सहामधील धंदा प्रत्येक बँक करिते. परराष्ट्रीय व्यापारासंबंधीं कांहीं माहिती हवी असल्यास बँक आणून देते. दुसऱ्या एखाद्या बँकेचा चेक आपण आपल्या बँकेकडे पाठविला असतां बँक त्या चेकचे पैसे त्या बँकेकडून वसूल करुन आपल्या खातीं जमा करिते. परंतु यापेक्षां जास्त महत्त्वाची कामगिरी बँकेकडून अडते या नात्यानें होते ती निर्यात व्यापारांत. परदेशांत माल पाठविल्यास सदरहू मालाची किंमत परदेशांतील गिऱ्हाइकाकडून वसूल करुन देते व या सर्व कामगिरीबद्दल बँक कांहीं कमिशन घेते.

कलम सातमधील धंदा प्रत्येक बँक करिते. कर्जाऊ देण्यांत येणाऱ्या रकमेवरील व्याज ही एक बँकेच्या उत्पन्नाची बाब होय.

बँकेंतील खात्यापासून फायदे

बँकेच्या व्यवहारासंबंधीं माहिती झाल्यावर आपल्या गांवीं बँक असल्यास त्या बँकेंत आपलें खातें असणें किती जरुरीचें आहे हें दिसून येईल. विशेषतः व्यापारी मनुष्याला बँकेंत खातें ठेवल्यानें फार फायदे होतात. एक तर दुकानांत देवघेवीमुळें अथवा अन्य कारणानें येत असलेल्या मोठमोठ्या रकमा संभाळण्याची जबाबदारी दूर होते. ह्या रकमा रोज अथवा आठवड्यांनीं बँकेंत आपल्या खातीं नेऊन भरल्या असतां, त्यांवर व्याज मिळून सुरक्षितपणा साध्य होतो.

एखाद्या गांवी अथवा देशांतील कोणत्याहि भागांत पैसे पाठविणें असल्यास केवढीहि मोठी रक्कम तिची मोजदाद वगैरे त्रास न करतां एका लहानशा कागदाच्या आधारे—ज्याला चेक म्हणतात—आपणांस पाठवितां येते. चेकनें दिलेल्या रकमेसंबंधीं विश्वसनीय असा पुरावा मिळतो.

आपलें खातें असण्यांत हुंडयांवर वेळोवेळीं कसर देऊन रोकड रक्कम आपल्या बँकेकडून आपणांस मिळूं शकते अथवा बँकेच्या पसंतीच्या दुसऱ्या एखाद्या तारणावर आपणांस कर्जाऊ रकमा मिळूं शकतात.

आपल्याला गिऱ्हाईकांकडून आलेल्या निरनिराळ्या बँकांवरील चेक तसेंच हुंडया आपल्या खातीं जमा करण्यास आपल्या बँकेकडे पाठविलीं असतां त्या चेकच्या अगर हुंडीच्या रकमा निरनिराळ्या ठिकाणांहून बँक वसूल करते व आपल्या खातीं जमा करून घेते.

आपली पत वाढण्यास अथवा आपल्या पतीविषयीं विचारपूस कोणास करावयाची झाल्यास बँकेंत खातें असल्यानें आपल्याला आपल्या बँकेकडे बोट दाखविण्यास जागा असते. त्याचप्रमाणें दुसऱ्या देशांतील लोकांच्या पतीसंबंधीं विचारपूस करणें झाल्यास आपल्या बँकेचा आपणांस उपयोग करून घेतां येतो.

आपले महत्त्वाचे कागदपत्र अथवा मूल्यवान वस्तु सुरक्षित ठेवण्यास बँक ही उत्तम जागा आहे. परदेशांतील व्यापारी बातम्या, परदेशीं रकमा पाठविणें अगर परदेशांतून येणाऱ्या रकमा वसूल करणें, स्वदेशांत अगर परदेशांत सरकारी कर्ज रोख्यांतून अगर अन्य तऱ्हेनें रकमा व्याजीं लावणें वगैरे संबंधांत लागणारी सर्व माहिती व मदत बँकेकडून आपणांस मिळूं शकते. एकंदरींत बँकेंत खातें चालू केल्यानें स्वतःचे अनेक फायदे आहेत व त्याचप्रमाणें राष्ट्रीय व्यापारास फारच महत्त्वाची व पोषक अशी या संस्थेची वाढहि राष्ट्रांतील लोकांस बँकेशीं वारंवार संबंध ठेवण्याची संवय झाल्यानें होते. सदरहू माहितीवरून एखाद्यास बँकेंतील खातें चालू करावयाचें झाल्यास काय करावें लागतें हें समजण्याची इच्छा होणें साहजिक आहे.

खातें चालू कसें करावयाचें ?

एखाद्या व्यक्तीस जेव्हां खातें चालू करणें असेल तेव्हां त्यानें बँकेच्या माहितीच्या एखाद्या गृहस्थाचें शिफारसपत्र घेऊन बँकेच्या अधिकाऱ्याची समक्ष गांठ घ्यावयाची असते. शिफारसपत्र नसल्यास बँक कोणाहि ऐपतदार अशा दोन गृहस्थांची ओळख विचारते. निरनिराळ्या बँकांत शिफारस व ओळख यासंबंधानें भिन्न भिन्न प्रकार आहेत. परंतु एकंदरींत ज्याचें खातें चालू करावयाचें त्या गृहस्थासंबंधीं प्रत्येक बँक बरीच सावधगिरी ठेवते. कारण गिऱ्हाइकाजवळ बँकेचे चेकबुक द्यावयाचें असतें व या चेकचा दुरुपयोग न करणाऱ्या अशा लोकांशीं व्यवहार करण्याचा बँकेचा रोख असतो.

ज्या प्रकारच्या ठेवीसंबंधीं खातें उघडावयाचें असेल त्याबाबत खातें उघडतेवेळीं करावयाचा लेखी अर्ज भरून घ्यावयाचा असतो. याचा नमुना बँकेकडून मोफत पुरविण्यांत येतो. यांत आवश्यक ती माहिती विचारण्यांत आलेली असते. सदर अर्जांत एके ठिकाणीं नमुन्यादाखल सही (स्पेसीमेन सिग्नेचर) करावयाची असते. अशीच सही आणखी एका कार्डावर अगर जाड कागदावर घेण्यांत येते व ते कार्ड बँक आपल्याजवळ ताबडतोब हातीं येईल अशा तऱ्हेनें वेळप्रसंगीं पहाण्याकरितां म्हणून ठेवून देते. कांहीं बँका याच कामीं मुद्दाम राखून ठेवलेल्या बँकेच्या बुकांत—ज्यास ऑटोग्राफ बुक असें म्हणतात त्यांत—नमुन्यादाखल सही घेतात. या नमुन्याच्या सहीबरहुकूम सही चेकवर करावयाची असते. म्हणून खातेदारानें आपल्या नेहमींच्या सहीच्या पद्धतीप्रमाणें यांत सही करावी. बँकेकडे ज्या नमुन्याची सही दिली असेल तशीच सही दुसऱ्या एका कागदावर त्याच वेळीं करून आपल्या स्मरणार्थ स्वत:जवळ ठेवावी. म्हणजे वेळप्रसंगीं आपणास ती आपल्या घरीं तपासून पहातां येईल.

खातें उघडतेवेळीं करावयाच्या अर्जाचा नमुना

राष्ट्रीय बँक, पुणें, यांसी—

विनंती विशेष:—आपले बँकेंत माझें/आमचे नांवानें चालू/सेव्हींग कायम ठेवीचें खातें उघडावें. त्यासाठीं सोबत मी/आम्ही रु.———— आपले बँकेंत भरीत आहे/आहों. ठेवींबाबतचे बँकेचे वेळोवेळीं अमलांत असणारे नियम मजवर/आम्हांवर बंधनकारक असून त्याप्रमाणें वागण्याचें मी/आम्ही कबूल करतों.

सदर खातें श्री.———————————— ह्यांना चालविण्याचा अधिकार असून, आम्हांपैकीं कोणीही मयत झाल्यास खात्यावरील बाकी मागें हयात रहाणाऱ्या व्यक्तीस / व्यक्तींना द्यावी. (हा मजकूर जोडनांवें खातें असेल तेंव्हां भरावयाचा.)

द. सा. द. शें.———— टक्के व्याजानें ———— मुदतीनें रक्कम ठेऊन घेऊन ठेवीची पावती द्यावी. (हा मजकूर कायम ठेव ठेवताना भरावयाचा.)

माझें / आमचे उपयोगासाठीं आपल्या बँकेचे पासबुक व चेकबुक द्यावें. माझी / आमची नमुन्याची सही खालीलप्रमाणें आहे. (हा मजकूर चालू अगर संचयखातें उघडणाऱ्यांनीं भरावयाचा.)

आपला / आपले

खातें ज्या नांवानें राहावयाचें तें सही————————

पूर्ण नांव————————————

————————————

धंदा————————————

पत्ता————————————

——

फक्त संस्था, भागीदारी मंडळ्या (फर्म्स) अगर लिमिटेड कंपन्यांबाबत भरण्यासाठीं :—

संबंधित अधिकारी, भागीदार, डायरेक्टर, एजंट, वगैरेपैकीं जो/जे खातें चालविणार असतील म्हणजे चेकवर सह्या करणार असतील त्यांचीं नांवें येथें देणें व त्यासमोर त्यांची नमुन्याची सही देणें.	नमुन्याच्या सह्या

——

शिफारस:—

वरीलप्रमाणें खातें सुरू करण्याची आमची शिफारस आहे,

ता.________

सही________

पत्ता________

याप्रमाणें लेखी माहिती दिल्यानंतर खात्यावर ठेवावयाची ठेव बँकेच्या स्वाधीन केली म्हणजे बँक त्याबद्दल पावती देते. या पावतीवर मुदतीची ठेव असल्यास व्याजाचा दर व ठेवीची मुदत निर्दिष्ट केलेली असतात. बँक तीन प्रकारच्या ठेवी घेते. एक मुदतीची, दुसरी चालू खात्यावर व तिसरी सेव्हींग (संचय) खात्यावर. खातें सुरु करण्यास कमींत कमी अमुक एक रक्कम प्रथम बँकेकडे भरली पाहिजे. सदरहू ठेवीवर कोणत्या शर्तींवर व दरानें व्याज आकारलें जाईल वगैरे बाबींचा खुलासा प्रत्येक बँकेकडून गिऱ्हाइकाला आरंभींच सांगण्यांत येतो.

साधारणत: ही माहिती बँक आपल्या जाहिरातींत देते. ही आरंभीं ठेवावी लागणारी रक्कम फक्त खातें सुरूं करण्यापूर्वींच असते. नंतर नेहमीं एवढी रक्कम खात्याला बाकी ठेविली पाहिजे असें नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या बँकेंत खातें सुरूं करण्यास कमींत कमी १०० रुपये लागतात

अशी अट आहे. म्हणजे आरंभीं एवढी रक्कम भरून खातें सुरू करावयाचें व मग जरी यांपैकीं ७५ रुपये काढून नेले व बाकी २५ रु. च ठेविले तरी चालतें. बँक आपल्या नियमांच्या पुस्तकांत असें सुचवितें कीं, ही कमींत कमी रक्कम साधारणतः खात्याला नेहमीं असूं द्यावी. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, त्याच्या खालीं आंकडा जाऊं दिला जाणार नाहीं. बँकेच्या सूचनेचा संबंध फक्त व्याजाच्या दराशीं असतो. वरील कमींत कमी रकमेच्या खालीं खात्याची बाकी रक्कम गेली तर फक्त व्याजाची आकारणी होणार नाहीं व कदाचित् कांहीं कमिशन, चार्ज अगर लेजर फी म्हणून आकारणीही बँक करील.

दोघांचे नांवानें खातें उघडावयाचें असल्यास तसेंही करतां येतें; मात्र अशा बाबतींत दोघांपैकीं चेकवर सही कोणाची व कशी असेल अथवा दोघांची असेल आणि दोघांपैकीं एखादा मयत झाल्यास पुढें खात्याचा व्यवहार कसा केला जाईल वगैरेबाबत स्पष्ट खुलासा करावा लागतो.

भागीचीं दुकानें (फर्म्स) यांना खातें उघडतेवेळीं करावयाच्या अर्जांत खालीं भागीदारांचीं नांवें द्यावीं लागतात. तसेंच त्यांच्यापैकीं दुकानातर्फे चेकवर जे सही करणार असतील ते ती सही कशी करतील त्याचा नमुनाही द्यावयास पाहिजे. सर्व भागीदारांची याप्रमाणें खातें उघडण्यास व चालविले जाण्यास संमती असलेबद्दल सर्वांच्या सह्यांचा अलाहिदा लेख खाते-अर्जासोबत जोडला पाहिजे. भागीदारांपैकीं एखादा भागीदार नादार ठरला तरी दुकानच्या बँकेंतील खात्याबर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं आणि नादार भागीदाराच्या ट्रस्टींना बँकेंतील दुकानच्या मालमत्तेला हात लावतां येत नाहीं. तसेंच एखादा भागीदार मयत झाल्यास त्याचाही परिणाम बँकेंतील दुकानच्या खात्यावर होत नाहीं. इतकेंच नव्हे तर मयतानें हयातींत सोडलेला चेक त्याच्या मरणानंतर बँकेकडे वटविण्यास आला तरी तो नेहमींप्रमाणें पटविला जाईल.

समाईक भांडवलाच्या कंपनीला (जॉइंट स्टॉक कंपनी) खातें उघडतेवेळीं आपल्या घटनेची (मेमोरँडम् व आर्टिकल्स्) एक प्रत बँकेला घ्यावी लागते. तसेंच मॅनेजिंग डायरेक्टर, डायरेक्टर, मॅनेजिंग एजन्ट, मॅनेजर अगर दुसरा एखादा अधिकारी जो कंपनीतर्फे चेकवर सही करणार असेल त्याची नमुन्याची सही घ्यावी लागते. कंपनीच्या डायरेक्टरांच्या सभेंत बँकेंत खातें उघडण्यासंबंधीं व तें कोणी चालवावें (ऑपरेट) यासंबंधीं ठराव करावा लागतो व त्याची खरी नक्कल प्रत डायरेक्टरांच्या सभेच्या चेअरमनचे सहीनें बँकेकडे खातें उघडण्याबाबतच्या अर्जासोबत दाखल करावी लागते.

अज्ञानाला आपल्या नांवानें परंतु आपल्या पालक अथवा ट्रस्टीमार्फत खातें उघडतां येतें.

तर्फे सही करीत असतांना व्यक्ति, दुकान अगर कंपनी, जसें असेल तसें, याचें नांव व सही करणाराचा हुद्दा घ्यावा लागतो. उदाहरणार्थ— स्वदेशी माल प्रसारक कंपनीतर्फे अरविंदराव, मॅनेजिंग डायरेक्टर.

— —

डायरेक्टरांच्या ठरावाचा नमुना

" असें ठरविण्यांत यावे व येत आहे कीं ________ कंपनीच्या नांवानें व करितां ________ ______ बँक लि. ______ शहर, मध्यें एक चालू/संचयखातें उघडण्यांत यावे, आणि त्या खात्यावर काढण्यांत येणाऱ्या सर्व चेक्सवर ________ कंपनीतर्फे व करितां ________ यांनीं नमुन्याबरहुकूम सही करावी. तसेंच सर्व निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ________ कंपनीकरितां व तर्फे म्हणून ________ यांचे सदर नमुन्याबरहुकूम सहीनें काढलेली,

स्वीकारलेली अगर बेची केलेली असतील; आणि सदर बँकेला असा अधिकार देण्यांत यावा व येत आहे कीं अशा तऱ्हेनें त्यांचेवर काढण्यांत येणारे सर्व चेक्स् सदर खात्याला त्यांनीं खर्ची (डेबीट) घालावे आणि ज्या कांहीं हुंडया, ड्राफ्टस्, बिलें, चेक्स्, वगैरे त्यांचे नांवानें बेर्चा करून अगर अन्य तऱ्हेनें वसुलीकरितां त्यांचेकडे हवाली करण्यांत आली असतील त्याचे पैसे वसूल करून ते सदर खातीं त्यांनीं जमा करावे.''

बँकेंत पैसे भरण्याची व काढण्याची पद्धति

खाते चालू केलें म्हणजे प्रत्येक खातेदारास बँक ३ पुस्तकें देते. तीं येणेंप्रमाणें:—

(१) पासबुक (खाते उतारा पुस्तक) (२) पेइंग इन बुक अथवा क्रेडिट स्लिप (चलन) बुक, व (३) चेकबुक.

पासबुक

या पुस्तकांत खातेदाराच्या बँकेत असलेल्या खात्याचा उतारा बँक दर महिन्यास करून पाठविते. दर महिन्याअखेरीस हें पुस्तक बँकेकडे पाठवून लिहून आणवावें व त्यांत आपले खाती जमेला व नांवेला दाखविलेल्या रकमा बरोबर आहेत किंवा नाहींत हें आपल्या येथें असलेल्या बँक खात्याशीं पडताळून पाहावें. कांहीं चूक आढळल्यास बँकेकडें तावडतोब कळवावे. या बुकांत खातेदारानें कांहीं खोडावयाचें अगर लिहावयाचें नसते. कसल्याही खुणा करूं नयेत. दर साहामाहिला बँकेकडून खातेदारास त्याचे खाती अमुक एक तारखेला किती शिल्लक आहे ते कळविण्यांत येते व त्याची रुजूवात देण्यास सांगण्यांत येते. खातेदाराकडून कांहीं चूक दाखविली न गेल्यास दाखविलेली शिल्लक—बाकी त्यास मान्य असल्याचें समजले जाते.

क्रेडिट स्लिप बुक

या पुस्तकांत २०, २५, ५० अशीं पानें असतात. ब्यांकेमध्यें आपल्या खात्यावर जमा करण्याकरितां वेळोंवेळीं पाठविल्या जाणाऱ्या रकमांबरोबर यांतील एक एक पान भरून पाठवावयाचें असते. यांत आपण जमेकरतां पाठवीत असलेली रक्कम अक्षरीं व आंकड्यांत भरावयाची असते. त्याचप्रमाणें या रकमेची फोडही त्यांतील रकान्यांत भरावयाची असते. उदाहरणार्थ आपण १००० रु. आपले खातीं भरणा केले आहेत. तर हे १००० रुपये कशा प्रकारांत आहेत हें दर्शविण्याचें असतें. रोकड रु. ३००, नोटा रु. ७०० च्या एकूण रु. १००० येणेंप्रमाणें. त्याचप्रमाणें सदरहू रक्कम ब्यांकेनें खातेदाराच्या कोणत्या खात्यावर जमा करावयाची याबद्दल सूचना द्यावयाची असते. भरणा करण्यांत येणारी एकूण रक्कम सर्व रोकड नसून कांहीं रोकड व कांहीं चेक्स् अगर हुंड्या अशांची मिळून असेल तर रोकडी करितां एक चलन व चेक्स, हुंड्या, करितां निराळे एक चलन अशीं दोन चलनें भरावी लागतात.

पुढील नमुन्यांत दर्शविल्याप्रमाणें जरूर ती माहिती भरून चलन बँकेकडे पाठवावयाचे असते व त्याची नक्कल आपल्या येथें सदरहू क्रेडिट स्लिपलाच जोडून असलेल्या भागांत उतरवून ठेवावी. या जोड भागाला काउन्टर पार्ट अथवा काउन्टर फाईल असें म्हणतात. बँकेत भरणा करतेवेळीं हा सर्व काऊन्टर फाईलसह फॉर्म बँकेत द्यावयाचा असतो. बँक त्याप्रमाणें भरणा स्वीकारून काऊन्टर फाईलवर आपला रबरी शिक्का मारून चलन बुक परत करते. हीच पोंच-पावती समजावयाची.

वर दिलेलीं दोन्ही पुस्तकें गिऱ्हाइकाला बँकेकडून मोफत मिळतात.

चेक बुक

बँकेकडून गिऱ्हाइकाला मिळणारें तिसरें पुस्तक म्हणजे चेक-बुक होय. यांत २०, २५, ५० असे चेक असतात. हें पुस्तकहि गिऱ्हाइकांस मोफत

क्रेडिट स्लिपचा नमुना–भरणा चलन

रोख रक्कम व चेक यांना निरनिराळीं चलनें करावींत.

राष्ट्रीय बँक

क्रमांक
खाते नंबर

ता.______________

तपशील	रक्कम		
	रु.	आ.	पै
नाणें			
नोटा			
चेक्स			
हुंड्या			
बिल्स			
एकूण			

______________________ या

खातीं जमा करण्याकरितां रक्कम रुपये (अक्षरी)

____

पाठविली आहे ती चालू/संचय खातीं जमा करून

घेणें.

सही______________________

(भरणा करणार)

देण्यांत येतें. जातीनें अगर अर्जद्वारे मागणी केल्यास चेक बुक मिळते. नवीन चेक बुकाची मागणी करावयाची ती पहिल्या चेक बुकांत असणाऱ्या छापील चेक-अर्ज फॉर्मवरच केली पाहिजे.

बँकेतून चालू अगर सेव्हींग खात्यातील रकमेपैकीं पैसे काढणें झाल्यास ते चेकचे आधारें काढावयाचे असतात. कोठल्याहि कागदावर चेकप्रमाणें बँकेला आपल्या खात्यांतून पैसे देण्याला हुकूम केला तर तें जरी कायदेशीर आहे तरी तें या धंद्याच्या प्रस्थापित पद्धतीला अनुसरून नसल्यानें चालत नाहीं. खातेदाराचे बँकेंत पैसे शिल्लक असेपर्यंत जितके पैसे असतील तेवढ्या प्रमाणांत त्याचें बँकेशीं सावकाराचें नातें असतें आणि म्हणून त्याला आपल्या खात्यावरील जमेपैकीं पैसे वेळोवेळीं बँकेकडून मागतां येतात; ही मागणी करावयाच्या कामीं जो एक विशिष्ट कागद वापरावयाचा असतो त्याला चेक असें म्हणतात. म्हणून चेक म्हणजे गिऱ्हाइकानें आपल्या बँकेला त्याचे खात्यांतून अमुक इतकी रक्कम अमक्या एका इसमाला देण्याविषयीं केलेला हुकूम होय.

चेक काढणारा जो मनुष्य त्याला इंग्रजींत 'ड्रॉअर' (खातेदार) असें म्हणतात व ज्यावर काढला त्यास ड्रॉई म्हणजे चेकचे पैसे देणारी बँक असें म्हणतात व या चेकचे पैसे ज्यास द्यावयाचे असतात त्यास 'पेई' म्हणजे पैसे घेणारा असें म्हणतात. म्हणजे प्रत्येक चेकशीं तीन असामींचा संबंध येतो. तथापि कित्येक प्रसंगीं यांतील ड्रॉअर व पेई हे एकच असूं शकतात व अशा वेळीं चेकवर पेईचें नांव घालावयाचे ठिकाणीं 'सेल्फ' (स्वतःलाच) असे लिहितात. चेकबुकाचे दोन भाग असतात. यांपैकीं डाव्या बाजूचा अथवा लहान भाग याला 'काउन्टर फाईल' असें म्हणतात व उजव्या बाजूचा अथवा मोठा भाग याला 'चेक' असें म्हणतात. या दोन भागांमध्यें टांचणीनें पाडलेल्या भोंकाप्रमाणें भोंकांची सरळ रेषा असते. चेकवर जरूर ती नोंद भरून झाली म्हणजे ती स्वतःच्या

माहितीकरतां म्हणून काउन्टर फाईलवर नोंदून नंतर तो चेक या रेषेच्या ठिकाणीं फाडून पेईला द्यावयाचा असतो.

बेअरर व ऑर्डर चेक

पुढील नमुन्यांत बेअरर व ऑर्डर असे दोन शब्द ओळ नं. १ च्या शेवटीं आहेत. त्यांपैकीं कोणता तरी एक शब्द कायम ठेवून दुसरा खोडून टाकावा. बेअरर हा शब्द ठेवला तर ओळ नं. १ वर लिहिलेल्या नांवाचा अगर दुसरा कोणीही जो तो चेक बँकेकडे घेऊन जाईल त्याला सदरहु चेकमध्यें लिहिलेली रक्कम त्याची सही घेऊन बँक देईल. यावरून एखादा बेअरर चेक चुकून खिशांतून पडला तर ज्याला सांपडेल त्याला चेकाची रक्कम बँकेकडून घेतां येईल. यावरुन हे चेक फार जोखमीचे असतात. तेव्हां होतां होईल तों बेअरर चेक काढूं नये. वरीलपैकीं दुसरा शब्द ' ऑर्डर '. याचा अर्थ असा कीं, ज्या इसमास पैसे द्यावे असा हुकूम बँकेला दिला आहे त्यालाच अगर तो इसम दुसऱ्याला ज्याला द्यावे असा लेखी हुकूम करील त्यालाच बँकेनें पैसे द्यावयाचे असतात. सर्वसाधारण ऑर्डर चेकच नेहमीं काढतात. कारण या चेकवर प्रत्येक हुकूम देणाऱ्या इसमास आपली सही करावी लागते व ज्याला ते पैसे मिळावे असा हेतू असतो त्याचें नांव त्यावर घालावयाचे असतें. पुन्हां पैसे घेतेवेळीं जो इसम तो चेक वटविण्यास देत असतो त्याची सही चेकचे मागील बाजूस घेण्यांत येते. त्याला बँकेच्या माहितीच्या एखाद्या इसमाची ओळख द्यावी लागते. ओळ नं. १ च्या शेवटीं असलेले दोन्ही शब्द चुकून खोडले गेले तर बँक असा चेक " ऑर्डर चेक " आहे असें धरून चालतें. वरील दोन प्रकारच्या शब्दामुळें या चेकांना बेअरर, ऑर्डर, चेक अशीं नांवे पडली आहेत.

चेकचा नमुना

काउन्टर फाईल	राष्ट्रीय बँक
नं. ______	नं. तारीख ______
______	
______	पे ______ बेअरर ऑर ऑर्डर
______	
______	रुपये (अक्षरी) ______
रु. ______	रु. ______
	सही (खातेदार)

चेकमध्यें भरावयाच्या बाबी

चेकमध्यें भरावयाच्या मुख्य चार बाबी आहेत. प्रथम तारीख. ही नेहमीं ज्या दिवशीं चेक काढला त्या दिवसाची असावी. अशा चेकला डयूडेटेड चेक असें म्हणतात. त्यापूर्वीची तारीख असली म्हणून कांहींएक हरकत नाहीं. कारण कोणताही चेक त्यावरील तारखेपासून कायद्यानें तीन वर्षे-पर्यंत चालूं शकतो. तथापि प्रघात असा आहे कीं, ज्या चेकवरील तारखेपासून सहा महिन्यापेक्षां जास्त मुदत होऊन गेली आहे, त्या चेकचे पैसे बँक देत नाहीं व अशा चेकच्या मागें ' स्टेल ' (शिळा) असा शेरा करून बँक चेक परत करते. अशा चेकला ' ॲन्टीडेटेड ' चेक असे म्हणतात. आपणाला एखाद्यानें आपल्या नांवाचा चेक दिला तर होईल तितकें करून त्याची रक्कम ताबडतोब घ्यावी. कारण फार दिवस आपल्याच-जवळ चेक ठेवल्यास व दरम्यान बँक बुडाल्यास अथवा खातेंदारानें आपले बँकेंतील सर्व पैसे काढून घेतल्यास आपलें नुकसान होण्याचा संभव असतो.

चेकवर चेक काढला जाणाऱ्या तारखेऐवजीं पुढील कोणती तरी तारीख घातली गेली तर त्या चेकचे पैसे ती तारीख येईपर्यंत बँक देणार नाहीं. अशा चेकला " पोस्ट डेटेड " चेक असे म्हणतात.

तारीख घालावयाचीच राहून गेली तर बँक होतां होईल तों तारीख घालून घेऊन पैसे देते. पण कित्येक प्रसंगीं तारीख नसल्यास चेकवर अपुरा (Incomplete) असा शेरा करून चेक परत दिला जातो.

दुसरी बाब म्हणजे पेईचें (पैसे ज्यास देऊं केलें आहेत त्याचें) नांव घालणें. वरील नमुन्यांत दाखविलेल्या ओळ नंबर १ वर पेईचें नांव घालून पुढील बेअरर अथवा ऑर्डर हा शब्द खोडून टाकावयाचा असतो.

ओळ नंबर दोनवर चेकची रक्कम अक्षरीं लिहावयाची असते व ओळ नंबर ३ वर सदरहु रक्कम आंकडयांत भरावयाची असते. चेकवर लिहा-

वयाची रक्कम निश्चित असली पाहिजे. "माझ्या खात्याला असणारी बाकी ध्यावी" अगर "तो मागेल तितके पण पांचशेंपेक्षां जास्त नाहीं इतके रुपये द्यावे" अशा अर्थाचीं वाक्यें ज्या चेकवर असतील तो कागद कायद्यानें चेकच्या व्याख्येंत बसूं शकत नाहीं. लिहिण्यांत येणाऱ्या शब्दांमध्यें फार अंतर सोडण्यांत येऊं नये. तसेंच खोडाखोडी केलेली असूं नये. झालीच असल्यास अगर करावीच लागत असल्यास त्याखालीं पुन्हा सही करावी. यानंतर सहीच्या जागीं खातेदारानें आपली नमुन्याच्या सहीप्रमाणें सही करून हा चेक ज्यास देऊं केला असेल त्यास देऊन टाकावा.

बँकेंतून पैसे आणण्याची पद्धति

ज्या इसमाच्या नांवाचा चेक असेल त्यानें स्वत: अगर त्याचे तर्फे दुसऱ्यानें हा चेक ज्या बँकेवर अगर बँकेच्या शाखेवर तो काढिला असेल त्या ठिकाणीं जाऊन बँकेच्या कारकुनास दाखवावा. तत्पूर्वी चेकचे मागील बाजूवर पैसे मागणाऱ्या अगर चेक दुसऱ्यास देऊं करणाऱ्या इसमानें आपली चेकच्या मुखपृष्ठावर लिहिलेल्या नांवाबरहुकूम सही करावयाची असते. चेक ज्याच्या खात्यावर पटविला जावयाचा असेल त्याचे खाते काढून चेकमध्यें लिहिलेली रक्कम देण्याइतकी शिल्लक बाकी आहे किंवा नाहीं हें कारकून पाहतो. त्याचप्रमाणें चेकवरील सर्व मजकूर व्यवस्थेशीर आहे किंवा नाहीं हें तपासून पाहतो. सर्व ठीक आहे असें दिसल्यास चेक घेऊन येणाऱ्या इसमास टोकन (खूण) म्हणून एक नाण्याच्या आकाराची वस्तु देण्यांत येते. नंतर बँकेंतील कारकून आपल्या वरिष्ठास चेक दाखवून त्यावर 'चेकचे पैसे द्यावेत' अशा अर्थाचा शेरा मारतो व पैसे मोजणाऱ्या कारकुनाकडे देतो. तो सही करणाऱ्या इसमास पुकारून टोकन परत घेतो व पैसे देतो. पैसे पोंचल्यादाखल चेकचे मागें सही करणें अथवा चेकचे पैसे दुसऱ्या इसमास देऊं करण्यादाखल त्या इसमाचें नांव चेकचे मागील

बाजूस लिहून त्याखालीं स्वतःची सही करणें, जसें ना. स. मोडक यांस अगर ते सांगतील त्यांस देणें, यास एन्डॉर्समेंट (पावतीदाखल अगर नामांतरादाखल सही) असें म्हणतात.

वर लिहिल्याप्रमाणें एन्डॉर्समेंट या शब्दांत पावतीदाखल सही असाही अर्थ आहे. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें अथवा कायद्याप्रमाणें २० रुपयांवरील रकमेची पोंच देतांना एक आण्याचें तिकीट लावून पोंच दिली पाहिजे परंतु या ठिकाणच्या पोंचीला तिकीट लावणें जरूर नाहीं.

चेकचे मागील बाजूस करावयाची सही चेकचे दर्शनी भागावर दिलेल्या नांवाबरहुकूम असली पाहिजे. उदा.—वे कोल्हटकर ऑर ऑर्डर असा शेरा असला व कोल्हटकर ह्या शब्दाचे स्पेलिंगांत शेवटीं "कर" याचें दर्शक इंग्रजी के ए आर असले तर कोल्हटकर यांनीं आपली सही करतांना शेवटीं के ए आर असेंच लिहिलें पाहिजे. ते नेहमीं लिहितांना जरी के इ आर असें लिहीत असले तरी या ठिकाणीं के ए आर असेंच लिहिले पाहिजे. दुसरें उदा.—वे लक्ष्मीबाई असा शेरा असल्यास मागील बाजूची सही लक्ष्मीबाई अशीच असली पाहिजे. लक्ष्मुंबाई अशी चालणार नाहीं. करण्यांत येणारी सही मराठी अगर मोडींत असली तरी बँक पत्करते. परंतु सदर सहीचें इंग्रजींत भाषान्तर त्याखालीं द्यावें लागतें व त्यांतील स्पेलिंग चेकवरील नांवाच्या स्पेलिंगशीं बरोबर जुळतें असलें पाहिजे. सहीच्या या साम्यतेच्या किचकट प्रकारामुळेंच कित्येक लोक आधुनिक प्रकारच्या बँकेशीं व्यवहार करण्याचें टाळतात. पण कायद्यानें त्याचप्रमाणें व्यावहारिक दृष्ट्याही बँकांना अशी दक्षता घेणें जरूर आहे. तरी लोकांनीं ही पद्धत समजून घेऊन तसें वागणें जरूर आहे. नाहींपेक्षां कायद्यांत जरूर तो फरक करून घेऊन सुलभता आणावी. परंतु आपण व बँकर यांचेमध्यें हा अथवा इतर दुसरा कोणता मुद्दा यावर एकवाक्यता

नाहीं म्हणून बँकेशीं असहकारिता करून चालणार नाहीं. बँक ही संस्था वाढीस लागणें अत्यंत अवश्य आहे. बँकेनेंही आपल्या धंद्यांतील निरनिराळ्या प्रकारांची समजूत गिऱ्हाइकांना करून दिली पाहिजे.

चेक बँकेकडे दिल्यावर कारकुनास जर आढळून आलें कीं चेकमध्यें लिहिलेल्या रकमेइतकी रक्कम गिऱ्हाइकाचे खात्याला बाकी नाहीं अथवा चेकवरील सही नमुन्याच्या सहीबरहुकूम नाहीं अथवा अक्षरीं रक्कम व आंकड्यांत दिलेली रक्कम यांत फरक आहे अथवा ऐवज (कव्हर) भरला असल्यास तो वसूल झालेला नाहीं; नामांतर (एन्डॉर्समेंट) करण्यांत चूक झाली आहे; चेकवर पुढील तारीख आहे; वगैरे, तर त्या चेकचे पैसे न देतां त्याला एक लहानसा कागदाचा तुकडा ज्यास ' मेमो ' असें म्हणतात तो टांचणीनें लावून त्यावर (आर. डी. रिफर टु ड्रावर) ' चेक काढणाऱ्यास विचारा ' असा शेरा मारून हा मेमो चेकसह चेक आणणाऱ्या इसमास परत करतात. अशा वेळीं चेक नामंजूर (डिस्ऑनर्ड) झाला असें म्हणतात. यामुळें जें काय करावयाचें असेल तें चेक काढणाऱ्या इसमावर करावयाचें असतें. बँकेशीं भांडत बसण्यांत अर्थ नाहीं. बँकर केवळ हुकुमाप्रमाणें पैसे मोजणारा असल्यानें हुकूम व्यवस्थेशीर नसल्यास पैसे मोजण्याचें नाकारणें हें त्याचें कर्तव्य आहे. ' म्युटिलेटेड ' फाटका अगर तुकडे चिकटविलेला चेक असल्यास त्याचे पैसेही बँकर देणार नाहीं.

चेक बँकेकडे दाखवून त्याचे पैसे न घेतां तो सर्वतोपरी बरोबर आहे व त्याचे पैसे केव्हांही दिले जातील अशा अर्थादाखल बँकरची नुसती सही त्यावर करून घेतली असतां त्या चेकला ' मार्कड् चेक ' (नोंदलेला चेक) असें म्हणतात. अशा तऱ्हेनें नोंदून घेतलेला चेक पुढें केव्हांही पटविण्यास पाठविला असतां त्या सुमारास खातेदाराचे कांहीं स्थित्यंतर झालें असलें तरी त्याचे पैसे मिळण्यास बाद येत नाहीं. यामुळें चेकनें होणारे व्यवहार

वाढतात आणि पर्यायानें बँकिंगची वाढ होण्यास ही पद्धत कारणीभूत होऊं शकते. बँकरनें एकदां अशा तऱ्हेनें चेक नोंदला म्हणजे मग खातेदाराला त्या चेकचे पैसे दिले जाण्याइतकी रक्कम खात्यांतून बँकर काढूं देत नाहीं. यामुळें रकमेची सुरक्षितता साध्य होते. लेखी हुकूम देऊन चेकचे पैसे थांबवितां येतात ते चेक प्रेझेंट (दाखविला) होण्यापूर्वीं करतां येतें. पण या ठिकाणीं चेक प्रेझेंट झालेला असून त्याचे पैसे जरी प्रत्यक्ष दिले गेले नसले तरी दिल्यावजाच तो प्रकार समजला जात असल्यानें याला इंग्रजींत व कायद्यांत ' कन्स्ट्रक्टिव्ह पेमेंट ' असें म्हणतात. चेक नोंदला गेल्यावर चेकचे पैसे लेखी हुकूम देऊन अथवा गिऱ्हाइकाच्या मृत्यूमुळें अथवा दिवाळें पुकारण्यामुळें त्याचे पैसे मिळण्यास त्रास पडेलसें वाटत नाहीं. बँकच जर बुडाली तर मात्र त्रास होईल पण चेकचे पैसे ज्याला मिळावयाचे असतील तो बँकेचा सावकार म्हणून समजण्यांत येईल. यामुळें याही बाबतींत एक प्रकारें सुरक्षितता आहेच. हिंदुस्थानांत ही पद्धत फारशी किंवा जवळ जवळ मुळींच प्रचलित नाहीं असें म्हटलें तरी चालेल. पण चेकचा प्रसार होण्यास व तदनुषंगें बँकिंगचा प्रसार होण्यास या पद्धतीचा अवलंब अत्यंत जरूर आहे. या पद्धतींत कांहीं दोष असल्यास तज्ज्ञांनीं त्यांचा ऊहापोह करावा व दोषांचें निर्मूलन होणेंबद्दल जरूर तो कायद्यांत फेरफार करवून घेऊन उपाययोजना करावी.

क्रॉस्ड चेक

ज्या चेकच्या दर्शनी भागावर दोन समांतर तिरप्या रेघा ओढलेल्या असतात त्याला क्रॉस्ड चेक असें म्हणतात.

पूर्वीं सांगितलेल्या पद्धतीनेंच यांतील सर्व तपशील भरावयाचा असून त्याशिवाय फक्त दोन रेघा ओढावयाच्या असतात. बेअरर अथवा ऑर्डर चेकचा जसा विशिष्ट अर्थ त्या त्या अर्थाचे शब्द घातल्यानें होतो तसाच

क्रॉस्ड चेकचा नमुना

काउन्टर फाईल

नं. ____

रु. ____

राष्ट्रीय बँक

नं.

तारीख ________ १९५

पे ________ बेअरर ऑर ऑर्डर

रुपये (अक्षरी) ________

रु. ________

सही

(खातेदार)

विशिष्ट अर्थ याप्रमाणें दोन रेघा ओढल्या असतां होतो इतकेंच. या दोन रेघांनीं असें दर्शविलें जातें कीं, चेक ज्या गृहस्थाच्या नांवाचा आहे त्याला अगर तो ज्या दुसऱ्या कोणाला पैसे द्यावे म्हणून सांगेल त्याला व्यक्तिशः पैसे दिले जाऊं नयेत. चेकमध्यें लिहिलेल्या व्यक्तीच्या बँकेंतील खात्याला चेकचे पैसे जमा केले जावे. म्हणजे या चेकनें प्रत्यक्ष व्यक्ती-व्यक्तीमध्यें व्यवहार होत नसून चेक काढणाऱ्याची बँक व चेक ज्याच्या नांवांचा असेल त्याची बँक या दोहोंमध्यें व्यवहार होतो. अर्थात् अशा ठिकाणी चेक ज्याच्या नांवांचा असेल त्याचेहि खातें कोठल्या तरी बँकेंत असलेंच पाहिजे. यामुळें चेकनें होणाऱ्या व्यवहारांत जास्त सुरक्षितपणा येत असल्यानें ही पद्धत फार झपाट्यानें प्रचारांत येत चालली आहे. असा चेक आपणांकडे आल्यास तो क्रेडीट स्लीपमधील एक स्लीप (या स्लीप-वर जरूर तो तपशील भरून) भरून हे दोन्ही कागद आपल्या बँकेकडे पाठवावेत म्हणजे बँकर ह्या चेकची रक्कम वसूल करून ती आपल्या खातीं जमा करतो. ही रक्कम आपणांस हवी असल्यास आपल्या चेक बुकांतील एक चेक लिहून काढून द्यावी. एखाद्यानें आपणांस देऊं असलेल्या रकमे-बद्दल जर क्रॉस्ड चेक पाठविला आणि आपले जर बँकेंत खातें नसलें तर ज्या दुसऱ्या कोणा इसमाचें बँकेंत खातें असेल त्याच्या नांवांचा तो करून द्यावा व आपण त्याचेजवळून पैसे घ्यावेत. असे इसम न भेटल्यास आपल्या गांवांतील कोणाहि बँकेकडे हा चेक घेऊन जावें व याचे पैसे आणून द्या म्हणून सांगावें आणि चेक त्याचे स्वाधीन करावा. चेक बद्दलची पावती बँकर आपणांस देतो आणि पुढें दोनतीन दिवसांनीं पैसे घेण्यास बोलावितो. अर्थात या सर्व खटपटीबद्दल बँकर कांहीं कमिशन घेतो. याप्रमाणें व्यवस्था करतां येणें शक्य नसल्यास चेक ज्यानें दिला त्याचेकडे जाऊन चेकवरील दोन रेघामध्यें (क्रॉसिंग) “ पे कॅश ” (रोख द्यावे) अशीं अक्षरें

जनरल व स्पेशल क्रॉसिंगचे नमुने

१

२ अँड को.

३ नॉट निगोशिएबल अँड को.

१ पुणें बँक

२ पुणें बँक पैसे देऊं केलेल्या इसमाचें खातीं (दि अकाऊन्ट ऑफ दि पेई)

३ नॉट निगोशिएबल पुणें बँक

लिहून घेऊन त्याखालीं त्याची नमुन्याच्या सहीबरहुकूम संपूर्ण सही करून द्यावी व नंतर बँकेंत गेलें असतां त्या चेकचे पैसे मिळू शकतात.

वर दर्शविल्याप्रमाणें नुसत्या दोन रेघा ओढणें याला जनरल क्रॉसिंग असें म्हणतात. म्हणजे कोणत्याही बँकेच्या तर्फे पेईला पैसे दिलें जावेत अशा अर्थाची सूचना चेक काढणाऱ्यानें आपल्या बँकरला दिलेली असते असा अर्थ करतात. परंतु या दोन रेघामध्यें एखाद्या विशिष्ट बँकेचें नांव लिहिलें असतां त्याला 'स्पेशल क्रॉसिंग' असें म्हणतात. यामुळें पेईला क्रॉसिंगमध्यें दर्शविलेल्या बँकेतूनच पैसे वसूल करणें भाग आहे. यामुळें जनरल क्रॉसिंगपेक्षां जास्त सुरक्षितपणा साध्य होतो. परंतु व्यवहाराला थोडाबहूत त्रास पडत असल्यानें ही पद्धत फारशी दिसून येत नाहीं. चेक काढणारा अगर त्यानंतरचा चेकचा मालक यापैकीं कोणीही 'क्रॉसिंग' केले असतां चालते.

नॉट निगोशिएबल चेक

एखाद्या चेकवर नेहमींप्रमाणें तपशील असून तो क्रॉस्ड केलेला असेल आणि त्यावर 'नॉट निगोशिएबल' अशीं अक्षरें असतील तर तो चेक घेतेवेळीं फार सावधगिरीनें वागावे. कारण या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, 'तुम्हांस हा चेक देणाऱ्याविषयीं सावध रहा' म्हणजे एकप्रकारचे धोक्याची सूचना या शब्दानें दिली जाते. तुम्हाला चेक देणारा जर अशा चेकचा कायदेशीर मालक नसेल तर पर्यायानें तुम्हालाही त्याची कायदेशीर मालकी येत नाहीं आणि हा चेक त्याच्या खऱ्या मालकाकडे परत केला जाईल आणि तुम्हांला मात्र मधल्यामधें नुकसानी यावयाची. तरी अशा चेकचे व्यवहार काळजीपूर्वक करावे. 'नॉट निगोशिएबल' या शेऱ्याचा अर्थ चेक दुसऱ्याच्या नांवचा करतां येणार नाहीं असा नाहीं॰ असा चेकही नामांतर (एन्डॉर्स) करतां येतो.

क्रॉसिंगमधील ' अकाउंट पेई ' या शेऱ्याचा अर्थ गिऱ्हाइकातर्फे चेकचे पैसे वसूल करणाऱ्या बँकरला (कलेक्टिंग बँकर) अशी सूचना दिलेली आहे कीं, त्यानें या चेकचे पैसे फक्त पेईकरितांच वसूल करावे, दुसऱ्या कोणाकरितां नाहीं. यानें वस्तुतः चेकचें नामांतर करणें थांबविण्यांत येते.

बँकरचे त्याच्या खातेदाराशीं ऋणकोचें नातें असतें. गिऱ्हाइकाच्या खात्याला पुरेशी रक्कम असेतोपर्यंत तो धनको या नात्यानें चेकच्या आधारें बँकरला पैसे देण्याविषयीं हुकूम करीत असतो. तेव्हां या हुकमाप्रमाणें पैसे देणें बँकरला क्रमप्राप्त असतें अथवा हुकमाप्रमाणें पैसे देण्याचा बँकरला अधिकार असतो. तेव्हां ज्या ज्या वेळीं आपण चेक काढतो त्या त्या वेळीं बँकरला त्याच्याजवळील आपल्या शिलकेपैकीं रक्कम आपण सांगितल्याप्रमाणें द्यावी असा आपण त्याला अधिकार देतो. हा अधिकार त्यानें बजावला असतां आपणावर त्याचें कृत्य बंधनकारक होतें. परंतु खालील प्रसंगीं हा अधिकार बँकरला बजावतां येत नाहीं व जर त्यानी बजावलाच तर तो आपणांस होणाऱ्या नुकसानीबद्दल जबाबदार असतो.

(१) एखाद्यानें दुसऱ्याला चेक लिहून दिल्यावर त्याला मागाहून असें वाटूं लागतें कीं त्यानें तो त्याला द्यावयास नको होता. याचीं अनेक कारणें असूं शकतील. ज्या कोणत्या कल्पनेमुळें त्यानें तो चेक दिला तीं चुकीचीं असल्याचें आढळून येणें; गैरसमजुतीनें चेक दिला गेला असणें; प्रत्यक्ष देणें निघत असलेल्या रकमेपेक्षां जास्त रकमेचा चेक लिहिला जाणें; चेक भलत्याच इसमाच्या हातीं जाणें वगैरे अनेक कारणांमुळें बँकेला लिहून चेकचे पैसे दिले गेले नसल्यास ते थांबविणें अवश्य होतें. अशा वेळीं ताबडतोब लेखी हुकूम देऊन सदरहु चेकचे पैसे देऊं नयेत असें बँकेला कळविलें असतां बँकरनें पैसे देतां कामा नयेत. याला काऊन्टरमांड (तहकुबी) असें म्हणतात.

(२) चेक काढणारा इसम म्हणजे बँकरचा खातेदार मयत झाला असल्याबद्दलची बातमी बँकरला मिळाल्यास त्याचे हयातींत त्याचे हातून सुटलेल्या चेकचे पैसे बँकर देऊं शकत नाहीं.

(३) खातेदाराचें दिवाळें निघालें असतां अथवा नादारीसंबंधीं शंका आल्यानें कोर्टांत प्रकरण चालू असून कोर्टातर्फे बँकरला हुकूम (गारानिशी ऑर्डर) आला असतां बँक चेकचे पैसे देऊं शकत नाहीं.

(४) खातेदार वेडा अथवा भ्रमिष्ट झाला असल्याचें अधिकृत वृत्त बँकेला कळविण्यांत आल्यास तो बरा होऊन पुन्हां व्यवहार करूं लागल्याचेंहि अधिकृत वृत्त समजेतोंपर्यंत त्यानें काढलेल्या चेकचे पैसे बँकेला देतां येत नाहींत.

चेक हरवल्यास

एखादा चेक हरवल्यास तो ज्याच्या नांवचा असेल त्यानें ताबडतोब त्या चेकशीं संबंध पोंचणाऱ्या सर्व व्यक्तींना कळवावें आणि बँकेलाही पैसे न दिले जाण्याबद्दल कळवावें. बँकेला पैसे देऊं नये म्हणून सांगण्याचा अधिकार फक्त मूळ चेक लिहिणाराला असल्यामुळें त्याच्याकडून योग्य तजवीज केली जाईल असें करावें. चेक जर पटविला गेला नसला तर चेक धारण करणाऱ्याला त्याबाबत हमीपत्र देऊन त्याची प्रत अगर पेठ मागतां येते. अशा हमीपत्रद्वारें प्रत अगर पेठ घेणारा मनुष्य लिहून देतो कीं हरवलेल्या चेकचे पैसे मूळ चेक काढणाऱ्याला द्यावे लागल्यास त्याची नुकसानभरपाई प्रत मागणारा करून देईल. अशा परिस्थितींत देण्यांत येणाऱ्या चेकवर शक्य तर लाल शाईनें "प्रत" (डुप्लीकेट) असा शेरा मारण्यांत यावा व बँकेला या "प्रती" चे पैसे देण्याबद्दल कळविण्यांत यावें.

बँकड्राफ्ट–धनपत्र

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसे पाठविण्याचें कार्यही बँक करते. साधारणतः पैशाच्या रवानगीचें कार्य पोस्टामार्फत मनीऑर्डरीच्या अगर पोस्टल ऑर्डर्सच्या साह्यानें करण्यांत येते. अशाच तऱ्हेचें पैशाच्या रवानगीचें कार्य बँकेमार्फतही करतां येते व तें स्वस्तही पडते. या कामीं जें साधन वापरलें जातें त्याला बँक ड्राफ्ट–डीमांड ड्राफ्ट–(धनपत्र) असें म्हणतात. हें साधन म्हणजे बँकेनें दुसऱ्या ठिकाणच्या एकाद्या बँकरवर अगर आपल्याच दुसऱ्या ठिकाणच्या एकाद्या शाखेवर काढलेली दर्शनी हुंडी असते. दर्शनी हुंडी म्हणावयाचें कारण या ड्राफ्टचे पैसे मागतांक्षणींच मिळणारे असतात. ही हुंडी अगर हा डीमांड ड्राफ्ट रोख पैसे भरून विकत घ्यावा लागतो. ड्राफ्टची मागणी करतांना एक फॉर्म भरून द्यावा लागतो. हा फॉर्म बँकेकडून मोफत मिळतो. यांत कोणत्या गांवीं व बँकेवर, कोणाच्या नांवाचा व किती रकमेचा ड्राफ्ट हवा असेल त्याप्रमाणें माहिती भरून द्यावयाची असते. जितकी रक्कम आपणास दुसऱ्या कोणास पाठवावयाची असेल तितकी रक्कम बँकेस देऊन त्याचे बदला ही हुंडी अगर हा ड्राफ्ट घ्यावयाचा. यास ड्राफ्ट विकत घेणें असें म्हणतात. या रकमेखेरीज कमिशन म्हणून आणखी कांहीं पैसे बँकेला द्यावे लागतात. ड्राफ्ट ज्यानें विकत घेतला त्यानें नंतर तो ज्यास पैसे पाठवावयाचे असतील त्याला पाठवावा. तो इसम आपल्या गांवच्या ज्या बँकेवर हा ड्राफ्ट काढलेला असेल त्या बँकेकडे तो दाखवून त्याचे पैसे घेतो. हा ड्राफ्टही चेकप्रमाणें 'क्रॉस' करतां येतो व वसुलीकरितां आपल्या बँकेला देतां येतो. बँकर त्याचे पैसे वसूल करून आपल्या खात्याला जमा करतो.

ड्राफ्टचा नमुना

राष्ट्रीय बँक

नं. पुणें, ता.···············

रु.···············

मागतांक्षणींच रा. रा.·······························यांस अगर ते लेखी सांगतील त्यांस रक्कम रुपये (अक्षरी) ···············
······················द्यावी. याचा मोबदला–ऐवज–आम्हास येथें मिळाला आहे.

मे. स्वदेशी बँकिंग कं.
सराफकट्टा, सांगली
·············यांसी.

राष्ट्रीय बँकेकरितां व तर्फे
···············मॅनेजर
···············अकौंटंट

कसर घेऊन हुंड्या पटविणें

येथपर्यंत बँकेच्या ठेवीबाबत व्यवहारासंबंधीं विचार झाला. आतां कसर घेऊन हुंड्या पटविण्याचा जो एक व्यवहार बँक करते त्यासंबंधीं विचार करावयाचा आहे. या ठिकाणीं मुख्यतः हुंडी व कसर या दोन पारिभाषिक शब्दांचा स्पष्टार्थ करून नंतर बँकेच्या या बाबतींतील कामगिरीचा उल्लेख करणें योग्य होणार आहे. यास्तव प्रथम हुंडी म्हणजे काय याकडे वळूं या.

हुंडी

हुंडी या नांवानें मराठींत संबोधिल्या जाणाऱ्या कागदाला इंग्रजीमध्यें बिल ऑफ एक्सचेंज असें म्हणतात. हुंडीची व्याख्या पुढीलप्रमाणें करतां येईल. धनकोनें आपल्या ऋणकोवर त्याजकडून येणें असलेली नक्की रक्कम कांहीं एका मुदतीनंतर अगर मागतांक्षणींच आपणा स्वतःला अगर आपण सांगू त्याला देण्याविषयींचें जें पत्र अथवा जो हुकूम पाठविलेला असतो त्यास हुंडी असें म्हणतात.

हुंडीपत्राचा नमुना

स्वस्ति श्री मुंबई बंदर महाशुभस्थान रा. रा. श्रीकृष्ण गणेश रास्ते यांसी पंढरपुराहून किकाशेट यांचा जयगोपाळ. वि. वि. आम्हीं तुम्हांवर हुंडी एक देणें केली. येथें राखिले शेटजी गणेशदास कृष्णाजी यांजपासून घेतले रु. ३०० (अक्षरीं तीनशें) याचे निम्मे रु. दीडशें याचे दुणें पुरे. यासी मुदत मिति भाद्रपद शु॥ १० रोज बुधवार पासून दिवस ३१ एकतीस खरें. नामें शहाजोग ठावठिकाणा चौकशी करून रुपये रीतीप्रमाणें देणें. मिति भाद्रपद शु॥ १० रोज बुधवार शके······दस्तुर खुद.

इंग्रजी हुंडीचा नमुना

ऑन डिमांड ऑर········डेज आफ्टर डेट पे टू ········ ऑर ऑर्डर दि सम ऑफ रुपीज········फॉर व्हॅल्यू रिसीव्हड.

सही ————

(भाषान्तर)— मागतांक्षणींच अगर आज तारखेपासून········ दिवसांनीं रक्कम रुपये आम्हां स्वत:ला अगर आम्ही सांगू त्याला देणें. येणेंप्रमाणें रक्कम दिल्यास तुम्हांकडून येणें असलेली रक्कम आम्हांला पावली असें समजण्यांत येईल. सही···············

(सावकार)

हुंडीपत्रांचें अस्तित्व काय कारणानें स्थापन झालें हें पहावयाचें झाल्यास व्यापाराच्या पद्धतीकडे थोडेंफार लक्ष पुरविलें पाहिजे. एखादा दुकानदार आपल्या मालाची विक्री करतो तीं दोन प्रकारची असते. एक रोख विक्री व दुसरी उधार विक्री. या दुसऱ्या प्रकारच्या विक्रीनें त्याच्याजवळील मालाच्या रूपाचें भांडवल कमी होऊन तें गिऱ्हाइकाकडून येणें या स्वरूपांत दुसऱ्याच्या स्वाधीन झालेलें असतें. अशा वेळीं दुकानांत आणखी माल भरावयाचा झाल्यास अगर बाजारांत एखादा नवीन माल आला असून तो खरेदी करणें जरूर वाटत असल्यास त्या वेळीं सवदा करण्यास जवळ पैसा नसल्यानें त्याला हातची संधि गमवावी लागेल. अशा वेळीं खरोखरच त्याच्याजवळ पैसा नाहीं असें नसून त्याचा पैसा दुसऱ्यांच्या हातांत अडकलेला असतो. अर्थात् तो ही उधारी वसूल करून त्या पैशानें आपणांस करावयाचा असलेला सवदा करील. परंतु उधारी वसूल करण्या-करितां गिऱ्हाइकाकडे गेला असतां गिऱ्हाइकाला त्या क्षणीं पैसे देतां येणें शक्य नसून कांहीं मुदत दिल्यास त्या मुदतींत पैसे देण्याचें गिऱ्हाइक

कबूल करीत आहे असें आढळून आल्यास व्यापाऱ्याला आपला हेतु पार पाडणें अशक्य होतें. तेव्हां आतां गिऱ्हाइकाला तर मुदत द्यावयाची व आपणांस हवी असलेली रक्कमही उभी करावयाची असा दुहेरी हेतु साध्य करणें झाल्यास काय करावयाचें असा विचार करीत असतां या हुंडी-पत्राचा आधार द्यावा असें सुचलें असावे असें दिसतें. म्हणजे काय करावयाचें तर गिऱ्हाइकाला हवी असलेली मुदत देऊं करून त्या मुदती-अखेर तो खास रक्कम देईल याबद्दलचा लेखी पुरावा तयार करून त्या पुराव्यासह दुसऱ्या एखाद्या सावकारी पेढीवर जाऊन या लेखी वचनाच्या तारणावर कर्ज काढून रक्कम उभी करावयाची असा विचार दिसतो. तेव्हां एक लेखी पत्र (ज्याला आपण हुंडी म्हणतो ते) लिहावयाचें व त्यावर ऋणकोनें म्हणजे गिऱ्हाइकानें " वरीलप्रमाणें पैसे भरण्यास मी कबूल आहे " अशा अर्थाच्या वाक्यादाखल सही केली असतां हें कायदेशीर हुंडीपत्र झाले अथवा एक प्रकारचा कराराच्या कायद्याखालीं येणरा करार झाला.

याप्रमाणें ऋणकोकडून लिहून घेतल्यावर एक तर त्याजकडून खात्यावर येणें असलेली रक्कम अमूक वेळेला ती नक्की भरली जाण्याबद्दल तो काय-देशीररीत्या बांधला गेला; व दुसरें या लेखी व कायदेशीर वचनाच्या तारणावर कोणी कर्जाऊ रक्कम देण्याचा धंदा करीत असल्यास त्याजकडून कर्ज काढण्यास जरूर तें तारण देऊं करण्याचें साधन हातीं आलें, असा दुहेरी फायदा झाला. तेव्हां आतां प्रश्न एवढाच राहतो कीं अशा तारणावर कर्जाऊ रक्कम देण्याचा धंदा करणारा सावकार कोणी आहे कीं नाहीं ? तर हल्लीं बँक या नांवानीं संबोधिली जाणारी संस्था असल्या तारणावर कर्जाऊ रकमा देण्याचा धंदा करते हे सांगितलें म्हणजे वरील प्रश्नाचें उत्तर मिळतें. याच धंद्याला कसर घेऊन हुंडी पटविण्याचा धंदा असें म्हणतात.

गिऱ्हाइकाकडून येणें असलेली रक्कम अधिक तो जितक्या दिवसानंतर ही रक्कम देऊ म्हणत असेल तितक्या दिवसाचें व्याज मिळून जी रक्कम होईल ती रक्कम हुंडीमध्यें दर्शविलेली असते. व्यापारांत ज्या वेळीं आपला पैसा गिऱ्हाइकाकडे अडकला असेल व आपणाला पैशाची जरूर भासत असेल आणि गिऱ्हाईक तर मागणी केली असतां रोख पैसे तावडतोब देण्याला असमर्थ असेल परंतु तो सालस आहे याबद्दल आपली खात्री असल्यास याप्रमाणें मुदत व व्याज मिळून होणाऱ्या रकमेची त्याजवर हुंडी काढून ती त्याजकडून स्वीकारून घ्यावी. स्वीकारणें याचा अर्थ त्यांनीं हुंडी पत्राप्रमाणें बिनशर्त पैसे देण्याचे कबूल करणें अथवा कित्येक प्रसंगीं प्रत्यक्ष देणें हा होय. यानंतर ती हुंडी आपलें ज्या बँकेंत खातें आहे अशा बँकेकडे अगर खातें नसल्यास बँकेच्या पसंतीची ओळख दिल्यास कोणत्याहि बँकेंत घेऊन जावें, व ह्या हुंडीचे पैसे जरूर ती कसर कापून घेऊन मला द्यावे, अशा अर्थाची विनंति करावी. बँक या हुंडीशीं संबंध असणाऱ्या ऋणको व धनकोच्या पतीसंबंधीं जरूर ती चौकशी करून समाधानकारक परिस्थिति आढळल्यास ही हुंडी कसर घेऊन विकत घेण्याचें कबूल करते. बँकेची संमति मिळाल्यास हुंडी बँकेच्या नांवाची करून बँकेच्या स्वाधीन करावी. बँक त्यांचा हुंडीच्या तारणावर कर्जाऊ रक्कम देण्याबद्दल जो व्याजाचा दर असेल (डिस्काउन्ट रेट) त्या दरानें हुंडीचे पैसे ज्या मुदतीनंतर हातीं येणार असतील त्या मुदतीचें व्याज आकारून तें हुंडी रकमेंतून वजा करून बाकीची रक्कम गिऱ्हाइकास देते. या व्यवहारांत जी व्याजाची कपात झाली तिला कसर असें म्हणतात. वास्तविक ही व्याजाची रक्कम ऋणकोकडून दिली जाते; धनकोला जी रक्कम यावयाची होती ती त्याला मिळते.

बँक या प्रकारच्या व्यवहारांत आपल्याजवळील भांडवल गुंतवते व या व्यवहारांत कसरीच्या रूपानें मिळणारी रक्कम ही बँकेच्या उत्पन्नाची एक

बाब होय. अशा तऱ्हेनें या व्यवहारापासून बँकेलाही उत्पन्न होते व देशांतील व्यापारी वर्गास पैशाचा पुरवठा होतो.

हुंडींत लिहिलेली मुदत संपतांच बँक हुंडी स्वीकारणाऱ्याला ती दाखवून रकमेची मागणी करते व रक्कम वसूल करते. एखादे वेळीं ऋणकोनें याप्रमाणें मागणी केली असतां रक्कम न भरल्यास बँक ती हुंडी डिस् ऑनर्ड म्हणजे अमान्य झाली असें मानून धनकोला हुंडी रकमेबद्दल जबाबदार धरते व याबाबतच्या म्हणजे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्यान्वयें बँकेला दोहोपैकीं कोणालाहि जबाबदार धरतां येतें.

हुंडीचे प्रकार

मागील भागांत हुंडीच्या व्यवहारासंबंधीं सामान्य माहिती दिली गेली. यानंतर येथें हुंडीचे प्रकार किती हें पहावयाचें आहे. आजच्या परिस्थितींत हुंडीचे देशी, स्थानिक व परदेशी हुंड्या असे तीन प्रकार आहेत. वास्तविक नेहमींचे प्रकार दोन स्थानिक व परदेशी. स्थानिक याचा अर्थ एखादे विशिष्ट गांववाचक करावयाचा नसून तो सर्वदेशवाचक करणें या ठिकाणीं जरुर आहे. इंग्रजींत ज्याला इन्लंड बिल म्हणतात त्या हुंड्यांना स्थानिक हुंड्या असें म्हणावयाचें. अशा अर्थानें स्थानिक हुंडी म्हणजे अशी हुंडी कीं जिचे पैसे देणार व घेणार ऋणको व धनको हे दोन्ही एकाच देशांतले आहेत; अथवा हुंडी ज्या गांवीं लिहिली गेली तें गांव व ज्या ठिकाणीं तिची भरपाई व्हावयाची तें गांव हीं दोन्ही एकाच देशांत असल्यास अशा हुंडीला स्थानिक हुंडी असें म्हणावयाचें. उदाहरणार्थः—नाशिकाहून हुंडी लिहिली गेली व तिची भरपाई मुंबईस व्हावयाची असल्यास ती स्थानिक हुंडी; परंतु मुंबईस हुंडी लिहिली गेली व तिची भरपाई लंडनला व्हावयाची असेल तर ती परदेशी हुंडी. तिला

इंग्रजींत फॉरीन बिल् असें म्हणतात. म्हणजे ज्या हुंडीचे धनको व ऋणको हे भिन्न देशांत राहात असतील ती परदेशी हुंडी होय.


यानंतर देशी व स्थानिक हुंडी यांतील फरक काय हा प्रश्न येतो. वास्तविक असा प्रकार इतर कोठेंही आढळणार नाहीं. परंतु या देशांत तो आढळतो. देशी हुंडी याचा अर्थ हिंदी व्यापारांत पूर्वापार चालू असलेल्या पद्धतीनें काढलेली हुंडी. मागील भागांत देशी हुंडीचा व इंग्रजी हुंडीचा असे दोन नमुने दिले आहेत त्यावरून समजेल कीं, इंग्रजी व्यापाऱ्यांनीं हुंडीपत्राचा जो मायना—मसुदा या देशांत अमलांत आणला तो देशी हुंडीच्या मायना—मसुद्यापेक्षां भिन्न आहे आणि म्हणून या मायना—मसुद्याच्या फरकाशिवाय देशी हुंडी व स्थानिक हुंडी यांत कांहीं फारसा फरक नाहीं. देशी हुंडीचेही ऋणको आणि धनको स्थानिक हुंडीप्रमाणें याच देशांत राहणारे असले पाहिजेत.

आजच्या परिस्थितींत हे सर्व प्रकार उद्भवतात आणि याचें कारण व्यापाराचा विस्तार. प्राचीन व्यापार परदेशांशीं नव्हता असें नाहीं परंतु हुंडीच्या अस्तित्वाला ज्या प्रकारचा व्यापार जरूर असतो तो म्हणजे उधारीचा व्यापार प्राचीन काळीं परदेशांशीं नसल्यानें फक्त देशांतील व्यापाऱ्यांशींच उधारीचा व्यवहार होई आणि म्हणून ऋणको व धनको हे दोन्ही याच देशांतले असत. असा हा एकच प्रकार असल्यानें त्याच्या मागें आजच्यासारखीं विशेषणें लावण्याची जरूर नव्हती. हुंडी याचाच अर्थ स्थानिक हुंडी.

या तिन्ही प्रकारच्या हुंड्यांचे दोन मुख्य प्रकार आहेत. एक दर्शनी हुंडी व दुसरा मुदतीची हुंडी. याला इंग्रजींत डिमांड बिल व पीरियड बिल असें म्हणतात. नांवावरून वरील शब्दांचा अर्थ सहज ध्यानांत येण्यासारखा आहे. ज्या हुंडीचे पैसे हुंडीपत्र दाखवतांच मिळावयाचे अगर

भरावयाचे असतात तिला दर्शनी हुंडी असें म्हणतात तर ज्या हुंडीचे पैसे कांहीं एका मुदतीनंतर भरावयाचे असतात तिला मुदतीची हुंडी असें म्हणतात.

यानंतर या निरनिराळ्या प्रकारच्या हुंडीपत्रांतील शब्दप्रयोगामुळें यांचे आणखी कांहीं पोटभेद होतात ते असेः—



वर दिल्याप्रमाणें हे सहा पोटभेद आहेत. त्यांचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें आहे.

धनीजोग हुंडीः—ज्या मनुष्यानें रुपये देऊन हुंडी घेतली त्यासच तिचे रुपये मिळावे, इतरांस मिळूं नयेत अशा अर्थाचे शब्द ज्या हुंडीपत्रांत असतात त्यास धनीजोग हुंडी असें म्हणतात.

नामजोग हुंडीः—ज्या हुंडीचे रुपये हुंडीत लिहिलेल्या मनुष्यासच मिळतात, इतरांस मिळत नाहींत, तिला नामजोग हुंडी असें म्हणतात.

निशाजोग हुंडीः—हुंडीचे पैसे ज्यास द्यावयाचे त्याची ओळख नसल्यामुळें त्याच्या अंगावरच्या खाणाखुणा वगैरे ज्या हुंडींत ओळख पटण्याकरितां लिहिलेल्या असतात त्या हुंडीला निशाजोग हुंडी म्हणतात.

शहाजोग हुंडीः—ज्या हुंडीचे रुपये हुंडी दाखविणाऱ्या कोणत्याही लायक (पतीच्या) मनुष्यास मिळतात तिला शहाजोग हुंडी म्हणतात.

जाबी:—ज्या हुंडीचे रुपये सावकाराकडे जमा करून हे रुपये अमुक मनुष्यास पोंचवून जबाब आणून द्यावा असें सावकारास सांगतात व तो सावकार ते रुपये पोंचल्याचा जबाब आणून देतो त्यास जाबी हुंडी म्हणतात.

जोखमी:—ज्या मालाच्या किंमतीच्या वसुलीबाबत हुंडी काढली आहे त्या मालाच्या सुरक्षित आदानार्थ (डिलीव्हरी) हमी, हुंडी काढणाऱ्या इसमावर अगर हुंडीवाल्यावर असते. यांत मालाच्या विम्याची कल्पना अंतर्भूत आहे. हुंडी ज्यावर काढली असेल तो इसम माल मिळाला तरच हुंडीचे पैसे भरील म्हणून ही एक जोखम (रीस्क) असल्यानें अशा हुंडीस जोखमी हुंडी असें म्हणतात. पाश्चात्य व्यापारातील ' डॉक्युमेंटरी बील ' या शब्द प्रयोगाशी ही हुंडी समानार्थी होईल.

देशी हुंडीपत्राबाबत आणखी कांहीं पारिभाषिक शब्द आहेत. त्यांचा उल्लेख याच ठिकाणीं करणें सोईचें होणार असल्यानें ते पुढें दिले आहेत.

अडत व अडत्या:—सराफी (बँकिंग) इत्यादि व्यवहारांत आपली हुंडी स्वीकारली जावी म्हणून जी सोय करून ठेविली असते तिला अडत असें म्हणतात. उदाहणार्थ, मुंबईस अ यांच्या पेढीवर रुपये १०,००० रोख नेऊन ठेवणें अगर त्यांनीं इतक्या रकमेपर्यंत रक्कम तुम्हांस देण्याचें कबूल करणें व नंतर तुम्ही वेळोवेळीं या खात्यांतून रक्कम दिली जाण्या-संबंधीं हुंडीपत्रें लिहिणें आणि त्याप्रमाणें हुंडी स्वीकारण्याचें अनें कबूल करणें ही सर्व व्यवस्था अडत या शब्दानें दर्शविली जाते. याप्रमाणें हुंडी स्वीकारण्याविषयीं ज्याकडे सोय केलेली असते त्यास अडत्या असें म्हणतात. बँकेच्या ओव्हरड्राफ्ट व्यवस्थेशीं ही व्यवस्था समानार्थी ठरेल.

लहणें:—हुंडीचा ऐवज रोख अगर तितके ऐवजाचा माल किंवा तितक्या रकमेच्या पटतील अशा हुंडया अडत्याकडे आंतून पाठवितात

त्यास लहणें असें म्हणतात. इंग्रजीमध्यें अशा प्रकारच्या व्यवस्थेला 'कव्हर' असें म्हणतात. उदाहरणार्थ, नाशिक येथील वनें कला १०० रु. द्यावे अशा अर्थाचे हुंडीपत्र मुंबईस अवर लिहिल्यास आणि तत्पूर्वी वर लिहिल्याप्रमाणें अडतीची व्यवस्था केलेली नसल्यास असें हुंडीपत्र लिहावयाचे व ताबडतोब आंतून १०० रु. अगर तितक्या किंमतीचा ऐवज अकडे रवाना करावयाचा. या ऐवजाला अगर रकमेला लहणें असें म्हणतात.

खोका:—हुंडी दिल्यावर सावकार आपले अडत्यास तुम्हांवर अमुक रुपयांची, अमुक मुदतीची वगैरे वर्णनात्मक हुंडी केल्याबद्दल जें स्वतंत्र पत्र पाठवितो त्यास खोका अथवा जाब असें म्हणतात. इंग्रजीमध्यें याला 'ॲडव्हाइस' असें म्हणतात.

भरपाई:—हुंडी पत्राप्रमाणें पैसे मिळाल्यानें हुंडीवर यादाखल पावतीची सही करणें यास भरपाई असें म्हणतात. याला इंग्रजींत 'ॲकनॉलेजमेंट' अगर 'एन्डॉर्समेंट' असें म्हणतात. भरपाई झालेल्या हुंडीपत्राला खोका असेंही म्हणतात.

पेठ व परपेठ:—हुंडीपत्र गहाळ झालें तर त्याबद्दल जी हुंडीपत्राची नक्कल देतात त्या नकलेस पेठ, आणि पेठहि गहाळ झाल्यास याबद्दल जी नक्कल देतात त्याला परपेठ असें म्हणतात. पेठ अगर परपेठ देतांना मूळ हुंडीसंबंधीं अडत्याकडे पूर्ण चौकशी करणें इष्ट आहे.

भलावणपत्र:— अमुक मनुष्यास, अमुक मुदतींत, अमुकपर्यंत रुपये द्यावे असें जें एका सावकाराचें दुसऱ्यावर पत्र असतें त्यास भलावणपत्र असें म्हणतात. इंग्रजीमध्यें 'लेटर ऑफ क्रेडिट' असें म्हणतात.

झिकरीचिट:—हुंडी ज्याचेंवर काढली आहे त्यानें ती कदाचित स्विकारिली नाहीं तर तुम्ही स्विकारावी अशा अर्थाचें जें पत्र हुंडीचें पैसे ज्या गांवी मिळावयाचें असतील त्याच गांवच्या दुसऱ्या एकाद्या इसमाचें

नांवानें (ड्रावी इन केस ऑफ नीड) हुंडी लिहिणाऱ्यानें अगर मध्यंतरीच्या कोणा मालकानें हुंडी धारण करणाऱ्यास दिलेले असते त्यास झिकरी चिट म्हणतात. हुंडी धारण करणाऱ्यास हें एक प्रकारचें संरक्षण असतें. हुंडीचा रीतसर स्वीकार न झाल्यासच या पत्राचा उपयोग करावयाचा असतो.

येथपर्यंत या देशांत पूर्वापार चालत आलेल्या हुंडीसंबंधीं माहिती दिली आहे. आतां अलीकडील परिस्थितींत अस्तित्वांत आलेल्या स्थानिक हुंडीसंबंधीं विचार करावयाचा आहे. स्थानिक हुंडी व देशी हुंडी यांत केवळ व्याख्येच्या दृष्टीनें फारसा जरी फरक नाहीं तरी कायद्याच्या दृष्टीनें बराच फरक आहे. हुंडी, चेक्स, प्रॉमिसरी नोटा वगैरेसंबंधीं खटल्यांचे निवाडे ज्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्ट नांवाच्या कायद्यान्वयें निवडले जातात तो कायदा कोणत्याही पौर्वात्य भाषेंत लिहिलेल्या हुंडीला साधारणतः लागू करण्यांत येत नाहीं आणि यामुळेंच थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे स्थानिक हुंडीचा अर्थ वरील कायद्याच्या कक्षेंत येणारी इंग्रजीमध्यें काढलेली हुंडी हा होय.

वरील कायद्यान्वयें स्थानिक हुंडीची व्याख्या पुढें दिल्याप्रमाणें होईल.— "धनकोनें आपल्या ऋणकोला दिलेला लेखी बिनशर्त हुकूम. या हुकुमान्वयें सदरहू खतांत लिहिलेली ठराविक रक्कम धनकोला अगर धनको सांगेल त्याला मागतांक्षणींच अगर खतांत लिहिलेली मुदत संपतांच ऋणकोनें भरावयाची असते." वरील व्याख्येवरून असें दिसून येईल कीं, हुंडीपत्र एक तर लेखी असलें पाहिजे व त्यांत कोणत्याही प्रकारची शर्त असतां कामा नये. कांहींएक मुदत घालणें अगर मनुष्याला न टाळतां येण्यासारखी एखादी गोष्ट झाल्यावर पैसे दिले जावे अशी अट घालणें या गोष्टी कायद्यान्वयें शर्त म्हणून ठरूं शकत नाहींत. उदाहरणार्थ अ नांवाच्या

ऋणकोकडून हुंडीपत्राची भरली जावयाची रक्कम जर त्याच्या मरणानंतर भरण्यांत येईल असें ठरलें असेल तर त्यामुळें ही हुंडी बेकायदेशीर होऊं शकत नाहीं. परंतु जर हुंडीची रक्कम अनें स्वतःचें लग्न झाल्यावर भरावी असें ठरलें असेल तर ही गोष्ट अला टाळतां येण्यासारखी असल्यानें कायद्यांत दिलेल्या बिनशर्त या शब्दाच्या व्याख्येंत ही अट बसत नाहीं म्हणून ही असली हुंडी कायदेशीर ठरणार नाहीं.

यानंतर आणखी विशेष म्हणजे हुंडीत मागतांक्षणींच अगर कांहीं एका निश्चित करतां येणाऱ्या मुदतीनंतर रक्कम दिली जावी अशा अर्थाचा उल्लेख असला पाहिजे. त्याचप्रमाणें हुंडीतील रक्कम निश्चित आंकड्यांत मांडली असली पाहिजे. कायद्यान्वयें निश्चित रक्कम या व्याख्येंत पुढील काळांतील व्याज अगर ठराविक हुंडणावळीच्या दरानें होणारा फरक यांचा समावेश होतो. हुंडीची रक्कम ज्यास द्यावयाची त्याच्या नांवाचा स्पष्ट निर्देश केलेला असला पाहिजे. मग हा नामनिर्देश त्याच्या हुद्यासंबंधीं असला तरी चालतो.

मुदतीची स्थानिक हुंडी असल्यास ती ज्यावर काढली असेल त्याजकडून स्वीकारली जावी लागते. याचा अर्थ ज्यावर हुंडी काढली आहे त्यानें, हुंडींत लिहिलेली रक्कम व मुदत मान्य असून सदरहू वेळेला रक्कम भरली जाईल अशा अर्थाची हमी दर्शविणारी सही त्या ऋणकोनें हुंडीवर करावयाची असते. सदरहूप्रमाणें मुदत अधिक तीन दिवस इतका काळ लोटल्यावर या हुंडीचे पैसे भरावयाचे असतात. हे अधिक तीन दिवस व्यापारी रिवाजामुळें मिळतात. याला इंग्रजींत ' डेज ऑफ ग्रेस ' असें म्हणतात.

हुंडी स्वीकारणें म्हणजे काय याचा अर्थ वर दिलाच आहे. हुंडी स्वीकारण्याचे दोन प्रकार आहेत. एका प्रकाराला जनरल ॲक्सेप्टन्स म्हणजे बिनशर्त स्वीकार असें म्हणतात. तर दुसऱ्या प्रकाराला क्वालिफाइड

ॲक्सेप्टन्स म्हणजे कांहीं अट घालून स्वीकारलेली हुंडी असें म्हणतात. पहिल्या प्रकारचा स्वीकार म्हणजे धनकोनें लिहिलेली मुदत व रक्कम मान्य करणें, आणि दुसऱ्या प्रकारचा स्वीकार म्हणजे धनकोनें लिहिलेल्या रकमेपेक्षां कमी रक्कम अथवा लिहिलेल्या मुदतीपेक्षां कमी अधिक मुदत दर्शविणारा एखादा शेरा हुंडी स्वीकारण्याकरितां आली असतांना ऋण-कोनें करणें व त्याखालीं स्वीकारण्यादाखल सही करणें याला क्वालिफाइड ॲक्सेप्टन्स म्हणजे शर्त-स्वीकार असें म्हणावयाचें.

याप्रमाणें कांहींएक शर्त घालून स्वीकारली गेलेली हुंडी धनकोनें वाटल्यास परत (Dishonour) झाली असें समजावे अगर त्यांत घात-लेली शर्त वर दिल्याप्रमाणें कायद्याला मंजूर असलेल्या शर्तींपैकीं असल्यास मान्य समजावी.

अशा तऱ्हेनें स्वीकार करणाऱ्या ऋणकोची जबाबदारी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स् कायद्याच्या कलम ३२अन्वयें पुढें दिल्याप्रमाणें आहे.--साधारणतः कांहीं एक विरुद्ध मुद्देसूद करार नसल्यास कोणत्याही प्रॉमिसरी नोटीवर अगर हुंडीवर (बिल ऑफ एक्सचेंज) रक्कम भरण्याची हमी घेण्यादाखल सही करणाऱ्या ऋणकोनें सदरहू खताची रक्कम खतांतील अटींप्रमाणें, खतान्वयें ज्या कोणास द्यावयाची असेल, त्यास ती कोणतीही सबब न सांगतां दिलीच पाहिजे. याप्रमाणें रक्कम न भरल्यास ही प्रॉमिसरी नोट लिहिणारा अगर हुंडी स्वीकारणारा मनुष्य विरुद्धपक्षाला यामुळें होणाऱ्या नुकसानीबद्दल जबाबदार आहे.

एखादी हुंडी स्वीकारण्याकरितां पाठविली असतां न स्वीकारली जाणें अगर स्वीकारली गेल्यावर हुंडीतील मुदत संपतांक्षणींच तिची भरपाई न होणें या दोन कारणांनीं हुंडी परतविली गेली असें म्हणतात. भरपाई होण्याकरितां ठराविक दिवशी हुंडी स्वीकारणाऱ्याच्या दुकानीं अगर

त्याच्या घरीं योग्य मुदतींत हुंडी दाखविण्यांत आली पाहिजे. हुंडी स्वीकारणार अगर त्याचा अधिकारयुक्त गुमास्ता यावरच हुंडी बजाविली पाहिजे. हुंडी परतविली गेल्यास हुंडी काढणाऱ्या इसमास त्याचप्रमाणें हुंडीशीं संबंध असणाऱ्या इतर सर्व इसमांस ताबडतोब लेखी सूचना द्यावयास पाहिजे. सूचना लेखीच असली पाहिजे असें जरी कायद्यानें प्रतिपादिलेलें नाहीं तरी ती लेखी असणें जास्त हितावह आहे. हुंडीचे पैसे घेणारा व भरपाई करणारा मनुष्य जर एकाच गांवांतील असतील तर हुंडी परतविली गेली त्याचे दुसरे दिवशीं ही सूचना परतविणाऱ्या इसमास मिळेल अशा बेतानें ती रवाना झाली पाहिजे. परंतु हे दोन असामी जर भिन्न भिन्न गांवीं असतील तर ही सूचना हुंडी परतविल्या तारखेच्या दुसऱ्या दिवशीं रवाना करण्यांत आली पाहिजे. सूचनेवर योग्य पत्ता लिहिला असून पोस्टामार्फत रवाना करण्यांत आली असतां ती पोस्टामार्फत पाठविली गेली आहे याबद्दल पुरावा असला म्हणजे झालें. मग ती सूचना त्या आसामीस मिळाली नसली तरी पुढील तजविजीस कायद्यानें बाध येत नाहीं. याकरितां अशी सूचना पोस्टामार्फत पाठवतेवेळीं पोस्टाकडून सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग घ्यावें हे बरें. याप्रमाणें मुदतींत नोटीस न दिल्यास हुंडी काढणारा इसम (ड्रॉवर) व हुंडीशीं संबंध असणारे इतर–(एनडॉर्सर्स) हे जबाबदार धरले जात नाहींत.

ही सूचना जी द्यावयाची असते तिनें या सर्व इसमांकडून पैशाची मागणी करावयाची नसून त्यांना त्यांच्या त्यांच्या जबाबदारीची जाणीव या सूचनेनें करावयाची असते. यापैकीं एखाद्या इसमास हुंडी परतविली गेली असल्याचें कांहीं कारणांनीं माहीत असलें तरी योग्य वेळीं त्यालाहि स्वतंत्र सूचना दिली गेली पाहिजे. ज्याला सूचना पाठविली तो इसम मयत असल्यास आणि त्याच्या मरणाची बातमी सूचना पाठविणाऱ्या इसमास तत्पूर्वी नव्हती असें सिद्ध झाल्यास ती सूचना कायदेशीर ठरूं शकते.

याप्रमाणें सूचना देऊन शिवाय ती हुंडी नोटरीकडे अगर महाजन असोसिएशनकडे नोंदून घेतली पाहिजे. नोटरीकडे हुंडी नोंदण्याकरितां नेली असतांना तो आपल्या नोंदबुकांत हुंडीसंबंधीं सर्व हकीकत उतरवून घेतो. ही नोंद योग्य मुदतींत झाली पाहिजे आणि त्यांत हुंडी परतविली गेल्याची तारीख व परतविली गेल्याचीं कारणें नमूद केलीं असलीं पाहिजेत. या नोंदीबद्दल नोटरीला कांहीं फी द्यावी लागते आणि ही फी व पुढील मुदतीचें व्याज हुंडी परतविणाऱ्या इसमाकडून वसूल करतां येतें.

नोटरी पब्लिक (अस्वीकृत धनलेख लेखक किंवा लेखाधिकारी) म्हणून कोणा इसमाची त्याचे नांवानें अगर त्याचे अधिकारपरत्वे हुद्यानें प्रांतिक सरकार एकाद्या विशिष्ट जिल्ह्यांत अगर भागांत अशा कामाकरितां नेमणूक करते. अस्वीकृत हुंड्याबावत दाखला देणें व किती फी आकारावयाची वगैरे संबंधीं नियमही करण्यांत येतात. स्थानिक अस्वीकृत हुंड्यांची नोंद नोटरीकडे केलीच पाहिजे अशी सक्ति नाहीं. परंतु परदेशी हुंड्या अस्वीकृत (डीसॉनर्ड) झाल्यास त्याची नोंद नोटरीकडे करावीच लागते.

ॲकॉमोडेशन बील—गरजहुंडी

पाश्चात्य व्यापारी रिवाजान्वयें ॲकॉमोडेशन बील (Accommodation Bill) म्हणून एक प्रकारची हुंडी असते. हा व्यापारी पतीचा एक प्रकार आहे. कोणा एका व्यक्तीच्या हिताकरितां अगर त्याची गरज भागीवण्याकरितां दुसरा कोणी पुढें होऊन स्वतःच्या पतीचा (क्रेडीट) उपयोग करूं देण्याचें इराद्यानें हुंडीशीं संबंधीत होतो. याला ॲकॉमोडेशन (गरज भागविणें) म्हणतात. समजा अला पैसे हवे आहेत. त्यानें ते बपाशीं मागितले. पण ब स्वतःचे पैसे काढून न देतां अला सुचवितो कीं, तूं जणू माझा सावकार समजून माझेवर मुदतीची हुंडी काढ. मी ती स्वीकारतों. मी ऐपतदार असल्यानें ती हुंडी तूं बँकेकडे कसर देऊन

चीक आणि मिळणाऱ्या पैशांतून आपली गरज भागव अथवा तुझ्या धनकोला ती हुंडी बेची करून दे. म्हणजे ब ह्या ऐपतदार इसमानें आपली सही गुंतवून परस्पर अची गरज भागविली. मुदतीअखेर ह्या हुंडीची रक्कम वस्तुतः अनेंच भरावयाची मात्र कायद्यानें ब याची ती जबाबदारी आहे. अनें बकडे रक्कम पाठवून ती बनें बँकेंत भरावयाची अथवा अनें परस्पर बँकेंत बतर्फे भरावयाची. आणि यांत अनें असें केलें असतां तो कोणत्याही तऱ्हेनें बचा धनको ठरूं शकत नाहीं. वास्तविक नेहमीं धनको ऋणकोवर हुंडी काढतो पण अशा या हुंडींत असें कांहीं नातें नसतें. बील (हुंडी) स्वीकारणाऱ्याला कोणताच मोबदला (Consideration) मिळालेला नसतो. तर उलट त्यानें आपल्या मित्राला आर्थिक सहाय्य मिळवून देण्याच्या हेतूनें स्वीकार केलेला असतो. मात्र म्हणून त्याला हुंडीबाबत आपली जबाबदारी झुगारून देतां येणार नाहीं.

——

प्रॉमिसरी नोट—वचनचिठ्ठी

प्रॉमिसरी नोट (वचन–चिठ्ठी) हेंही एक हुंडीला सादृश असें साधन आहे. एकाद्याकडून मालविक्रीमुळें अगर अन्य उधार–उसनवारीमुळें कांहीं येणें असल्यास तें देण्यासंबंधी नुसत्या तोंडी आश्वासनावर विसंबण्याऐवजी त्याचेकडून लेखी वचन घेण्यांत एकतर जास्त सुरक्षितपणा येतो व अडी-अडचणीला आपल्याला त्या वचनाचा उपयोगही करून घेतां येतो.

ऋणकोनें धनकोला देणें असलेल्या रकमेबाबत लेखी लिहून दिलेली वचन चिठ्ठी कीं ज्या अन्वयें तो कांहीं एक निश्चित रक्कम मागतांक्षणींच अगर कांहीं एका मुदतीनंतर व्याज मुदलासकट धनकोला अगर तो सांगेल त्याला देण्याचें कबूल करतो त्या लेखास प्रॉमिसरी नोट म्हणतात.

अशी वचनचिठ्ठी हुंडीप्रमाणेंच बिनशर्त व लेखी असली पाहिजे. ती पेन्सीलीनें लिहिली आहे कां शाईनें हा महत्वाचा मुद्दा नसून ती स्पष्ट व सुवाच्च असली पाहिजे. अर्थात शाईनें लिहिणें जास्त हितावह व योग्य. ही ऋणकोकडूनच लिहिण्यांत येते व त्यावर त्याची सही असते. यामुळें हुंडीप्रमाणें याला स्वीकार (ॲक्सेप्टन्स) करण्याची जरूरी नसते. ती धनकोचें नांवानें लिहिलेली असते व तिचे पैसे मागतांक्षणींच अगर त्यांत नमूद केलेल्या मुदतीनंतर द्यावयाचे असतात. त्यांत फक्त पैसे देण्याचीच जबाबदारी स्वीकारली असली पाहिजे. (To pay money and money only) अक्षरी लिहिलेल्या रकमेत व आकड्यांत मांडलेल्या रकमेत तफावत झाली असल्यास अक्षरी लिहिलेली रक्कम खरी धरण्यांत येईल. केवळ ऋण मान्य करणारी भाषा वापरली असतां ती प्रॉमिसरी नोट ठरेलच असें नाहीं; तर स्वच्छ व स्पष्ट रीतीनें ऋण विमोचनाचें वचन असलें पाहिजे. फक्त व्याज देण्याचें वचन दिले आहे परंतु मुदलाच्या

परतफेडीचें वचनाचा उल्लेख नाहीं तर असा लेख प्रॉमिसरी नोट ठरणार नाहीं. खाते उताऱ्यान्वये दिसणारी अगर दर्शविलेली "देणे बाकी" पैसे देण्याचें वचन ठरत नाहीं. आय्. ओ. यू. (ऋणचिठ्ठी) प्रॉमिसरी नोट ठरत नाहीं.

प्रॉमिसरी नोट लिहिणाऱ्यास म्हणजे ऋणकोस "मेकर" असें म्हणतात आणि ती ज्याचें नांवानें लिहिली असेल त्यास "पेई" म्हणतात. हा साधारणतः धनको असतो. प्रॉ. नोट लिहून देणार व लिहून घेणार एकच असूं शकणार नाहीं. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टाच्या कलम ४ अन्वयें दिलेल्या व्याख्येनुसार प्रॉमिसरी नोट ही जरी ऑर्डर अथवा बेअरर असूं शकते तरी करन्सी ॲक्टाच्या कलम २५ अन्वयें बेअरर प्रॉमिसरी नोट काढण्याचा सर्वथैव हक्क रिझर्व्ह बँकेला दिला गेला असल्यानें व्यवहारांत बहुतेक ऑर्डर प्रॉमिसरी नोटाच असतात.

प्रॉमिसरी नोट लिहून देणार एक किंवा अनेक असूं शकतात. एका-पेक्षां जास्त इसमांच्या सहीच्या प्रॉ. नोटीला 'जॉईन्ट ॲंड सेव्हरल' प्रॉमिसरी नोट असें म्हणतात. अशा नोटीवर सही करणार जथींमथीनें (कलेक्टीव्हली) आणि व्यक्तिशः (सेव्हरली) जबाबदार असतात. धनको, यापैकीं एकाकडून अगर सर्वांकडून अगर क्रमशः एकेकाकडून आपल्या येण्याची पूर्तता होईपर्यंत वसुली करूं शकतो.

प्रॉमिसरी नोटीच्या बाबतींत पुढीलप्रमाणें स्टॅप डयूटी म्हणून रेव्हेन्यू तिकीटें लावावीं लागतात:—

१ ते २५० रुपयापर्यंतच्या	प्रॉ. नोटीस	१	आण्याचे	रे.	ति.
२५१ ते १०००	,,	,,	२	,,	,,
१००१ ते पुढें कितीही	,,	,,	४	,,	,,

ऑर्डर प्रॉमिसरी नोट ही चेकप्रमाणें निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट आहे म्हणून नामांतराबाबतचे (एन्डॉर्समेंट) नियम चेकप्रमाणेंच असतात. प्रॉ. नोटही हुंडीप्रमाणें 'दर्शनी' किंवा मुदतीची असूं शकते. हुंडी जशी कसर देऊन विकतां येते तशीच प्रॉ. नोटही कसर देऊन विकतां येते व दुसऱ्याच्या नांवानें बेची करतां येते. प्रॉ. नोटींतील पैशाची मागणी व वसुली करणें याबाबतचे रिवाज हुंडीप्रमाणेंच आहेत. तसेंच मागतांक्षणींच अगर मुदतीअखेर रकमेची भरपाई न झाल्यास वचनचिठ्ठी अमान्य (डीसॉनर) झाली असें समजण्यांत येते व अशा अमान्यतेची खबर (नोटीस) प्रॉ. नोट धारण करीत असणाऱ्यानें (होल्डर) सदर नोटीशीं संबंध पोहोचणाऱ्या सर्व इसमांना दिली पाहिजे. मात्र मूळ ऋणकोला (मेकर) खबर देण्याची जरूरी नाहीं. अस्वीकृत प्रॉ. नोट हुंडीप्रमाणेंच नोटरीकडे नोंदवून घ्यावी.

प्रॉमिसरी नोट–इंग्रजी नमुना

Address____________

Rs. [ ]

Date____________

On demand / Three months after date, I / We jointly and severally promise to pay Mr.____________ or order the sum of Rupees____________ only together with interest thereon at the rate of ______ per cent per annum for value received.

Revenue Stamp

Signature____________

प्रॉमिसरी नोट नमुना

रु.————   ठिकाणा ता.————

रा. रा.———————————————लिहून घेणार
राहणार———————————————यांसी,
प्रॉमिसरी नोट लिहून देणार मी/आम्ही खालीं सही/सह्या करणार
————————राहणार————————
कारणें लिहून देतो कीं, मीं/आम्ही, आजरोजीं तुमचेपासोन रोख
रुपये (अक्षरी)——————————फक्त घेतले. यासी
व्याज दर महा/साल दर शेकडा रु.————प्रमाणें देईन/देऊं
व सदर व्याज–मुदलासकट सर्व रक्कम तुम्ही मागाल त्या वेळीं/आज-
पासोन————महिन्यांनीं व मागाल त्या ठिकाणीं कोणतीही सबब अगर
तक्रार न सांगतां देईन/जथीमथीनें व व्यक्तिशः देऊं. भरणा पावल्यानें
मोबदल्याची तक्रार नाहीं. सही, तारीख————

रेव्हेन्यु तिकीट

सही / सह्या————————————

—————————————

——

परदेशी अगर विलायती हुंडी

हुंडी म्हणजे काय याचा स्पष्टार्थ आतांपर्यंतच्या प्रकरणांत अनेक ठिकाणीं करण्यांत आला असल्यानें ह्या ठिकाणीं त्याच्या अर्थाची पुन्हा व्याख्या करीत न बसतां देशी अगर स्थानिक हुंडी व परदेशी हुंडी (फॉरिन बिल ऑफ एक्सचेंज) यांतील फरक काय एवढेच पहावयाचें आहे.

ज्या हुंडीचे ऋणको व धनको एकाच देशांतील असतात तिला स्थानिक हुंडी असें म्हणतात; तर ज्या वेळीं हुंडी ज्यावर काढिली तो समजा फ्रान्समध्यें आहे व ज्यानें हुंडी काढिली तो समजा हिंदुस्थान अगर इंग्लंडमध्यें आहे, तर अशा या हुंडीला परदेशी हुंडी असें म्हणतात. म्हणजे परदेशी हुंडीस ऋणको व धनको निरनिराळ्या देशचे रहिवासी असले पाहिजेत. परदेशी हुंडीचेहि दर्शनी व मुदतीची असे दोन पोटभेद आहेतच. साधारणपणें ऋणकोच्या गांवाला टपाल पोंचण्यास जितके दिवस लागतात तितके दिवसांचा उल्लेख हुंडीत करून त्यानंतर दर्शनी अगर अमुक दिवसांनी रक्कम द्यावी असें लिहिलेलें असतें.

परदेशी हुंडीचा नमुना

Exchange for £ 1000.

Paris.................195

Stamp

Sixty days after sight, pay this first of exchange (second and third of the sam ɟ tenor and date not paid) to the order oe Henry Sykes, the sum of one thousand pounds value received.

To,

James Smith & Co.
East Circle, Leeds.

M. Soincaire.

भाषान्तर

१००० पौंडाबद्दल

पॅरीस......१९५

तिकीट	हुंडी दाखविल्या तारखेपासून साठ दिवसांनीं या पहिल्या प्रती दाखल (याच रकमेच्या वर्णनाची व तारखेची दुसरी व तिसरी प्रत रद्द समजणें) रा. हेन्री साइक्स यांस अगर ते सांगतील

त्यांस एक हजार पौंड भरणें; याबद्दल त्यांजकडून आम्हांला मोबदला मिळाला आहे.

सही (धनको)

मेसर्स जेम्स स्मिथ ॲण्ड को.

ईस्ट सर्कल, लीड्स्.

परदेशी हुंडीच्या नेहमीं तीन प्रती काढतात. पहिली प्रत पहिल्या मेलनें पाठवावयाची व दुसरी दुसऱ्या मेलनें पाठवावयाची व त्यांत लिहावयाचें कीं जी कोणती प्रत आधीं मिळेल ती खरी धरून बाकीच्या प्रती रद्द समजणें.

ही हुंडी काढून धनको हेन्री साइक्सला ती देतो व अशी एक हुंडी तुम्हांवर काढली आहे वगैरे अर्थाची सूचना म्हणून ऋणकोला पत्र लिहितो.

निर्यात व्यापारांत अशा हुंड्या फार निघतात व त्यांत बहुतेक बँकांचा ऋणको व धनको म्हणून फार संबंध असतो. उदाहरणार्थ मुंबईहून कोबे येथील एखाद्या जपान्यानें कांहीं माल मागविला असें समजूं या. आर्डर-सोबत कांहीं मालाची किंमत जपानी पाठवीत नाहीं. वास्तविक माल हातीं अगर निदान आपल्या प्रांतांत आल्याशिवाय त्यांनीं तरी व्यापारी या दृष्टीनें अगोदरच हातचा पैसा कां अडकवून ठेवावा ? बरें, उलट बाजूनें

मुंबईच्या व्यापाऱ्यानें आपला माल हातचा घालवावयाचा आणि पैशाची वाट पहात बसावयाचें हेंही व्यापारी दृष्टीनें वावगें ठरतें.

शिवाय यांत नुसती पैशाची वाट पहात बसावयाची एवढीच गोष्ट असती तर एकवार पत्करलें असतें. परंतु जर कदाचित् त्या जपान्यानें पैसे भरलेच नाहींत तर मालापरी माल गेला व पुन्हां फिर्यादी–अर्यादी करीत बसण्याची शिक्षाच जणूं भोगावी लागली असा प्रसंग येणार ! तेव्हां अशा परिस्थितींत हा व्यवहार व्हावा कसा ?

अशा प्रसंगी बँकरनें मध्यस्थी करण्याचें पत्करल्यामुळें हा प्रश्न सुटला व या मध्यस्थींत उपयोगांत आणलें जाणारें साधन जें हुंडीपत्र त्याच्या अस्तित्वामुळें आज घटकेला निर्यात व्यापारांत पुढें दिल्याप्रमाणें व्यवहार करण्याचा प्रघात पडला आहे.

मुंबईहून आपला हा व्यापारी आतां जपान्याच्या आर्डरबरहुकूम माल बोटीवर चढवितो. माल बोटीवर चढविल्यावर आगबोट कंपनीकडून रेल्वेवरून जाणाऱ्या मालाबाबत जशी रेल्वे रसीद मिळते तद्वत् बिल् ऑफ लेडिंग नांवाची रसीद मिळते. ही रसीद बंदरावरच असलेल्या विमा-कंपनीच्या कचेरींत दाखवून त्या रसीदींत नमूद झालेल्या मालाचा विमा उतरवितात. नंतर ही रसीद व विमा कंपनीकडून मिळालेली विम्याची पॉलिसी आपले इन्व्हाईस (बीजकपट्टी) इतके कागद एकत्र करून त्यासोबत त्या जपान्यावर मुंबईचा हा व्यापारी एक हुंडी काढतो. ती हुंडी मुंबई येथील असले व्यवहार करणाऱ्या एखाद्या बँकेकडे तो घेऊन जातो. या हुंडींत हुंडीची रक्कम या बँकेच्या जपानमधील अडत्यास भरावी असें म्हटलेलें असतें. म्हणजे या हुंडीचे पैसे या बँकेला मिळावयाचे असल्यानें ती बँक आज या व्यापाऱ्यास जरूरच असेल तर कांहीं रक्कम या तारणावर उसनवार देते. म्हणजे माल हातचा जातांच थोडेबहुत तरी पैसे या पद्धती-

मुळें व्यापाऱ्याच्या हातीं खेळतात. आतां हे हुंडीपत्रासहित सर्व कागदपत्र या बँकेच्या स्वाधीन हा व्यापारी करतो व बँक ते आपल्या जपानमधील अडत्यास पाठविते.

या कागदपत्रांसोबत एक ' लेटर ऑफ हायपॉथिकेशन ' म्हणून संबोधिलें जाणारें पत्र हा व्यापारी येथील बँकरला देतो. या पत्रामार्फत अशा तऱ्हेचा अधिकार हा व्यापारी बँकरला देतो कीं जर त्या जपान्यानें या हुंडीचे पैसे भरून माल सोडवून घेतला नाहीं तर तुम्ही तो योग्य मुदतीनंतर लिलावानें विकून आपले पैसे वसूल करावे.

बँकर आपल्या जपानमधील अडत्यास हे सर्व कागदपत्र पाठवितो. कागदपत्र पावल्यावर हा अडत्या त्या जपानी व्यापाऱ्याला पत्र लिहून अगर शक्य असल्यास समक्ष भेटून सांगतो कीं मजजवळ तुम्हांवर काढलेली जी हुंडी आहे तिची तुम्हांकडून भरपाई झाल्यास मी तुम्हांला या मालासंबंधींची आगबोट कंपनीची रसीद व विम्याची पॉलिसी देईन. ही रसीद दाखविल्याखेरीज आगबोट कंपनी माल देत नाहीं. हुंडीची भरपाई घेतल्याखेरीज ही रसीद हातीं येत नाहीं.

येथपर्यंत दिलेल्या निर्यात व्यापारांतील या व्यवहार पद्धतिवरून बँकरमार्फत हुंडीच्या आधारें परदेशी माल पाठविणें कसे सुरक्षित आहे याची योग्य कल्पना येईल व हुंडीपत्राचें महत्त्व किती आहे तेंही ध्यानीं येईल.

परदेशी हुंडीबाबत एक आणखी महत्त्वाची बाब म्हणजे तिचे पैसे ज्यानें भरावयाचे आहेत तो ज्या देशांत असेल त्या देशांत चालू असलेल्या नाण्यांत हुंडीची रक्कम भरपाई केली जावयाची असते. तेव्हां आपल्या देशांतील नाणें व त्यांच्या देशांतील नाणें यांचे परस्पर देवघेवीचें प्रमाण काय हें हुंडी काढणाऱ्याला माहीत असलें पाहिजे. म्हणजेच त्याला या प्रमाणांत त्याच्या देशांतील नाण्याप्रमाणें जितकी रक्कम होत असेल तितकी रक्कम हुंडीत नमूद करतां येईल. या ठिकाणीं या विषयाचा जास्त ऊहापोह

करणें जरूर आहे. इंग्रजींत फॉरीन एक्सचेंज असें ज्याला म्हणतात तो हा विषय फार कठीण व गुंतागुंतीचा आहे.

परदेशी हुंडीसंबंधीं जी एक महत्त्वाची बाब आहे ती म्हणजे या हुंडीचे पैसे ज्यानें भरावयाचे आहेत तो ज्या देशांत असेल त्या देशांत चालू असलेल्या नाण्यांत हुंडीमधील रकमेचा निर्देश करावा लागतो. आरंभी दिलेल्या परदेशी हुंडीच्या नमुन्याप्रमाणें पॅरीसमध्यें असणाऱ्या धनकोनें इंग्लंडमध्यें असणाऱ्या आपल्या ऋणकोवर काढावयाच्या हुंडीत हुंडीची रक्कम पौंडांतच दर्शविली आहे. कारण ऋणको ज्या देशांत म्हणजे इंग्लंड-मध्यें आहे तेथें पौंड हें नाणें चालू आहे. उलट लंडन येथील धनकोला पॅरीस येथील ऋणकोवर हुंडी काढण्याची झाल्यास त्या हुंडीत दर्शविण्यांत येणारी रक्कम फ्रँक्समध्यें दर्शविण्यांत येईल. याच नियमानुसार प्रत्येक भिन्न भिन्न देशांतील व्यवहार करण्यांत येतात. बहुतेक सर्व राष्ट्रांतून वजन, धातु, मोल या दृष्टींनीं भिन्न भिन्न स्वरूपाचीं नाणीं प्रचलित आहेत. तेव्हां हीं सर्व नाणीं आधुनिक आयात निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यास माहीत असलीं पाहिजेत.

कांहीं प्रमुख देशांतून सध्यां चालू असलेल्या नाण्यांचीं नांवें पुढें दिली आहेत.

इंग्लंड	पौंड	शिलिंग	पेन्स
फ्रान्स	फ्रँक्स्	सेंटस्	
अमेरिका	डॉलर्स	,,	
जपान	येन्	सेन्	
चीन	डॉलर्स	सेंटस्	
जर्मनी	मार्क्स	,,	
रशिया	रूबल्स्	,,	
भारत	रुपय	आणे	

नाण्यांची संख्या अस्तित्वांत येण्यापूर्वी राष्ट्रांराष्ट्रांमध्यें अगर व्यक्तीव्यक्तीमध्यें होणारे व्यवहार जिनसेला जिन्नस देऊन होत असत. या पद्धतींत कित्येक प्रसंगीं मोबदल्यांत मिळणाऱ्या जिनसेची जरूरी नसल्यास व्यवहार करणें जड जाई. त्याकरितां समाजानें अशी एक जिन्नस शोधून काढली कीं त्या जिनसेचा उपयोग देवघेवीच्या या व्यवहारांत **स्वसंतोषानें सदैव दिली घेतली जाणारी वस्तु** असा ठरला, आणि ही वस्तु म्हणजे सोनें ही धातु होय. ज्या कोणत्याही पदार्थाचा नाण्याचे कामीं उपयोग करावयाचा असतो त्याचे अंगीं कमींत कमी सात विशिष्ट गुण असावे लागतात. आणि हे सातही गुण बहुतांशीं जगांतील सर्व वस्तूंत सोनें या धातूचेच ठिकाणीं असल्याचें आढळून आल्यावरून त्या धातूचा उपयोग जगांतील बहुतेक राष्ट्रांतून नाण्याचे कामीं करण्यांत येत आहे. सोन्याचे खालोखाल चांदीचा नंबर लागतो आणि म्हणून कित्येक राष्ट्रांतून चांदीचींही नाणीं चालू आहेत.

वरील विवेचनावरून हें ध्यानीं येईल कीं व्यापारांत विकल्या जाणाऱ्या मालाचा मोबदला व्यापारी या सोनें किंवा चांदीच्या नाण्यांत बाजारभावाच्या आधारें घेतो. हा भाव तो ज्या देशांत राहत असेल त्या देशांतील बाजारपेठेमधला असल्यानें त्यानें आपल्या मालाचा मोबदला म्हणून आकारलेली किंमत त्याच्या देशांत प्रचलित असलेल्या नाण्यांमध्यें असणार.

आतां आपण अशी कल्पना करूं या कीं, पॅरीस (फ्रान्स) येथील एका व्यापाऱ्यानें कांहीं रेशीम इंग्लिश व्यापाऱ्यास लंडन येथें पाठविलें. या मालाची किंमत फ्रान्समधील बाजारभावाप्रमाणें समजा एक हजार फ्रँक्स झाली, म्हणजे इतकी रकम हा फ्रेंच व्यापारी इंग्लिश व्यापाऱ्याकडे मागूं शकतो. आणि या रकमेची मागणी त्यानें जर हुंडीपत्रामार्फत

केली तर पूर्वीं दिलेल्या हुंडीरिवाजाप्रमाणें ही मागणी इंग्लिश मनुष्याच्या नाण्यांत म्हणजे पौंडांत केली पाहिजे. तेव्हां आतां या फ्रेंच व्यापाऱ्यापुढें असा प्रश्न येतो कीं, किती पौंड मागावयाचे. आणि याचें उत्तर जितकें पौंड मिळाले असतां याला घेणें होत असलेली एक हजार फ्रँक्सची रक्कम मिळाली असें वाटेल तितक्या पौंडांची मागणी करणें हें होय. म्हणजे आतां या मोबदल्याचें प्रमाण ठरविलें पाहिजे.

वर दिल्याप्रमाणें मालाचा मोबदला नाण्यांत देण्याचा रिवाज चहूंकडे प्रचलित असल्यानें अर्थात् या ठिकाणीं हा मोबदला या दोन देशांत चालू असलेल्या नाण्यांतच दिला जाणार हें खास. तेव्हां या दोन देशांत चालू असलेल्या नाण्याचें परस्पर प्रमाण कळलें म्हणजे आपले मोबदल्याचें प्रमाण ठरवितां येणें शक्य आहे. या दोन्ही देशांत सोन्याचें नाणें चालू आहे. प्रत्येक देशांत चालू असलेलें नाणें कांहीं एका वजनाचें व आकाराचें ठरवून टाकण्यांत आलेलें असतें. त्याप्रमाणें इंग्लंडमध्यें चालू असलेला पौंड हा २४ कॅरेट (कॅरेट हें एक सोन्याचें माप) वजनाचा आहे आणि त्यांत शुद्ध सोनें २२ कॅरेट आहे. म्हणजे दोन कॅरेटचा भाग असें धरल्यास $\frac{११}{१२}$ इतकें शुद्ध सोनें इंग्लिश पौंडांत आहे. आणि नाण्याच्या अंगीं जरूर असलेला कठिणपणा येण्याकरितां $\frac{१}{१२}$ भाग इतर धातूंचे मिश्रणाचा आहे. फ्रान्समध्यें प्रचलित असलेल्या नाण्याचें वजन $\frac{९}{१०}$ आहे. म्हणजे एकूण वजन २० कॅरेट व त्यापैकीं १८ कॅरेट शुद्ध सोन्याचें प्रमाण आहे.

आतां किती पौंड म्हणजे अमुक इतके फ्रँक्स हें ठरवितांना पौंडामधील सोनें फ्रान्समधील सराफबाजारांतील भावाप्रमाणें जितक्या फ्रँक्सना विकत मिळूं शकेल तितके फ्रँक्स म्हणजे एक पौंड हें प्रमाण ठरलें. या ठिकाणीं एक गोष्ट निदर्शनास येईल ती अशी कीं, आज ज्या बाजारभावांत हें

प्रमाण ठरलें त्या सराफबाजारांतील भावांत फरक होतांच हें प्रमाण बिघडू शकेल.

आपण असें धरूं या कीं, फ्रान्समधील बाजारभावाप्रमाणें इंग्लिश पौंडांतील २२ कॅरेट शुद्ध सोनें २५ फ्रँक्स व २२ सेंट्स इतक्या किंमतीस मिळत आहे. तेव्हां अशा वेळीं पॅरीस व लंडन यांजमधील देवघेवीच्या व्यवहारांत पौंडास २५ फ्रँक्स २२ सेंट्स हे फ्रेंच नाण्यांतील मोबदल्याचें प्रमाण धरण्यांत येईल. या प्रमाणास मिंट पार ऑफ् एक्सचेंज म्हणजे देशांतील टांकसाळीमार्फत देण्यांत येणारे मोबदल्याचें प्रमाण असें म्हणतात. परंतु याच प्रमाणांत व्यवहार मात्र घडत नाहींत. कारण हें प्रमाण नाण्यां-मधील सोनें या धातूच्या मूळ किंमतीच्या मोबदल्याचें असल्यानें यांत व्यवहारप्रसंगीं रवानगी खर्चाची भर घालण्यांत येते आणि नंतर जें प्रमाण ठरतें तें आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचे हुंडीपत्रामार्फत होणाऱ्या व्यवहारांत नाण्याच्या मोबदल्याचें प्रमाण ठरूं शकतें. आपलें चालू उदाहरण घेऊं या. फ्रेंचांचें टांकसाळमोबदला प्रमाण एका पौंडास २५·२२ असें आहे असें आपण वर धरलेंच आहे. हा झाला मिंट पार ऑफ् एक्सचेंज व यांत इतक्या किंमतीचें सोनें मोबदला म्हणून लंडनला पाठवावयाचें झाल्यास त्यास लागणारा खर्च हा मिळविला पाहिजे. समजा हा खर्च लंडन ते पॅरीस यांचे दरम्यान एक पौंडांत असलेल्या वजनाचें सोनें पोस्टामार्फत रवाना करण्यास १० सेंट्स येतो, तर पूर्वीचा मिंट पार २५·२२ फ्रँक अधिक हा १० सेंट्स म्हणजे २५·३२ फ्रँक्स हा पॅरीस व लंडन यां-मधील एक्सचेंजचा दर ठरतो. प्रत्यक्ष व्यवहारांत दिसणारा एक्सचेंजचा दर कित्येक प्रसंगीं आतांच्या या प्रमाणांत सांपडत नाहीं. याचें कारण पुढें येणारच असल्यानें तूर्त आतां निघालेल्या या प्रमाणास लंडन ते पॅरीस यांमधील एक्सचेंज रेट असें न धरितां त्याला एक निराळेंच नांव देण्यांत येत असतें. तें म्हणजे या प्रमाणास गोल्ड ऑर स्पेसीपॉइंट असें

म्हणतात. म्हणजे निव्वळ सोनें रवाना करावयाचें असल्यास जास्तींत जास्त येणारा खर्च.

या गोल्ड पॉइंटचें मॅक्झीमम् म्हणजे जास्तींत जास्त गोल्ड पॉइंट व मिनिमम् म्हणजे कमींत कमी गोल्ड पॉइंट असे दोन भाग करण्यांत येतात. या दोनपैकीं मॅक्झीमम्संबंधीं सविस्तर माहिती वर दिलीच आहे. मिनिमम्संबंधीं इतकेंच लिहावयाचें कीं, मिंट पार ऑफ् एक्सचेंज म्हणजे चालू उदाहरणांतील आपलें २५·२२ हें प्रमाण यांतून रवानगीखर्च १० सेंटस् कमी केले असतां येणारें प्रमाण म्हणजे २५·१२ फ्रँक्स यास या ठिकाणीं मिनिमम् गोल्ड पॉइंट असें म्हणण्यांत येईल.

———

हुंडणावळ

मागील भागांत गोल्ड अगर स्पेसीपॉइंट, मॅक्झीमम् गोल्ड पॉइंट व मिनिमम् गोल्ड पॉइंट या तिन्हींसंबंधीं थोडीबहुत माहिती आली आहे. गोल्ड पॉइंट अर्थात् टांकसाळ मोबदला प्रमाण, यांत आणखी रवानगी खर्च मिळविला असतां येणारे प्रमाणास मॅक्झीमम् गोल्ड पॉइंट असें म्हणतात. म्हणजे काय तर एका फ्रेंचमनला पॅरीसहून लंडनला एक पौंडाचा मोबदला पाठवावयाचा झाल्यास जास्तींत जास्त २५ फ्रँक्स आणि ३२ सेंट्स खर्च येतो. म्हणून प्रत्यक्ष सोनें पाठविलें असतां जास्तींत जास्त येणाऱ्या खर्चाचें जें प्रमाण त्यास मॅक्झीमम् गोल्ड पॉइंट असें म्हणतात.

टांकसाळ मोबदला प्रमाणांतून रवानगीखर्च वजा जातां येणारें जें प्रमाण त्यास मिनिमम् गोल्ड पॉइंट म्हणतात. ही वजावट कां करावयाची याचा खुलासा होण्याकरितां पुढील एक उदाहरण घेऊं या. समजा एका फ्रेंच व्यापाऱ्यानें लंडनहून कांहीं माल मागविला. अर्थात् या मालाच्या किंमतीपुरता लंडनचा व्यापारी हा या फ्रेंच व्यापाऱ्याचा सावकार ठरतो आणि त्यास याजपासून घेणें असलेली रक्कम त्यानें मागविली असतां यानें पाठविली पाहिजे हें उघड आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारांत उत्पन्न होणारीं अशा तऱ्हेचीं देणी घेणीं हीं सदैव मागून घेण्यांत येतात असें नाहीं कारण व्यापारानिमित्त कित्येक प्रसंगीं या लंडनच्या व्यापाऱ्यासही पॅरीसला खरेदीकरितां जावें लागतें आणि अशा समयाविषयीं बरीच खात्री असल्यास हा ब्रिटिश व्यापारी पॅरीसमध्यें त्याला घेणें असलेली रक्कम प्रत्यक्ष लंडनला बोलावून न घेतां तेथेंच म्हणजे पॅरीसला आपले खातीं जमा करून ठेवण्यास सांगतो. परंतु अशा तऱ्हेनें जमाखर्च करण्यांत टांकसाळ मोबदला प्रमाणांत जमाखर्च केल्यास फ्रेंच व्यापाऱ्यास रवानगीरूपी येणाऱ्या खर्चाची बचत झाल्यानें नफाच व्हावयाचा; परंतु हा नफा ब्रिटिश व्यापारी मिळवूं पाहतो

आणि तो त्याला मिळूं देण्यांत फ्रेंच व्यापाऱ्याचें नुकसान होत नसल्यास फ्रेंच व्यापारी त्याचें म्हणणें कबूल करूं शकतो, आणि या कबूलीनंतर होणाऱ्या देण्याघेण्यांत जमाखर्चाच्या मोबदल्याचें प्रमाण जें स्वीकारलें जातें त्यास मिनिमम् गोल्ड पॉइंट म्हणतात.

फ्रेंच व्यापाऱ्यास ब्रिटिश व्यापाऱ्याचा एक पौंड द्यावयाचा झाल्यास टांकसाळ मोबदला प्रमाणान्वयें २५ फ्रँक्स व २२ सेंटस् इतके खिशांतून काढलेच पाहिजेत. आणि एवढ्या किंमतीस विकत मिळणारें सोनें एका पौंडामध्यें असलेल्या सोन्याइतकें असल्यानें तें घेऊन इंग्लंडला रवाना करण्याचे कामीं त्यास रवानगीखर्च म्हणून आणखी दहा सेंट खिशांतून काढले पाहिजेत; म्हणजे त्याला एकूण खर्च २५·३२ इतका येतो. पॅरिस येथें ब्रिटिश व्यापाऱ्याच्या खातीं एक पौण्डाचा मोबदला म्हणून जमा करावयाची रक्कम अर्थात् फ्रेंच नाण्यामध्यें ध्यावयाची म्हणजे त्याच्या खातीं २५·२२ इतकी रक्कम जमा होईल. तो जर पॅरिस येथें खरेदीकरितां आला तर त्यास २५ फ्रँक २२ सेंटस् या व्यापाऱ्याकडे मिळतील. अर्थात् टांकसाळ मोबदला प्रमाणाच्या दृष्टीनें हें जरी बरोबर असलें तरी यांत इंग्लिश व्यापाऱ्याचा तोटा नसला तरी फ्रेंच व्यापाऱ्याचा फायदा आहे. कारण वर दर्शविल्याप्रमाणें ही रक्कम निव्वळ जमा न करतां प्रत्यक्ष मागविली असती तर फ्रेंच व्यापाऱ्यास २५·३२ इतकी रक्कम देणें भाग होतें. तेव्हां आतां फ्रेंच व्यापाऱ्याला तितक्याच खर्चात आणून रक्कम तर फ्रेंच नाण्यांतच पॅरिस येथें जमा करून ठेवावयाची या उद्देशानें इंग्लिश व्यापारी जमाखर्चाचें जें प्रमाण सुचवितो तेंच प्रमाण मिनिमम् गोल्ड पॉइन्ट हें होय.

तो फ्रेंच व्यापाऱ्यास असें सुचवितो कीं, तुजकडून मजला येणें असलेली तुझ्या नाण्याप्रमाणें रक्कम २५·२२ फ्रँक्स ही तूं माझे नांवे पॅरीस येथें अमुक बँकेंत भरली असतां मी तुजकडून माझ्या घेण्यापोटीं २५·१२

फ्रँक्स पावले असें समजेन आणि यामुळें तुझ्या खात्यावर फिरणारी १० सेंटसची बाकी तूं शिवाय भरली पाहिजेस. हें तुला कबूल असल्यास मजला घेणें असलेली रक्कम लंडनला न पाठवितां तुजकडे अगर पॅरिसमध्यें मी सांगेन त्या एखाद्या बँकेकडे जमा करून ठेवण्यास मी रुकार देईन.

हें ब्रिटिश व्यापाऱ्याचें म्हणणे मान्य करावयाचें किंवा नाहीं हें ठरवितांना हा फ्रेंच व्यापारी याप्रमाणें मान्य न केल्यास व सरळ लंडनला रक्कम रवाना करण्यांत जो खर्च येईल तो व याचे म्हणण्याप्रमाणें जमाखर्च केला असतां त्याचें नांवें जमा होणारी रक्कम यांचा तुलनात्मक विचार करून जर त्यास यांत जास्त खर्च येत नाहीं असें दिसून आलें तर तो हो म्हणणार. रक्कम रवाना करावयाची झाल्यास जास्तींत जास्त २५·३२ फ्रँक्स खर्च येतो हें वर दिलेंच आहे. आतां याचे म्हणण्याप्रमाणें २५·२२ सेंट्स पॅरीस येथें त्याचे नांवें जमा केल्यास तो २५·१२ सेंटस पावले असें म्हणतो, म्हणजे एक पौंडाचा फ्रेंच नाण्यांतील मोबदला जो २५·२२ फ्रँक्स त्यांत आणखी १० सेंट्स देणें बाकी निघतें; म्हणजे अर्थात् २५·२२ अधिक हे १० सेंट्स बाकी देणें मिळून २२·३२ फ्रँक्स इतकाच खर्च अशा तऱ्हेनें जमाखर्च करण्यांत फ्रेंच व्यापाऱ्यास येतो. तेव्हां यांत त्याचें व्यक्तिशः कांहीं नुकसान होत नसून उलट राष्ट्रीय दृष्टीनें फायदाच आहे. तो कसा तर याप्रमाणें जमाखर्च करून रक्कम पॅरिसमध्यें ठेवून घेण्याचें कबूल न केल्यास तितक्या किंमतीचें सोनें प्रत्यक्ष पाठवावें लागेल म्हणजे राष्ट्रांतील सोन्याच्या शिलकेंत घट होत असल्यानें आणि राष्ट्रांतील बँकर्सजवळ सोन्याचा शक्य तितका मुबलक पुरवठा असणें चांगलें असें ठरत असल्यानें ब्रिटिश व्यापाऱ्याचें म्हणणें मान्य करण्यांत फ्रेंच व्यापारी नुकसानींत येत नसून राष्ट्रीय दृष्ट्या त्याचें हें कृत्य फायद्याचेंच कलम ठरूं शकतें. या ठिकाणीं २५·२२ फ्रँक्स दिले असतां २५·१२ फ्रँक्सचें प्रमाण आलें तें टांकसाळ मोबदला प्रमाणांतून रवानगी खर्च वजा करूनच आलेलें

आहे. हेंच प्रमाण म्हणजे मिनिमम् गोल्ड पॉइंट. म्हणजे हिशेबांत कोणता कमींत कमी आंकडा मुक्रर केला असतां प्रत्यक्ष मोबदला रवाना करण्यांत येणाऱ्या खर्चाइतकाच खर्च येतो तो आंकडा. समजा २५·२२ फ्रँक्स दिले असतां २५·१० फ्रँक्स धरूं असें ब्रिटिश व्यापारी म्हणाला तर मूळ मोबदल्यांत बाकी देणें १२ सेंट्स निघतें; म्हणजे पूर्वी दिलेले २५·२२ फ्रँक्स अधिक हे अद्याप ध्यावयाचे १२ सेंट्स मिळून २५·३४ फ्रँक्स खर्ची पडावयाचे. अर्थात् प्रत्यक्ष सोनें पाठविण्यांत येणाऱ्या २५·३२ फ्रँक्सपेक्षां यांत जास्त खर्च येत असल्यानें हें मान्य करण्यांत येणार नाहीं.

वरील सर्व विस्तृत विवेचनावरून टांकसाळ मोबदला प्रमाण (मिंट पार) + रवानगी खर्च = मॅक्झीमम् गोल्ड पॉइंट व टांकसाळ मोबदला प्रमाण — रवानगी खर्च = मिनिमम् गोल्ड पॉइंट या प्रमाणांची योग्य कल्पना येईल.

हुंडणावळीचा दर

येथवर टांकसाळ मोबदला प्रमाण (मिंट पार), मॅक्झिमम् गोल्ड पॉइंट व मिनिमम गोल्ड पॉइंट या शब्दसमुच्चयासंबंधीं विस्तृत विवेचन झालें आहे. आतां या सर्व विवेचनावरून ज्या मुख्य विषयाकडे वळावयाचे तो म्हणजे हुंडणावळीचा दर (रेट ऑफ् एक्सचेंज) हा होय. मॅक्झीमम् गोल्ड पॉइंट व मिनिमम् गोल्ड पॉइंट या दोहोंच्या दरम्यान नेहमीं हुंडणावळीचा दर कमी आधिक होत असतो. हुंडणावळीचा दर (रेट ऑफ् एक्सचेंज) म्हणजे ज्या देशांत रक्कम पाठवावयाची असेल त्या देशांतील नाण्यांत ती भरण्यास बँकर अगर दुसरा एखादा अडत्या कबूल झाला असतां आज ही कबुली देतांना आपणांजवळ या कबुलीचा मोबदला म्हणून आपल्या इकडील नाण्यांत तो तिकडील एका नाण्याच्या बरोबर म्हणून जितकी रक्कम मागतो त्या रकमेस हुंडणावळीचा दर असें म्हणतात. उदाहरणार्थ इंग्लंडांत एक पौंड भरण्याचें कबूल करणारा मुंबईचा एखादा

बँकर जर याबद्दल मोबदला म्हणून १३ रुपये १० आणे मुंबईस मागूं लागला तर लंडन ते मुंबई यांचे दरम्यान हुंडणावळीचा दर एका पौंडास १३ रुपये १० आणे आहे असें म्हणण्यांत येतें. या दरानें १३ रुपये १० आणे येथें भरले असतां बँकर आम्हांला इंग्लंडांत एक पौंड मागण्याचा जो अधिकार देतो अथवा दुसऱ्या शब्दांत तेथें आमच्याकरितां एक पौंड भरण्याची जी कबुली अथवा हमी देतो ती कबुली अथवा तो अधिकार म्हणजे त्यानें त्याच्या लंडन येथील शाखेवर अगर अडत्यावर काढलेली व आपल्या नांवची केलेली हुंडी (ड्राफ्ट) होय. अशा तऱ्हेचे व्यवहार बँकर्स सदैव करितात.

एक्सजेंच बँक या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या बँका हा धंदा करतात आणि या धंद्याच्या पद्धतीप्रमाणें ते आपल्या शाखांतून इतर ठिकाणच्या देशांतील नाण्यांत मोठमोठाल्या रकमा पाडून ठेवतात. वरील उदाहरणांत दर्शविल्याप्रमाणें मुंबईचा बँकर त्याच्या लंडनच्या शाखेमध्यें असलेल्या रकमेंतून एक पौंड दिला जाण्याची व्यवस्था केवळ हुंडीपत्राचें एक चिठोरें लिहून करतो म्हणजे तो तेथल्या तेथेंच जमविलेल्या रकमेंतून ती रक्कम देण्याचें भागवीत असल्यानें मुंबईस आमच्यापासून घेतलेल्या रकमेनें मागील विवेचनांत दर्शविलेल्याप्रमाणें कांहीं प्रत्यक्ष सोनें घेऊन इंग्लंडास रवाना करीत नाहीं. अर्थात् हुंडणावळीच्या दरामध्यें जे मिंट पार + रवानगीखर्च असें दोन भाग आहेत त्यांपैकीं रवानगी खर्चाचा भाग व्यवहारांत वास्तविक असण्याचें कारण नाहीं असें दिसतें. परंतु बँकेकडून सांगण्यांत आलेला १३ रुपये १० आणे हा दर टांकसाळ मोबदला प्रमाण + रवानगीखर्च मिळूनच सांगण्यांत आलेला असतो. म्हणजे रवानगी खर्चाचा हा भाग बँकरच्या उत्पन्नाची बाब होय. याशिवाय असा ड्राफ्ट अगर हुंडी देण्याबाबत बँक अलाहिदा कमिशन घेते तें निराळेंच. याप्रमाणें स्थिति असतांनाही इतकी रक्कम भरण्यास आपण कां तयार असतों, तर बँकरनें

हें काम करण्याचें नाकारल्यास आपणांला प्रत्यक्ष सोनें रवाना करतांना रवानगीखर्च हा भरावा लागणारच. तेव्हां आपण रवानगीखर्च पोस्टखात्याला मिळतो अथवा बँकेला मिळतो या प्रश्नाकडे विशेषसें लक्ष न देतां बँकर मध्यस्थी नसतां एक पौंडाचें लंडनच्या व्यापाऱ्याचें देणें देण्यास आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या पद्धतीनुरूप व्यवहार करण्यांत आपणांस जो खर्च येतो, त्यापेक्षां बँकरमार्फत व्यवहार करण्यांत जास्त खर्च येतो कीं काय एवढेंच पाहतो; आणि म्हणूनच वर दिल्या प्रमाणें बँकरकडून मागण्यांत येणारा एक्सचेंज रेट (हुंडणावळीचा दर) मॅक्झिमम् गोल्ड पॉइंटचे आंत अगर जवळ जवळ असतो.

हुंडणावळीचा दर म्हणजे काय याची पूर्ण कल्पना येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून येत असल्यानें आतां यापुढें हुंडणावळीचे दर गोल्ड पॉइंट-पेक्षां वर जरी जात नाहींत तरी पॉइंटचे कमी अधिक जवळ कां होत असतात अथवा या दरांत फेरबदल कशानें होत असतो ते पाहूं या.

हुंडणावळीचे दर कमी अधिक कां होतात ?

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून हुंडणावळीचा दर म्हणजे काय हें स्पष्ट होत असल्यानें आतां यापुढें हुंडणावळीचे दर गोल्ड पॉइंटपेक्षां जरी वर जात नाहींत तरी त्या पॉइंटचे कमी अधिक जवळ कां होत असतात अथवा या दरांत फेरबदल कशानें होत असतो हें या ठिकाणीं विचारांत घ्यावयाचें आहे.

हुंडीपत्र म्हणजे पैसे मागण्याचा अधिकार होय. हा अधिकार मालाच्या निर्यातीमुळें प्राप्त होत असतो. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत होणाऱ्या आयातनिर्यात व्यापाराचा हा हुंडणावळीच्या दराशीं फार निकट संबंध आहे. जगांतील कोणत्याही राष्ट्रांत केवळ निर्यात अगर आयात व्यापारच चालू आहे अशी परिस्थिति केव्हांही असूं शकणार नाहीं. प्रत्येक राष्ट्रांत कांहीं मालाची आयात असणार व त्याजकडून कांहीं माल निर्यात केला जाणार हें खास. उदाहरणार्थ हिंदुस्थानच पहा.

येथून कापूस, गळिताचीं धान्यें, ताग, खनीज वगैरे माल परदेशी रवाना होतो तर निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामुग्री, चैनीचे इतर कांहीं पदार्थ, कापड, कागद, काडयांच्या पेट्या वगैरे अत्यावश्यक जिनसा परदेशांतून इकडे आणविण्यांत येतात. अशाच तऱ्हेची घडी सर्व राष्ट्रांतून असते. आयात केलेल्या मालाच्या किंमती आपणांस दुसऱ्यास द्यावयाच्या असतात, तर निर्यात केलेल्या मालाच्या किंमती आपणांस दुसऱ्याकडून घ्यावयाच्या असतात. दुसरी अशीही एक परिस्थिति असूं शकते कीं ज्या देशाला आपण माल रवाना करतों त्याच देशांतून आपणांस हवा असलेला माल आपणांस मिळूं शकतो असें नाहीं. तेव्हां ज्या देशाला आपण माल पुरविला त्या देशाकडून आपणांस येणें झालें व ज्या देशाकडून आपणांस हवा असलेला माल आपण आणविला त्या देशाचें आपणांस देणें झालें. अशा तऱ्हेनें एकूण सालभर झालेल्या देशाच्या व्यापारांत शेवटीं येण्या-देण्याची वजावट करतां निघणारी बाकी घेणें निघाल्यास आपण तितक्या प्रमाणांत दुसऱ्या राष्ट्राचे सावकार ठरतों, तर देणें बाकी निघाल्यास आपण दुसऱ्या राष्ट्रांचे ऋणको होतों.

अशा तऱ्हेनें ऋणको व धनकोचीं नातीं उत्पन्न होतात. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या रिवाजाप्रमाणें हें देणें घेणें प्रत्यक्ष सोनें पाठवून अगर मागवून निकालांत काढण्यांत येणार. अर्थात् आपणांस येणें बाकी निघाल्यास तितक्या प्रमाणांत आपल्या ऋणकोच्या देशांतून आपणांस सोनें मागविण्याचा अधिकार प्राप्त होतो. म्हणजेच त्याच्या देशांतील सोन्याला जास्त मागणी आल्यानें व त्याचे देशांत सोन्याचा पुरवठा जेमतेम असल्यास सोन्याचे भाव कडकतात. यावरुन टांकसाळ मोबदला प्रमाणानें जितकें सोनें त्यानें आम्हांला द्यावयास पाहिजे तितकें सोनें विकत घेण्यास त्यास पूर्वी पडत असलेल्या किंमतीपेक्षां जास्त किंमत द्यावी लागेल.

यावरून असें दिसून येईल कीं, देणें असलेल्या राष्ट्रांत देणें फिटेतोंपर्यंत

सोन्याचे भाव पुरवठ्यांत फरक न झाल्यास तेजींत असतात व याचे उलट परिस्थिति घेणें असलेल्या राष्ट्रांत नांदत असते.

अशा तऱ्हेनें आयात निर्यात व्यापारांत उत्पन्न होणाऱ्या देण्याघेण्याची विल्हेवाट लावण्याचे अधिकारविनिमय हुंडीपत्रामार्फत केले जातात. त्यामुळें हुंडीपत्र हाही एक व्यापाराचा जिन्नसच होऊन बसला आहे. आणि या जिनसेचा व्यापार करणारा व्यापारी बँकर होय. एकंदर व्यापारी जिनसांस सदैव लागू असणारा अर्थशास्त्रांतील "मागणी आणि पुरवठ्याचा" सिद्धान्त अर्थात् आतां या हुंडीपत्ररूपी व्यापारी जिनसेलाही लागू होणार. या जिनसेचे सवदे ज्या पेठेंत केले जातात त्या पेठेला मनीमार्केट अगर नाणेंबाजार असें म्हणतात. या नाणेंबाजारांतील एकूण परिस्थितीवर हुंडीपत्राच्या खरेदी विक्रीचें प्रमाण अवलंबून असतें. निर्यात व्यापारामुळें घेणें झालेली रक्कम हुंडीपत्रामार्फत वसूल करण्याचा अधिकार आपण बँकेस विकावयास काढतों व तो विकत घेण्यास बँकेपाशीं जितका नाण्यांचा पुरवठा असेल तितक्या प्रमाणांत ती तो विकत घेईल.

जितके रुपये किंमतीच्या हुंड्या आपण विकावयास काढूं तो झाला पुरवठा आणि जितके रुपये किंमतीच्या हुंड्या बँकर विकत घेण्यास तयार असेल ती झाली त्याची मागणी. यांत बँकरला हव्या असलेल्या हुंडीपत्रापेक्षां जास्त हुंडीपत्रें बाजारांत आल्यास बँकर कमी किंमत देणार अथवा उलट बोलावयाचें म्हणजे जास्त मोबदला मागणार आणि त्याला हव्या असलेल्या संख्येपेक्षां हुंडीपत्रांची संख्या बाजारांत कमी असल्यास तो जास्त किंमत देऊं करणार अगर उलट बोलावयाचें म्हणजे कमी मोबदल्यांत काम पत्करणार. आणि हे मोबदल्याचे दर म्हणजे हुंडणावळीचे दर होत. या सर्व विवेचनावरून हुंडणावळीचे दर मॅक्झीमम् गोल्ड पॉइंटच्या कमी अधिक जवळ होणें, आयातनिर्यात व्यापारामुळें निघणारें येणें अगर देणें व देशांतील नाणें बाजाराची परिस्थिति यांवर अवलंबून असतें हें वाचकांच्या ध्यानीं येईल.

नामांतर–एन्डॉर्समेंट

आतांपर्यंतच्या भागांत ज्या चेक, हुंडी, बिल ऑफ एक्सचेंज, डिमांड ड्राफ्ट, प्रॉमेसरी नोट, वगैरे बँकेच्या व्यवहारांच्या साधनांचा उल्लेख झाला आहे तीं सर्व साधनें निरनिराळ्या शर्तीनें पैसे मागण्याचें अधिकार आहेत. तथापी ही व्यापारी विनिमयाची निरनिराळीं साधनें एक प्रकारची मालमत्ता (प्रापर्टी) असते व तिची मालकी त्या त्या कागदांतून पृष्ठ भागावर निदर्शित केलेल्या इसमांची असते; आणि असे हे मालकी हक्क बेचन करता येतात व ते करण्याची जी रीत अथवा कृती तिला " नामांतर " (एन्डॉर्समेंट) असें म्हणतात.

कोठल्याही निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटवर त्याचा कर्ता म्हणजे ड्रॉअर अगर मेकर व्यतिरिक्त इतर कोणीही सदर कागदाची मालकी दुसऱ्याच्या नांवची करण्यादाखल सदर कागदावर जेव्हां आपली सही करतो तेव्हां त्यास ' एन्डॉर्स ' (नामांतर) करणें असें म्हणतात, व अशा सही करणाऱ्यास एन्डॉर्सर–नामांतर कर्ता–असें म्हणतात. नामांतर संबंधीत व्यक्तीकडूनच असलें पाहिजे; इतरांचे चालणार नाहीं. नामांतराखेरीज सदर कागद नामांतर कर्त्यानें प्रत्यक्षांत नामांतरीताच्या (एन्डॉर्सी) स्वाधीन केलेले (डिलिव्हरी) असलें पाहिजे.

अशा या विनिमयाच्या साधनाच्या (Negotiable Instrument) मागील बाजूस ज्यावेळीं पेई अथवा धारण करणारा (होल्डर) फक्त आपली सही करतों परंतु सदर कागद ज्या कोणास देऊं केला असेल त्याच्या नांवाचा उल्लेख करीत नाहीं अशावेळीं यास ब्लँक एन्डॉर्समेंट (मुग्ध नामांतर) अथवा जनरल एन्डॉर्समेंट असें म्हणतात. अशा नामांतराचा परिणाम सदर कागद ' बेअरर ' होण्यांत होतो आणि अशा कागदाची मालकी प्रत्यक्ष

ताब्यानें सिद्ध होतें. पेईनें अथवा नामांतरीतानें आपली नुसती सही करून एखादा चेक बँकेकडे पटविण्यास दिला असतां त्या सहीचा अर्थ नामांतर नसून पावतीदाखल सही असा केला जातो.

या उलट मागील बाजूस दुसऱ्या कोणाचें नांव लिहून त्याखालीं मूळ धारण करणाऱ्यानें (पेई) अगर नामांतरीतानें (एन्डॉर्सी) आपली सही केल्यास त्याचा अर्थ सदर साधनाची मालकी या नवीन इसमाचें नांवानें नामांतरीत करण्यात आली आहे. उदा. ' ना. स. मोडक यांस अगर ते सांगतील त्यास देणें ' असा शेरा मारून त्याखालीं सही करणें. यास नामातरादाखल शेरा अगर स्पेशल एन्डॉर्समेंट किंवा एन्डॉर्समेंट–इन–फुल असें म्हणतात. अशा तऱ्हेचा हा कागद नामांतरानेंच आणि प्रत्यक्ष ताबा देऊन एका हातून दुसऱ्याच्या हातीं (निगोशिएट) जाऊं शकतो.

नामांतरीत इसमाला पुन्हां दुसऱ्याचें नांवानें नामांतर करतां येऊं नये; फक्त त्यानेंच त्या कागदान्वयें पैसे घ्यावेत, अशी मनीषा असल्यास त्याकरितां ' ना. स. मोडक यांसच पैसे द्यावे ' असा शेरा मारला पाहिजे. यास रिस्ट्रीक्टीव्ह एन्डॉर्समेंट (मर्यादित नामांतर) असें म्हणतात.

अशा या विनिमयाच्या साधनाशीं जेवढे इसम नामांतरानें निगडीत होतात ते सर्व एकमेकांला कायद्यानें जबाबदार धरले जातात. तेव्हां ज्या कोणाला अशी कायद्यानें येणारी जबाबदारी घ्यावयाची नसेल त्यानें त्या अर्थाचा स्पष्ट शेरा मारून त्याखालीं सही करावी म्हणजे पुढील इसमांना ती लेखी सूचना होते. उदा. " ना. स. मोडक यांस अगर ते सांगतील त्यास देणें मात्र मी जबाबदार राहणार नाहीं. (सॅनस् अगर विदाऊट रिकोर्स) ' यास सशर्त नामांतर (कंडीशनल एन्डॉर्समेंट) असें म्हणतात. असें नामांतर असलेला चेक अगर हुंडी नामंजूर अगर अस्वीकृत झाल्यास त्याबद्दल असा हा नामांतरकर्ता इसम जबाबदार धरला जाणार नाहीं. सर्कीट ऑफ ॲक्शन म्हणजे नामांतरानें तोंच इसम

पुन्हां मालक होत असेल तर अशा त्याच इसमाच्या दोन नामांतरामधील इसमही या जबाबदारींतून सुटतात.

नामांतरादाखल सही करतांना श्रीयुत, मिस्टर, कॅप्टन, डॉक्टर, प्रोफेसर, पंडित, लाला अशा पदव्या लावूं नयेत. उदा. कॅप्टन ना. स. मोडक यांनीं नामांतराखालीं फक्त ना. स. मोडक इतकेंच लिहावें. वाटल्यास सहीचें खालीं असा हुद्दा लिहावा. त्याचा अर्थ वर्णनात्मक होईल. कोण मोडक तर, कॅप्टन असलेले इतकेंच.

एकाद्या कंपनी अगर संस्थेच्या नांवाचा चेक नामांतरीत करतांना त्या त्या संस्थेचें नांव लिहून तिचेकरतां व तर्फे म्हणून शेरा मारून त्याखालीं अधिकृत इसमानें सही करावी. उदा. स्वदेशी माल प्रसारक कंपनी तर्फे व करितां, अरविंद जठार, जनरल मॅनेजर.

चेक काढणाऱ्यानें पेईचें नांव चुकीचें लिहिलें असलें अगर त्याचें नांवाचें इंग्रजी स्पेलिंग चुकीचें केलें असलें तर चेकवर लिहिल्याबरहुकूम नांवानें अगर स्पेलिंगनें सही करून त्याखालीं त्यानें त्याच्या नेहेमीच्या पद्धतीप्रमाणें वाटल्यास सही करावी.

विवाहित स्त्रीचें पतिचें नांवानें चेक लिहिला गेला असल्यास, जसें मिसेस ना. स. मोडक,तर त्यावर सौ. सुधाबाई भ्रतार ना. स. मोडक अशी सही करावी. तसेंच अविवाहित असतानाचें नांवानें चेक असल्यास, जसे कु. अनुसया साने, तर त्यावर सौ. इंदिरा मराठे पूर्वी अनुसया साने (nee ने) अशी सही असावी.

एकापेक्षां जास्त इसमांचे नांवानें चेक लिहिला असल्यास त्यावर सर्वांनीं सह्या केल्या पाहिजेत. परंतु जर " ना. स. मोडक अगर रा. ह. काळे यांस अगर ते सांगतील त्यास द्यावे " अशा तऱ्हेनें चेक काढला असेल तर कोणाही एकानें एन्डॉर्स केलें असतां चालेल. मात्र डिव्हिडंड

वॉरंट जोड नांवानें काढलेलें असल्यास त्यांतल्या पहिल्या नांवाच्या इसमाचीच सही असावी लागते.

भागीदारी मंडळीच्या नांवानें काढलेल्या चेकवरील नामांतरही व्यक्तिगत चेकप्रमाणेंच पेईच्या अगर नामांतरीताच्या नांवाबरहूकूमच असलें पाहिजे. उदा. 'मेसर्स जोशी अँड को.' या नांवानें काढलेल्या अगर नामांतरीत केलेल्या चेकवरील नामांतरांत 'जनार्दन जोशी अँड को.' अशी सही असेल तर ते नामांतर बरोबर नाहीं.

मुखत्यारानें चेकवर नामांतरादाखल सही केलेली असल्यास पैसे देणाऱ्या बँकरनें अशा मुखत्यारास रीतसर अधिकार आहे कां नाहीं हें पाहण्याची जरूरी नाहीं. परंतु निदान सहीवरून मुख्य मालकातर्फे नामांतर होत आहे एवढी दखलगिरी बँकेनें घेतलीच पाहिजे. उदा. दि बार्शी कॉटन कंपनी यांस देऊं केलेल्या चेकवर 'फॉर दि बार्शी कॉटन कंपनी, हरीभाऊ किबे, सेक्रेटरी' असा शेरा बरोबर ठरेल. 'तर्फे व करितां' म्हणून संस्थांच्या बाबतींत सही करणेंच योग्य. कोर्टाल्ड वि. सॉंडर्स या खटल्यांत कोर्टानें असा निर्णय दिला कीं एका प्रॉ. नोटवर "आम्ही वचन देतो कीं" वगैरे प्रॉ. नोटीचा मजकूर लिहून त्याखाली अशा सह्या केल्या.:—

जे. ब्राऊन } क्ष कंपनी लि.चे डायरेक्टर्स
जे. स्मिथ }

जे. टेलर : मॅनेजर

तरी ही नोट व्यक्तींची आहे आणि ते व्यक्तिशः जबाबदार आहेत. हुद्दा हे केवळ वर्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) ठरले.

मुखत्यारी अधिकारांत सही असली म्हणजे सहीचें खालीं मुखत्यारीचा हुद्दा निदर्शीत केला पाहिजे. परंतु 'पर प्रोक्यूरेशन' सही करण्यात अधिकृत असा आरंभीच निर्देश असल्यानें मुखत्यारीचा हुद्दा नसला तरी

चालतो. उदा. 'पर प्रो. दि बार्शी कॉटन कंपनी हरीभाऊ किबे' ही सही बरोबर ठरेल. 'फॉर दि बार्शी कॉटन कंपनी हरिभाऊ किबे' ही सही बरोबर ठरणार नाहीं. परंतु किबेनें आपल्या सही खाली आपला 'सेक्रेटरी' अथवा 'मॅनेजर' असा हुद्दा लिहिला तर मात्र रास्त ठरेल. मात्र अशा तऱ्हेनें नमूद करण्यांत येणारा हुद्दा अशा स्वरूपाचा असावा कीं ज्यांस कायद्यानें अथवा प्रस्थापित रिवाजानें अशी आपल्या मालकास बंधनकारक होणारी सही करण्याचा अधिकार असूं शकतो. सेक्रेटरी, मॅनेजर, डायरेक्टर, हें हुद्दे असें अधिकृत मुखत्यारीचें निदर्शक समजले जातात.

लिमिटेड कंपनीतर्फे कॅशियरनें आपला हा हुद्दा देऊन चेकवर सही केली असल्यास कांहीं बँकर्स ती पत्करतात तर कांहीं पत्करत नाहींत.

कोणत्याही मुखत्याराला आपला मुखत्यारी अधिकार दुसऱ्यास देतां येत नाहीं आणि म्हणून मुखत्यारातर्फे निदर्शक सही असेल तर ती मुळींच चालणार नाहीं. उदा.—फॉर दि पुणें बँकिंग कंपनी, ह. वि. जांभेकर प्रो. मॅनेजर.

विश्वस्तांना (ट्रस्टीज) देऊं केलेला चेक असल्यास त्यावर सर्व विश्वस्तांनीं सह्या केल्या पाहिजेत. एका ट्रस्टीनें त्याच्या सहकारी ट्रस्टीतर्फे अथवा पर प्रो. शेरा मारून केलेली सही चालणार नाहीं. एक्झीक्युटर्सचे बाबतींत मात्र एका एक्झीक्युटरनें "आपणा स्वतःतर्फे व आपल्या सहकाऱ्यांतर्फे" अशा अर्थाचा शेरा मारून सही केली असतां चालते.

पेई निरक्षर असल्यास त्याची सही निशाणी स्वरूपांत असते. उदा. "महिपती रामजी देशमुख याचे डाव्या हाताचा आंगठा" असें म्हणून त्याखालीं त्याचा अंगठा पॅड शाईनें उठवावयाचा व त्याखालीं सदर इसमास ओळखणाऱ्या दुसऱ्या साक्षर इसमानें आपली सही साक्ष म्हणून करून त्याखालीं स्वतःचा पत्ता द्यावयाचा असतो.

कित्येकवेळीं चेक पेईच्या संपूर्ण नांवानें काढलेला असतो. उदा. ' हरी विनायक देशमुख ' अशावेळीं मागील बाजूस ह. वि. देशमुख अशी सही केली असतां ती चालेल कां नाहीं ? इंग्लंडमध्यें असा रिवाज आहे कीं नामांतरांत पहिली नांवें आद्याक्षरीं व शेवटलें नांव संपूर्ण अशी सही असल्यास ती पत्करावी. म्हणून वरील ह. वि. देशमुख ही सही इंग्लंडमध्यें पत्करिली जाते. हिंदुस्थानांत मात्र अद्याप याबाबत सार्वत्रिक निश्चित धोरण नाहीं. हिंदुस्थानांतील कांहीं भागांत व वर्गांत संपूर्ण नांव लिहिण्याची पद्धत आहे. म्हणून सरांस आद्याक्षरांच्या सहीला मान्यता देणें बॅंकर्सना अवघड जात असावे.

संस्थांच्या अधिकाऱ्याचें हुद्द्यानें कित्येक वेळां चेक काढला जातो. जसे ' सेक्रेटरी अगर प्रिन्सिपॉल, लॉ कॉलेज. अशावेळीं ' क्ष , सेक्रेटरी, लॉ कॉलेज ' अशी सही चालेल. परंतु संस्थेचा चेक आहे असा ह्या ठिकाणी विशेष ग्राह्यांश असल्यानें लॉ कॉलेजतर्फे व करितां, क्ष, सेक्रेटरी अशी सही जास्त रास्त ठरेल.

——

नाणें

बँकेच्या व्यवहाराचें जें मुख्य साधन ' नाणें ' अथवा पैसा, त्या विषयीं आतां उहापोह करूं. आतांपर्यंतच्या भागांत ज्या चेक, हुंडी, डिमांड ड्राफ्ट, वचन चिठ्ठी, वगैरे साधनासंबंधी माहिती दिली ती साधनें प्रत्यक्ष नाणें अथवा पैसा नसून पैसा अथवा नाणें मागण्याचें अधिकार आहेत. (Property in action) असें हें अधिकार व्यापारी विनिमयाची निर-निराळी साधनें आहेत व व्यापारी वर्गानें ती वेळोंवेळीं अस्तित्वांत आण-लेली असल्यानें त्यांस ' मर्कन्टाईल करन्सी ' म्हणजे ' व्यापारी विनिमयाची साधनें ' असें म्हणतात. परंतु अखेरपक्षी ही साधनें प्रत्यक्ष नाणें अथवा पैसा यामध्येंच रुपांतरीत व्हावयाची असतात. ही सर्व साधनें पतीवर (क्रेडीट) अवलंबून आहेत. परंतु ही पत मुख्यतः ज्या नाण्यांच्या संचयावर अवलंबून असते त्या नाण्यांच्या पुरवठ्याची जबाबदारी राजसंस्थेवर म्हणजे सरकारवर असते. आणि म्हणून देशांतील नानाविध विनिमयाच्या शक्यते-करितां सरकारकडून राष्ट्रांत नाण्यांचा पुरवठा होत असतो. सरकारतर्फे होणाऱ्या अशा या विनिमयाच्या साधनांच्या पुरवठ्यास सरकारी चलन (करन्सी) असें म्हणतात. तेंव्हां देशांत विनिमयाची जीं साधनें आहेत त्यांचे दोन भाग होतात. एक सरकारनें पुरविलेलें सरकारी चलन व दुसरें व्यापारी वर्गानें अस्तित्वांत आणलेले व्यापारी चलन. परंतु हें वस्तुतः दोन भाग नसून आकृती व सावली याप्रमाणें त्यांचा अन्योन्य संबंध आहे. मुख्य विनिमयाचें साधन नाणेंच.

नाणें अस्तित्वांत येण्यापूर्वी समाजांत होणारे व्यवहार जिनसेला जिन्नस देऊन म्हणजे बार्टर पद्धतीनें होत असत. ही पद्धत वाढत्या व्यापारास गैर सोईची ठरल्यानें अशी एक जिन्नस शोधून काढावयाचें ठरलें कीं त्या जिनसेचा उपयोग देवघेवीच्या व्यवहारांत स्वसंतोषानें सदैव दिला

घेतली जाणारी वस्तू असा व्हावा. या कामी अनेक सजीव व निर्जीव वस्तूंची योजना व पारख करण्यांत येऊन शेवटीं या कामीं उत्कृष्ट वस्तू म्हणजे सोनें ही धातू होय असा अनुभवांती निष्कर्ष निघाला.

बार्टर (वस्तू-विनिमय) पद्धतींत अनेक दोष आहेत. परंतु ती सर्वांनाच निरुपयोगी आहे कां कांहीं विशिष्ट राष्ट्रांना निरुपयोगी व कांहींना फलदायी होण्याचा संभव आहे, हाही विवाद्य मुद्दा आहे. तसेंच बार्टरचें पूर्ण उच्चाटन करून उठतां बसतां पैशावर व्यवहाराची उभारणी करणें हितावह का अंशतः बार्टर व अंशतः नाणें अशा द्विपद्धतीवर व्यवहाराच्या विनिमयाची उभारणी करणें हितावह, असाही विवाद होऊं शकेल. इंडस्ट्रियल इकॉनमी व शहरानिहाय लोकवस्ती ज्या राष्ट्रांत प्रामुख्यानें आहे त्या राष्ट्रांतील विनिमयाचें साधन निव्वळ नाणें कदाचित समाधानकारक ठरेल. परंतु ॲग्रीकल्चरल इकॉनॉमी व खेडोपाडी प्रमुख लोकवस्ती ज्या राष्ट्राचें प्रमुख अधिष्ठान आहे त्या राष्ट्राला ती तितकीच मानवेल किंवा कसें हा विवाद्य मुद्दा आहे. या सर्वांचें विवरण–विवेचन करण्याचें हें स्थान नाहीं. आजच्या आपल्या जगांत सरकारमान्य नाणें हेंच विनिमयाचें प्रमुख साधन ठरलें असल्यानें व ज्या बँकेच्या व्यवहारांच्या साधनांचा या ठिकाणीं उहापोह होत आहे, त्या सर्वांत प्रमुख साधन नाणेंच असल्यानें त्यासंबंधींच उहापोह करूं या.

ज्या कोणत्याही वस्तुचा नाण्याचें कामीं उपयोग करावयाचा असतो तिचें अंगी कमीत कमी सात गुण असावे लागतात. आणि या सात गुणांनीं युक्त अशा वस्तूपासून केलेल्या नाण्यानें जी कामगिरी बजवावयाची आहे ती तीन प्रकारची असते. ते तीन प्रकार असेः—

१ विनिमयाचें अथवा आदान–प्रधानाचें साधन. A medium of exchange.

२ पदार्थ–मूल्य माप अथवा परिमाण. Measure of value.

३ विलंबित भरणा अगर वसूलीचें कामी प्रमाण मूल्यमान.
Standard of value for deferred payments.

या तिन्ही प्रकारची कामगिरी करतां येण्यास ज्या सात गुणधर्मांची आवश्यकता आहे तें असें:—

१ वस्तूचें स्वयंभू मोल. Value of material.

(मोल उपयुक्ततेवर (utility) अवलंबून असतें, ज्या वस्तूची उपयुक्तता जास्तीत जास्त समाजाला पटलेली अथवा परिचित असेल त्या वस्तूला स्वयंभू मोल असते. उपयुक्तता जितकी जास्त तितके स्वयंभू मोलही जास्त.)

२ सहजगत्या वागवितां येण्याची शक्यता. Portability.

३ अविनाशिता. Indestructibility.

४ एकजिनसीपणा. Homogeneity.

५ विभाज्यता. Divisibility.

(मूल्यनाश न होतां विभागितां येणें.)

६ पदार्थ-मूल्य स्थिरता. Stability of value.

७ शीघ्र बोद्धव्य. Cognisability.

(सहजगत्या परीक्षा करतां येण्याजोगे.)

विनिमयाचें साधन या नात्यानें अनुक्रम २,३,४,५, व ७ चें गुणधर्म असलेच पाहिजेत. वास्तविक पहिला जो स्वयंभू मूल्याचा गुणधर्म तोही असावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत दिसणाऱ्या विविध प्रकारच्या नाण्यांपैकीं कांहींत या गुणधर्माचा अभाव दिसून येतो आणि म्हणून असें वाटतें कीं याची विशेष मातब्बरी नसावी. आज काल व्यवहारांत प्रामुख्यानें फिरणारी चलनी-नोट लक्षांत घेतां असा साहाजिक प्रश्न येतो कीं या नाण्याला स्वयंभू किंमत अशी काय आहे? परंतु हें वरवर जरी खरें भासत असलें तरी ही चलनी नोट ज्या एका मुख्य वस्तूचें

प्रतीक आहे अगर ज्या एका प्रकारच्या पतीचें साधन आहे तीं मुख्य वस्तू अथवा पत ही ज्या मूळ सुवर्णाच्या साठ्यांवर अगर सुवर्ण मागण्याच्या हक्कावर अवलंबून आहे त्या साठ्याला कां होईना स्वयंभू मूल्य आहे. असो. अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार स्वयंसिद्ध मूल्य नसलेल्या वस्तूरूपी नाण्याचाही प्रसार कांहीं एका विशिष्ट परिस्थितीत मोबदल्याचें विशेषसें नुकसान न होतां चालूं शकतो. या सिद्धांतावर प्रामुख्यानें चलनी नोटांची उभारणी आहे. हाही प्रश्न मोठा गुंतागुंतीचा व प्रदीर्घ उहापोहाचा असल्यानें त्याचा या ठिकाणी इतकाच नामनिर्देश करणें प्राप्त आहे.

अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार व परिस्थितीनुरुप आज निरनिराळ्या देशांतून विनिमयाचें सरकार मान्य साधन म्हणून प्रचलित असलेल्या नाण्यांमध्यें सुवर्णाची, चांदीची, तांब्याची, निकलची, व कागदाची अशी नाणीं प्रचारांत आहेत. हें सर्वच प्रकार प्रत्येक देशांत आढळणार नाहींत. पण बहुतांशी दोन–तीन प्रकार प्रत्येक राष्ट्रांत पहावयास सांपडतील. ही एक प्रकारची भिन्नता झाली. दुसरी भिन्नता त्या त्या नाण्याच्या नव्या जुन्या स्वरूपांमुळें अस्तित्वांत येते. त्यामुळें राष्ट्रांत एकाचवेळीं भिन्न स्वरूपाची, भिन्न दर्जाची, भिन्न धातूंची, कमी अधिक वजनाची व मोलाची, अशी नाणी प्रचारांत असण्याचा संभव असतो व तें अगदी साहाजिक आहे. अशा या परिस्थितींत लबाडांचे फावते व गरिबांना भोंवते. तेव्हां राज्यकर्त्यांना मार्गदर्शन म्हणून ग्रेशॅम नांवाच्या प्रसिद्ध अर्थ-शास्त्रज्ञानें कांहीं सिद्धांत मांडले. ते ग्रेशॅम्स् लॉ (ग्रेशॅमचें सिद्धांत) म्हणून प्रसिद्ध आहेत. ते तीन आहेत. परंतु वस्तुतः तो एकच सिद्धांत आहे व तीन निरनिराळ्या वस्तूस्थिती सापेक्ष अशा तऱ्हेनें मांडला आहे. तो सिद्धांत हा कीं " राष्ट्राच्या चलनांत भिन्न भिन्न प्रकारची नाणीं असल्यास त्यांतील वाईट ही प्रचारांत राहतील व चांगली ती गुप्त होतील."

म्हणजे वाईट चांगल्याला हाकालते. या ठिकाणी चांगले व वाईट हें सापेक्षतेनें ठरवावयाचें आहे. त्यानें एक गोष्ट निःसंदिग्धपणें प्रतिपादिली आहे ती अशी कीं राष्ट्रांत वावरणारे नाणें ज्यास्तित जास्त निरोगी, स्वयंसिद्ध आणि आवश्यक तेवढेंच असले पाहिजे. तें जास्तही असतां कामा नये किंवा अपुरेही पडतां कामा नये. आणि याची दक्षता प्रामुख्यानें राज्यसंस्थेनें हमेश घेतली पाहिजे. तरच आर्थिक समाज–स्वास्थ्य साध्य होईल आणि राष्ट्र सुसंपन्न होऊं शकेल.

सर टॉमस ग्रेशॅम हा इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या कारकीर्दींत होऊन गेला. तो तिचा आर्थिक सल्लागार होता. लंडनमधील रॉयल एक्सचेंज त्यानेंच स्थापन केली. याच्या ज्या तीन सिद्धांतांचा वर उल्लेख आला आहे ते पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

ग्रेशॅमचा पहिला सिद्धांतः–जर एकाच धातूची नाणीं, परंतु भिन्न वजनाची व दर्जाची, त्याच दर्शनी किंमतीनें, एकत्रित प्रचारांत असतील तर त्यांपैकी वाईट नाणीं चांगल्या नाण्यांना प्रचारांतून घालविण्यास कारणीभूत होतील; मात्र चांगली नाणीं वाईटांना कदापि घालविणार नाहींत.

ग्रेशॅमचा दुसरा सिद्धांतः–जर दोन मूल्यवान् धांतुची नाणीं एकमेकांशी विनिमयाच्या सरकार–नियमित प्रमाणानें प्रचारांत असतील, तर त्यांपैकीं जी धातू बाजारांत तात्पुरती स्वस्त होईल, तिचीं नाणीं दुसऱ्या धातुच्या नाण्यांना प्रचारांतून घालविण्यास कारणीभूत होतील.

ग्रेशॅमचा तिसरा सिद्धांतः–जर अपरि-वर्तनीय कागदी चलन वाजवी-पेक्षां जास्त प्रमाणांत काढण्यांत व प्रचारांत आलें तर तें धात्वात्मक नाण्यांना प्रचारातून घालविण्यांस कारणीभूत होईल.

थोडक्यांत तिन्हीं सिद्धांतांचें सार असें कीं ज्याअर्थीं चांगल्या व वाईट दोन्हीपैकीं कोणत्याही नाण्याच्या किंवा चलनाच्या मोबदल्यांत ती

किंवा तितकीच वस्तू मिळत आहे किंवा तितकीच कर्जफेड होत आहे त्याअर्थी मनुष्यस्वभानुरूप त्यांतील चांगले नाणें जवळ ठेवून घेऊन मोबदल्यांत किंवा कर्ज फेडीत द्यावयास वाईट नाणें पुढें केलें जाणार. म्हणजे चांगले (मौल्यवान्) नाणें वापरांत न ठेवतां वाईट (स्वस्त) नाणें वापरांत (बाजारांत) ठेवण्याकडे स्वाभाविक प्रवृत्ति असते. वाईट चलनाचें व्यापारावर व अर्थव्यवस्थेवर अनिष्ठ परिणाम होतात. म्हणून दखलगिरी घेणें क्रमप्राप्त असते व त्याकरितां मार्गदर्शनार्थ हें सिद्धांत आहेत.

नाण्यांचा जागतिक इतिहास पाहतां त्यात अनेक स्थित्यंतरें होत आलेली आहेत. सुरुवातीला एकाच विशिष्ठ धातूची नाणीं प्रचलित असल्याचें दिसून येतें. त्या प्रकाराला एक चलन पद्धती (Monometallism) म्हणतात. कालांतरानें दोन धातूंचीं नाणीं प्रचारांत आलीं व त्या पद्धतीला द्विचलन पद्धति (Bimetallism) म्हणतात. पुढें धातुरूपी नाण्यांच्या जोडीला कागदी चलनरूपी नाणें प्रचारांत आलें व तें म्हणजे हल्लीच्या चलनी नोटा होत. परंतु तें कांहीं कोणत्या धातूच्या स्वरूपांत नसल्यामुळें त्रिचलन पद्धती असें कांहीं म्हणतां येत नाहीं. तथापि ही शुद्ध द्विचलन पद्धती जरी नसली तरी प्रमाणशीर द्विचलन पद्धतीच आहे. कारण प्रत्यक्षांत जें कागदी चलनी नाणें आहे त्याची सर्व इमारत प्रमाणित सुवर्णसांठ्याच्या पायावरच उभारलेली असल्यानें कागदी चलन हें सुवर्ण चलनाचेंच एक रूप ठरतें. आणि म्हणून जगांत सुवर्ण व चांदी या दोन धातूंचींच प्रमुख नाणीं विनिमयाकरितां असल्यानें आज शुद्ध समान द्विचलन पद्धती (Parallel Bimetallism) जरी अंमलांत नसली तरी अंशात्मक द्विचलन पद्धती (Ratio Bimetallism) अंमलांत आहे.

सुवर्ण व चांदी यापैकीं सुवर्णाचे अंगीं नाण्याचें सातही गुण असून चांदीचे अंगी सहा आहेत. म्हणून सुवर्णाला पहिला नंबर व चांदीला दुसरा नंबर प्राप्त झाला. तेव्हां सातही गुणांनीं युक्त अशा सुवर्णाचें

चलन असणें हेंच खरें सुदृढ चलन. तसेंच राष्ट्रांत निरनिराळ्या व्यक्तींच्या निरनिराळ्या प्रकारच्या गरजा व निरनिराळ्या प्रकारची प्राप्ती असल्यानें लहानमोठ्या दर्जाचीं नाणीं असणें अवश्यक असतें. याकरितां वरिष्ठ नाणीं सुवर्णाचीं, मध्यम नाणीं चांदीचीं व कनिष्ठ नाणीं निकेल–तांब्याचीं अशीं प्रचारांत असतात. परंतु तीं सर्व सुवर्णाचीं अंशात्मक प्रतीक आहेत.

समाजाला आवश्यक असणाऱ्या नाण्यांचा पुरवठा समाजाच्या वाढत्या आशा–आकांक्षांना अगर गरजांना पुरेसा होण्याचें दृष्टीनें सर्वस्वी धात्वात्मक चलनावर अवलंबून समाधानकारक करणें अशक्य आहे. परंतु पुरेसा पुरवठा व्हावयास पाहिजे आणि तो राजसंस्थेनें करावयासच पाहिजे. अन्यथा राष्ट्राचे आर्थिक व्यवहार स्तंभित होतात. यापैकीं धात्वात्मक नाण्यांचा पुरवठा करणें जगांतील सोन्याचांदीच्या खाणींतून होणाऱ्या पुरवठ्यावर अवलंबून असल्यानें व त्याबाबत त्या त्या धंद्याच्या मोसमाचा, मालकीचा व शक्यतेचा प्रश्न निगडीत असल्यानें राजसंस्थेला प्रसंगोपात् स्वतःची पत कामीं आणून आवश्यक त्या चलनांचा पुरवठा करणें प्राप्त होतें आणि अशा तऱ्हेनें राजसंस्थेनें आपल्या पतीवर उभारलेलें जें नाणें तेंच कागदी चलन (Currency Notes) होय. शिवाय कागदी नाणें वापरल्यामुळें नाण्यासाठीं सोनें, चांदी या धातु कमी लागून त्यांचा समाजोपयोगी इतर बाबींकडे जास्त उपयोग होऊं शकतो. तसेंच धात्वात्मक नाण्यांचें बाबतीत वापरामुळें होणाऱ्या झीजेनें येणारें नुकसान–घसारा–टाळतां येतें. हा एक महत्वाचा मुद्दा कागदी चलनाच्या प्रसाराला अनुकूल म्हणून दाखवितां येतो.

———

कर्जाऊ रक्कम देणें

प्राचीन काळीं ठेवीची रक्कम बँकर्स आपापल्या दुकानांतील माल खरेदी करणें, घरें, जमिनी वगैरेंच्या तारणावर कर्जाऊ देणें, सरकारला कर्जाऊ रकमा देणें वगैरे प्रकारांनीं अडकवीत असत. आधुनिक काळांतील बँकिंगच्या धंद्यांत मुदतीच्या ठेवीचें खातें (फिक्स्ड डिपॉझीट अकाऊंट) या नांवावर मोडला जाणारा जो बँकिंगचा व्यवसाय त्या व्यवसायाशीं सदृश असे प्राचीन पेढ्यांचे (बँकर्स) व्यवहार असत. अलीकडील बँकर्सच्या करंट अकाऊंट (चालू खातें) बँकिंगच्या पद्धतीचें अनुकरण करण्यास योग्य अशी अनुकूल परिस्थिति त्या वेळीं कर्जाऊ दिल्या जाणाऱ्या रकमांच्या तारणांचा विचार केला असतां नव्हती असें दिसतें. करंट अकाऊंट अथवा चालू खातें डिपॉझीट बँकिंगमध्यें मागायला येईल त्या वेळीं मागेल तेवढी ठेव परत करण्याची जबाबदारी बँकरवर असते व ही जबाबदारी पार पाडण्यास बँकरला फारच सावधगिरीनें व ताबडतोब हातीं येतील अशा धोरणानें रकमा व्याजीं लावाव्या लागतात. प्राचीन काळच्या तारणांचा विचार करता अशा तऱ्हेची ठेवीची जबाबदारी घेणें शक्य दिसत नाहीं व याव्यतिरिक्त तारणें त्या काळीं उपलब्ध नसल्यानें या दुसऱ्या प्रकारच्या हल्लीं प्रचलित असलेल्या चालू खात्यावरील ठेवीच्या प्रकाराची वाढ त्या काळीं झाली नाहीं. सोनें व चांदी या धातूंच्या वस्तूंच्या तारणावर पैसे कर्जाऊ देण्याचा प्रघात फार प्राचीन काळापासून चालू असून अद्यापही प्रचलित असल्याचें दिसून येतें व या प्रकारची तारणें बँकरला आयत्या वेळीं मागणी आल्यास उपयोगी पडणारीं आहेत, आणि म्हणूनच प्राचीन काळींही ठेवीदारास अल्प प्रमाणांत रक्कम मागतांक्षणींच परत करतां येत होती. परंतु अशा प्रकारचीं तारणें व ठेवी यांचें परस्पर-

प्रमाण फारच कमी असल्यानें त्या काळचें बँकिंगचें धोरण बऱ्याच अंशानें फिक्स्ड डिपॉझिट पद्धतीच्या बँकिंगच्या धोरणाशीं जुळून होतें. इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांतही आरंभीं बँकिंगचा धंदा याच तऱ्हेनें केला जात होता. इंग्लंडमध्यें १८३३ च्या कायद्यानें लंडन येथें असणाऱ्या बँकांचा नोटा काढण्याचा अधिकार काढून घेतल्यानें झालेल्या नुकसानींच्या भरपाईखातर जे प्रयत्न बँकर्सकडून करण्यांत आले त्यांतच करंट अकाऊंट अथवा चालू खातें डिपॉझिट बँकिंगच्या पद्धतीचा जन्म झाला. एकंदरींत शिल्लक संचय असणाऱ्या गृहस्थांचे कडून ठेवी घेऊन त्या रकमा गरजू लोकांना बँकेच्या पसंतीच्या अशा सोनें, चांदी, कर्जरोखे, माल, वगैरेंच्या तारणावर बँक कर्जाऊ देते. कर्जाऊ देण्यांत येणाऱ्या रकमेला तारण म्हणून घेण्यांत येणारी वस्तु शक्य तितक्या लवकर व सहज सुलभतेनें विकली जाणारी असेल अशीच पसंत करण्यांत येते. जमिनी, घरें अशा स्वरूपाच्या तारणांवर कर्ज देण्यास बँक सहसा तयार नसते. आधुनिक बँकिंगच्या शास्त्रानें तर अशा तारणांवर कर्ज देऊं नये असें स्पष्ट बजाविलें आहे.

ठराविक मुदतीचें व ठराविक रकमेचें कर्ज देण्यांत येतें. उदाहरणार्थ, २५००० हजार रुपये एक वर्षाच्या मुदतीनें ठराविक व्याजानें कर्जाऊ देणें. तसेंच २५००० रुपयेपर्यंतची रक्कम एक वर्षापुरती जशी लागेल तशी खात्यांतून घेऊं अगर काढूं देणें व वेळोवेळीं जेवढी रक्कम उचलली असेल तेवढ्या रकमेवर अगर त्यापैकीं खात्याला जमा केलेल्या रकमा वजा जातां राहणाऱ्या बाकी रकमेवरच फक्त ठरलेल्या दरानें व्याजाची आकारणी करणें असाही एक कर्जाचा प्रकार आहे. यास ओव्हरड्राफ्ट असें म्हणतात. अशा कर्जाची मुदत ३, ६, ९ अगर १२ महिने अशी कोणतीही असूं शकते.

अशाच तऱ्हेनें उचल करावयाच्या ठरलेल्या रकमेपैकीं निम्या अगर

तिसऱ्या हिश्याच्या अगर कांहीं एका निश्चित रकमेवर, मुळींच उचल झाली नाहीं तरी अगर कमी झाली तरी, ठरलेल्या दरानें व ठरलेल्या मुदतीची व्याजाची आकारणी करण्याच्या ठरावानें कर्ज देऊं करणें असाही एक कर्जाचा प्रकार आहे; त्यास कॅशक्रेडीट असें म्हणतात. ओव्हर ड्रॅफ्ट व कॅश क्रेडीट या दोहोंत फरक इतकाच कीं पहिल्यांत फक्त उचल केलेल्या रकमांवर व्याज पडेल तर दुसऱ्यांत उचल असो अगर नसो अगर कमी उचल असो कांहीं एका रकमेवर बँकरला व्याज द्यावेंच लागेल. कारण तितकी तरी रक्कम बँकरनें तुमचे करितां रोखून ठेवलेली असते असें गृहित धरले जातें.

दुसराही एक फरक असा कीं कॅश क्रेडीटवरील कर्ज प्रामुख्यानें कर्ज-दाराच्या वैयक्तिक पतीवर (प्रॅमिसरी नोटीवर फक्त) आधारलेले असते. तर ओव्हर ड्राफ्टवरील कर्ज वैयक्तिक पतीच्या (प्रॅमिसरी नोटीच्या) जोडीला आणखी कांहीं जिनसांच्या, वस्तूंच्या अगर मालमत्तेच्या तारणावर आधारलेले असते. शीलवान व भरपूर ऐपतदार अशा इसमाच्या केवळ प्रॅमिसरी नोटीवर कॅश क्रेडीट देतात. परंतु आपल्यां इकडे निदान दोन व्यक्तिगत जामीन तरी जोडीला घेतात. मोठमोठ्या व्यापारी पेढ्या आपल्या वार्षिक उलाढालीचा अंदाज करून कॅश क्रेडीट ठरवून घेतात. ओव्हर ड्राफ्ट वास्तविक अपरिहार्य परिस्थितींत तात्पुरता इलाज आहे.

चालू खात्यावरील ठेवीदारांची मागणी भागविण्याकरितां कांहीं एक रक्कम बँकरला नेहमीं हातीं ठेवावी लागते. तसेंच अचानक व अनपेक्षित मागणी आल्यास उपयोगी पडण्याकरितां म्हणूनहि कांहीं रक्कम हाताशीं ठेवावी लागते. बँकेची पत चांगली असल्यास इतर बँका मदत करतात. परंतु नाणेबाजारांत टंचाई असल्यास व इतरही बँका आपापली रोकड शिल्लक हातीं ठेवण्याच्या धोरणांत असल्यास अशा वेळीं बाहेरून मदत मिळूं शकत नाहीं. म्हणून बँकेला आपल्यावळील रोकड शिल्लक अगर

तावडतोब हातीं येणारा असा पैसा यावर अवलंबून रहावें लागतें. या कारणाकरितां राखून ठेवण्यांत येणाऱ्या पैशावरही व्याज मिळवितां येत असल्यास पहावें अशी भावना बँकरला होणें स्वाभाविक असतें. परंतु व्याजाच्या फारशा लोभाला बळी न पडतां रक्कम तावडतोब हातीं येईल या धोरणाला प्राधान्य देऊन तो असा शिल्लक संचय व्याजीं लावतो. अशा तऱ्हेनें व्याजीं लावण्यांत येणाऱ्या रकमेला शॉर्ट लोन फंड म्हणजे जरूरीच्या वेळेकरतां ठेवलेला पण थोडया मुदतीनें व्याजीं लावण्यांत आलेला निधि, असें म्हणतात. साधारणतः मागतांक्षणींच अगर अल्प मुदतीची आगाऊ सूचना दिली असतां ही रक्कम ऋणकोनें बँकेला परत करावयाची असते. स्टॉक एक्स्चेंजवर व्यवहार करणारे, श्रॉफ, बील ब्रोकर्स अशा तऱ्हेचे लोक साधारणतः हा पैसा कर्जाऊ घेतात व तो साधारणतः चोवीस तास, अठ्ठेचाळीस तास अगर आज दुपारपासून उद्यां दुपारपर्यंत अशा मुदतीनें देण्यांत आलेला असतो. यालाच 'ओव्हर-नाईट मनी' अगर 'लोन' असें म्हणतात. अशा तऱ्हेनें गुंतविण्यांत आलेल्या पैशाला कॉल् मनी म्हणतात.

बँक कधीं कधीं आपल्या खातेदाराला प्रॉमिसरी नोट लिहून घेऊन कर्जाऊ रक्कम देते. अशा व्यवहारांत खातेदाराची पत समाधानकारक असते. खातेदार ऐपतवान असला तर त्याच्या एकट्याच्या प्रॉमिसरी नोटवरही कर्ज देण्यांत येतें. कित्येक ठिकाणीं एक अगर दोन जामीन घेऊन नंतर ऋणकोची प्रॉमिसरी नोट पत्करण्यांत येते. जामीन व मूळ प्रॉमिसरी नोट लिहून देणार ऋणको जथीमथीनें व व्यक्तिशः जबाबदार होतात. अलाहिदा जामीनकी लिहून घेणें अगर खुद्द प्रॉमिसरी नोटवर ऋणकोची व जामीनाची अशी दोघांची सही घेऊन त्यांत जथीमथीनें व व्यक्तिशः जबाबदारी पत्करणारी भाषा वापरणें यांपैकीं कोणताही प्रकार असूं शकतो; बव्हंशीं दुसरा प्रकारच विशेष प्रचलित आहे.

बाजारांत दिल्या विकल्या जातील अशा स्वरूपाच्या वस्तूंच्या अगर रोख्यांच्या तारणांवर बँक कर्ज देते. यांत माल, स्टॉक एक्स्चेंजवर खरेदी विक्री केले जाणारे रोखे, यांचा समावेश होतो. ज्या व्यक्तींचे व्यवहार अगर धंदे असे रोखे विकत घेणें अगर विकणें अशा स्वरूपाचे असतात त्यांना बँकेकडून रोख्यांच्या तारणावर कर्जाऊ रक्कम मिळण्याच्या सोईचा फार उपयोग होतो. सरकारी कर्जरोखे (लोनबॉंडस्, प्रॉमिसरी नोटा वगैरे) संपन्न व सुव्यवस्थित अशा कंपन्यांनीं अगर संस्थांनीं काढिलेलीं डिबेंचर्स आणि स्थानिक अगर परदेशाच्या सरकारनें काढलेले लोन बॉंडस् (कर्जरोखे) यांच्या तारणांवर बँकेकडून कर्ज मिळते. अशा रोख्यांपैकीं कांहीं रोखे " बेअरर " म्हणजे ज्याच्या ताब्यांत अगर कबजांत असतात त्याची मालकी प्रस्थापित करणारे असतात. म्हणून बँक असले रोखे तारण म्हणून विशेष पसंत करते. कारण बँकेचा कबजा बँकेची त्या रोख्यांबाबत मालकी ताबडतोब प्रस्थापित करते. असे कर्जरोखे तारण देतेवेळीं त्यांसोबत फक्त एक लेख लिहून घेण्यांत येतो कीं जरूर पडल्यास म्हणजे ठराविक वेळीं घेतलेल्या कर्जाची फेड ऋणकोकडून न झाल्यास बँकेनें ते विकावे व आपलें कर्ज वसूल करून घ्यावें.

जे सरकारी कर्जरोखे सरकारच्या दप्तरीं नोंदल्याशिवाय दिले घेतले जात नाहींत असे कर्जरोखे तारण म्हणून बँकेकडे ध्यावयाचे झाल्यास बँक सदर कर्जरोखे आपल्या नांवानें करून घेऊन सरकारदप्तरीं तशी नोंद करवून घेते व नंतर कर्ज देते. याला थोडा अवधि लागतो म्हणून हे कर्जरोखे दुय्यम समजले जातात. ऋणकोनें ठरल्याप्रमाणें कर्जाची फेड न केल्यास हे कर्जरोखे विकून आपलें कर्ज वसूल करण्याचा बँकेला अधिकार प्राप्त झालेला असतो. कित्येक प्रसंगीं बँक असे कर्जरोखे प्रत्यक्ष आपल्या नांवचे करून न घेतां त्यांसोबत एक " ब्लँक ट्रान्स्फर फॉर्म " म्हणजे कर्जरोख्याच्या विक्री व मालकीच्या बदलीदाखल विकणाऱ्यानें विकत घेणाऱ्याच्या नांवाचा

निर्देश न करतां लिहून दिलेला दस्त; लिहून घेऊन बँक आपल्याजवळ ठेवते. जरूर पडल्यास या दस्तांत बँक आपलें स्वतःचें नांव घालून ते रोखे जरूर असल्यास सरकारदप्तरीं नोंदवून घेऊन मालकीहक्कानें उपयोगांत आणूं शकते.

एखाद्या कंपनीनें काढिलेलीं व पूर्णपणें तारण असलेलीं अशीं डिबेंचर्स (कर्जरोखे) यांवरही कर्ज देण्यांत येतें. मात्र अशा कंपनीच्या स्थैर्याबद्दल पूर्ण खात्री पटली पाहिजे. तसेंच पोर्टट्रस्ट, म्युनिसिपालिट्या, वगैरेंसारख्या संस्थांनीं काढिलेल्या डिबेंचर्सच्या तारणावरही बँकेकडून कर्ज मिळूं शकतें. व्यापार करणाऱ्या समाईक भांडवलाच्या कंपनींतील शेअर्सचे तारणावरही कर्ज मिळूं शकतें. मात्र पूर्ण भरपाई न झालेले असे शेअर्स तारण घेतांना बँक बरीच प्राथमिक चौकशी करील व जास्तींत जास्त खबरदारी घेईल. असे शेअर्स बँकरचे नांवाचे करून दिल्यास बँकरला शेअरवरील कंपनीला भरावयाचे असलेले पुढील हप्ते भरावे लागतील ही भीति असते. तसेंच बँकरच्या नांवाचे शेअर्स न करतां नुसते गहाण ठेवले व त्याचे न भरलेले हप्ते कंपनीनें मागविले असतांना ते कर्ज घेणारानें भरले नाहींत तर त्या कंपनीकडून ते शेअर्स रद्द अगर जप्त होण्याचा संभव असल्यानें बँकरचे या प्रकारच्या शेअरांत असलेलें तारण त्याला धोक्याचें वाटतें. साधारणतः ज्या समाईक भांडवलाच्या कंपनीचे शेअर्स स्टॉक एक्स्चेंजवर घेतले जातात अथवा ज्यांच्या खरेदीविक्रीचे भाव स्टॉक एक्स्चेंजवर देण्यांत येतात अशा कंपन्यांचे शेअर्स तारण घेतले जातात. याव्यतिरिक्त कंपन्यांचे शेअर्सचे तारणावर बँकेकडून सहसा कर्ज मिळत नाहीं. अशा प्रकारच्या तारणावर कर्ज देतांना कायद्याच्या दृष्टीनें सुरक्षितता यावी म्हणून ज्या शेअरांच्या तारणावर बँक कर्ज देणार असेल ते शेअर्स ती आपल्या अगर आपल्या गुमास्त्याच्या नांवाचे करून घेते व अशा तबदिलीची (ट्रान्सफर) नोंद सदर शेअर्स ज्या कंपनीचे असतील त्या कंपनीच्या दप्तरींही करून घेण्यांत येते.

स्थावर मिळकतीच्या तारणावर कर्ज.

बँकेला देण्यांत येणाऱ्या तारणाचा आणखी एक प्रकार स्थावर मालमत्ता होय. या स्वरूपाचीं तारणें एका अर्थानें भरभक्कम वाटत असलीं तरी दुसऱ्या अर्थानें बँकरला भीतिदायक वाटतात. याचें कारण अशा तऱ्हेची मालमत्ता सहजासहजीं विकली जात नाहीं आणि मुद्दाम विकूं गेल्यास तिच्या किंमतींत बरीच घट होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें स्थावर मिळकतीच्या मालकी हक्कासंबंधीं बऱ्याच भानगडी असूं शकण्याचा संभव असल्यानें बँकेची त्याबाबत पूर्ण खात्री होईपर्यंत हा सौदा पटला जाणें बरेंच दुरापास्त होतें.

मालक व बँक यांचे दरम्यान तारण देण्यांत येणाऱ्या मालमत्तेच्या किंमतीसंबंधीं बराच मतभेद असण्याचा नेहमीं संभव असतो. मालक साधारणतः त्यानें त्या मालमत्तेकरितां दिली असलेली अगर खर्च केलेली रक्कम ही त्याची किंमत धरतो. कित्येक प्रसंगीं मालकानें आपल्या वैयक्तिक हौसेखातर अगर भावनाखातर बरीच जादा रक्कम दिलेली अगर खर्च केलेली असते. परंतु म्हणून कांहीं त्या मालमत्तेची तिऱ्हाइताकडून ती किंमत होऊं शकत नाहीं. आसपासची परिस्थिति, हवापाणी वगैरे सुखसोयींची अनुकूलता, सरकारी कायद्यांचे निर्बंध वगैरे निरानिराळ्या बाबींचा परिणाम मिळकतीच्या किंमतींत होणाऱ्या चढउताराशीं बराच निगडीत असतो. त्याचप्रमाणें सदर मिळकतीपासून उत्पन्नाच्या रूपानें वसूल होणाऱ्या रकमेचा आकडाही मिळकतीची किंमत ठरविण्यास बराच कारणीभूत असतो. अशा परिस्थितींत सर्व मुद्यांचा सांगोपांग विचार करून कोणत्याही पक्षाचें नुकसान होणार नाहीं अगर कोणत्याही पक्षास धोका पोंचणार नाहीं या मूलभूत हेतूनें मालमत्तेची किंमत करणारे तज्ज्ञ लोकांकडून तारण म्हणून देण्यांत येणाऱ्या मिळकतीच्या किंमती ठरविण्यांत येत असतात.

गहाण ठेवण्यांत येणाऱ्या मिळकतीची मधून मधून फेरकिंमत करण्यांत येते व त्यामध्यें घट दिसून आल्यास बँक ऋणकोकडून जादा तारणाची मागणी करिते. मालमत्तेची घट होऊं नये म्हणून तिची वक्तशीर दुरुस्ती करणें आवश्यक असतें. तारण ठेवण्यांत येणारी मालमत्ता आग वगैरे-सारख्या कारणांनीं नाहींशी झाल्यास येणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण म्हणून अशा मालमत्तेबाबत आगीचा विमा उतरविण्यांत येतो. यामुळें अशा तऱ्हेनें नुकसान पोंचल्यास विमाकंपनीकडून नुकसानभरपाई होऊं शकते. म्हणून आगीचा विमा उतरविणें व त्यासंबंधीं विम्याच्या पॉलिसीज बँकेच्या हवाली करणें अशाविषयींही कर्जप्रकरणीं अट घालण्यांत येते. घरें वगैरे मालमत्ता ज्या जमिनीवर उभारलेली असते ती जमीन खुष-खरेदी नसून भाडेपट्टयानें घेतलेली असल्यास भाडेपट्टयाच्या शर्तींमुळें अगर त्यांतील एखाद्या शर्तीचा भंग झाल्यामुळें मिळकतीच्या मालकी हक्कास बाध येण्याचा संभव आहे, असें बँकेला दिसून आल्यास, तसा संभव उत्पन्न होऊं नये याविषयीं खबरदारी घेण्यासंबंधीं अगर खबर-दारीची तरतूद करण्यासंबंधीं बँकेकडून एखादी अट घालण्यांत येते.

मिळकतीसंबंधींच्या मालकी हक्काची शाबिती सिद्ध करण्याकरितां, तसेंच सदर मिळकतीवर इतर कांहीं गहाण-दान-बोजा असल्यास किंवा असण्याचा संभव असल्यास अशा शंकेच्या निरसनार्थ पुरावा म्हणून मिळकतीसंबंधींच्या सरकारी दप्तरांतील नोंदीचा (क, ड, पत्रकाचा, रेकॉर्ड ऑफ राइटचा अगर म्युनिसीपल राजिस्टरचा) उतारा बँक माग-विते. स्थावर मिळकतीबाबतचा कायदा व हिंदु समाईक कुटुंबांतील हक्क-हितसंबंध यासंबंधींचा कायदा यांतील किचकट प्रकारामुळें स्थावर मिळकतस्वरूपाच्या तारणावर कर्ज देतेवेळीं कायदेशीर दृष्टीनें बरीच छाननी करण्यांत येते. मिळकतीसंबंधींचे सर्व कागदपत्र बँक आपल्या कायद्याच्या सल्लागाराकडे प्रथम अभिप्रायाकरितां पाठविते. या कामीं

येणारा खर्च बहुधा गिऱ्हाइकास द्यावा लागतो. स्थावर मिळकतीच्या कागदपत्रांचा ताबा व प्रत्यक्ष मिळकतीचा ताबा आपणाकडे असणें बँकेच्या दृष्टीनें हितावह ठरत असल्यामुळें या दोन्हींचा ताबा बँक मागते. नजरगहाण, तारणगहाण, ताबेगहाण वगैरे गहाणांच्या निरनिराळ्या प्रकारांपैकीं ज्या प्रकारानें बँकेला कायदेशीर सुरक्षितपणा प्राप्त होईल तो प्रकारच बँक पसंत करील.

मालाच्या तारणावर कर्ज.

जरी मालाच्या तारणावर कर्ज देण्याच्या प्रघाताला एके काळीं बँकांचा विरोध होता तरी अलीकडे तो विरोध तितकासा तीव्रतर राहिलेला नाहीं. इतकेंच नाहीं तर आधुनिक बँका मालाच्या तारणावर कर्जाऊ रकमा देण्याचे कामीं आपला शिल्लक संचय बऱ्याच प्रमाणांत गुंतवूं लागल्या आहेत. पूर्वीं दिसून येत असलेल्या विरोधाचें एक मुख्य कारण असें होतें कीं तारण ठेवून घेण्यांत येणाऱ्या मालाच्या किंमतींतील सदैव होत असणाऱ्या चढउतारामुळें कर्ज देणाऱ्यांस पुरेसें संरक्षण नसून धोका पोंचण्याचा संभव जास्त आहे. या विचारसरणींत बराच तथ्यांशही आहे, आणि ती वस्तुस्थितीला धरून आहे. तथापि व्यापारीवर्गाच्या सोयीकरितां व व्यापाराच्या वाढीकरितां बँकेनें शक्य तितक्या सावधगिरीनें व सुरक्षितपणा साधून घेऊन मालाच्या तारणावर कर्जाऊ रक्कम देण्यास पुढें आलेंच पाहिजे अशी विचारसरणी प्रसृत झाल्यामुळें या शाखेची बँकेच्या कार्यक्षेत्रांत अलीकडे बरीच वाढ झालेली आहे.

या तऱ्हेचा व्यवहार ज्या गिऱ्हाइकाशीं बँक करिते त्या गिऱ्हाइकाच्या सचोटी व उलाढालीबद्दल बँक विशेष चौकशी करिते. त्याचप्रमाणें ज्या प्रकारचा माल तारण म्हणून ठेवून घ्यावयाचा असेल त्या मालाची परिस्थिति बाजारपेठांतून काय आहे याविषयीं बँक आपणाकडे संपूर्ण माहिती

मिळवून टेवीत असते. ज्या मालाच्या तारणावर कर्ज द्यावयाचें असेल त्या मालाच्या बरोबर किंमती कित्येक प्रसंगीं तज्ज्ञ लोकांकडून करवून घेणें आवश्यक असतें. गुण अगर दर्जानुसार प्रतवार माल (ग्रेडेड गुडस्) कर्जाला तारण म्हणून बँका विशेष पसंत करतात. बिगर प्रतवार मालाचें तारणावर कर्ज देण्यास जरा खळखळ होतें. कारण अशा मालाच्या किंमतीसंबंधीं निश्चिती नसते. प्रतवार माल सुलभतेनें व किंमतीची विशेष घट न होतां विकला जाणें जास्त शक्य असल्यानें अशा मालाचें तारण विशेष पसंत केलें जातें. मालाची बाजारभावानें जी किंमत होत असेल त्या किंमतींत शेंकडा १५ ते २५ टक्के घट करून होणाऱ्या किंमतीइतकी रक्कम बँक सदर मालाच्या तारणावर कर्जाऊ देते. अशा तऱ्हेनें तारण म्हणून स्वीकारण्यांत येणाऱ्या मालाचा प्रत्यक्ष अथवा कायदेशीर ताबा बँक घेते. असा ताबा घेतांना जो मनुष्य कर्ज घेत असेल त्यास त्यासंबंधींचें तारण गहाण म्हणून देण्यास कायदेशीर स्वामित्व आहे याबद्दल बँक पूर्ण चवकशी करून आपली खात्री करून घेईल. कारण गहाण टेवणाऱ्या मनुष्यास सदर माल गहाण ठेवण्यास अधिकार प्राप्त होत नसल्यास त्यामुळें बँकेच्या कायदेशीर मालकी हक्कास बाध येण्याचा संभव असल्यानें त्याबाबत बँक पूर्ण चवकशी केल्याखेरीज व्यवहार करणार नाहीं.

हिंदुस्थानचा १९३० चा मालविक्रीबाबत जो कायदा आहे त्याच्या २७ व्या कलमान्वयें असें निश्चित करण्यांत आलें आहे कीं, कोणत्याही वस्तूचा मालक, अगर अशा मालकाचा कायदेशीर रीत्या नेमण्यांत आलेला मुखत्यार. यासच अशी वस्तु प्रत्यक्ष विकण्याचा अगर दुसऱ्यास देऊं करण्याचा अगर तत्संबंधीं कागदपत्र बेची करण्याचा अधिकार असेल.

हिंदुस्थानच्या जंगम मालावरील गहाणाबाबतच्या कायद्यान्वयें गहाण ठेवण्यांत येणाऱ्या जंगम मालाविषयीं लेख असलाच पाहिजे असें जरी

नाहीं तरी बँक असल्या व्यवहारासंबंधीं साधारणत: कायदेशीर कागदपत्र करून घेते. याबाबत बँकेनें ठराविक फॉर्म्स् छापून ठेविलेले असतात व त्यांत गहाणाच्या अटीविषयीं संपूर्ण माहिती असते. या लेखांत ज्या मालाचे तारणावर कर्ज देण्यांत येत आहे त्या मालाच्या किंमती कमी झाल्यास आलेल्या घटीच्या मोबदल्यादाखल काहीं जादा तारण द्यावें लागल्यास अगर रकमेचा भरणा करावा लागल्यास करण्यांत येईल अशा तऱ्हेची हमी गहाणदारानें लिहून द्यावयाची असते. त्याचप्रमाणें गहाणपत्रांत नमूद करण्यांत आलेल्या अटींचा गहाणदारांकडून भंग झाल्यास, गहाण ठेवण्यांत आलेली वस्तु अगर माल विकून टाकण्याचा अधिकार या लेखान्वयें बँकेला देण्यांत आलेला असतो. तसेंच, अशी विक्री करून वसुल होणारी रक्कम कर्जाची पूर्ण फेड करण्यास पुरेशी नसल्यास बाकी रकमेबद्दल भरपाई करून देण्याची हमीही द्यावयाची असते. बँकेकडे गहाण ठेवण्यांत आलेला माल गहाण ठेवणारानें दुसऱ्यास विकला असल्यास अगर देऊं केला असल्यास विकत घेणारानें काय किंमत बँकेकडे देऊन सदर माल आपल्या ताब्यात घ्यावयाचा याचाही उल्लेख केलेला असतो. गहाण ठेवण्यांत आलेल्या एखाद्या विशिष्ट वस्तूची अगर मालाची विकून आलेली किंमत त्यावरील बोजा पुरा करण्यास अपुरी असल्यास, तेवढ्यापुरता हक्क बँक त्या गिऱ्हाइकाचा इतर कांहीं माल अगर वस्तू बँकेकडे असल्यास त्यावरही बजावूं शकते.

मालावरील अगर व्यापारी वस्तूंवरील मालकी हक्क प्रस्थापित करणारे असे जे अनेक कागदपत्र आहेत त्यापैकीं प्रमुख कागदपत्रांचा आतां विचार करूं. यांत बिल् ऑफ लेडिंग, डॉक वॉरन्ट, वेअरहौसकीपर्स सर्टीफिकेट, रेल्वे रिसीटस्, डिलिव्हरी वॉरंट अथवा ऑर्डर यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. आयात–निर्यात होणाऱ्या व्यापारी वस्तूंबाबत मालकी हक्क प्रस्थापित करणारा असा बिल ऑफ लेडिंग नांवाचा एक

महत्त्वाचा कागद आहे. जहाजाच्या मालकानें अमुक इतका माल त्याचे ताब्यांत अमक्यानें दिलेला असून तो सदरहू मालाच्या वाहतुकीबाबतच्या ठरविलेल्या शर्तीस पात्र राहून नमूद करण्यांत आलेल्या बंदरांत मालकाचे ताब्यांत देण्यांत येईल अशा अर्थाचें सर्टिफिकेट म्हणून हा कागद असतो, त्यास **बिल ऑफ लेडिंग** असें म्हणतात.

जलमार्गें वाहून येत असलेल्या मालाच्या मालकीचा आणि सदर माल ताब्यांत घेण्याच्या हक्काचा बिल ऑफ लेडिंग हा पुरावा आहे. बिल ऑफ लेडिंग ज्याचें नांवचें असतें त्याला, अगर तो सांगेल त्यास, त्यांत नमूद केलेल्या मालाची डिलिव्हरी मिळूं शकते आणि म्हणून बिल ऑफ लेडिंग हा कागद चेकप्रमाणें एंडॉर्समेंटनें म्हणजे पावतीदाखल अगर दुसऱ्याचे नांवचा केला असल्यादाखल सही करून एकाला दुसऱ्यास देऊं करतां येतो. बिल ऑफ लेडिंगच्या साधारणतः नेहमी तीन प्रती काढण्यांत येतात. यांपैकीं कोणतीही प्रत जी प्रथम जहाजाच्या कप्तानाला अगर जहाज कंपनीला दाखविण्यांत येईल त्यावरून मालाची डिलिव्हरी देण्यांत आल्यावर बाकीच्या दोन प्रती रद्द समजण्यांत येतात. तथापि त्या दुसऱ्या कोणाच्या हातीं लबाडीनें अगर अन्य तऱ्हेनें परंतु मोबदला देऊन गेलेल्या असल्यास त्या त्या लोकांचे मालकीसंबंधीं हक्कहितसंबंधाचा दावा उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें व त्यांत बँकेला निष्कारण त्रास पोचण्याचा संभव असल्यानें बिल ऑफ लेडिंगचे तारणावर बँकेकडून कर्ज घेण्याचे प्रसंगी बँक साधारणतः या तिन्ही प्रती आपल्या ताब्यांत मागते. बिल ऑफ लेडिंग आणि चेक यांच्यामध्यें बरेचसें सादृश्य असल्यामुळें बिल ऑफ लेडिंगला निगोशिएबल इन्स्ट्रूमेंटप्रमाणें समजण्यांत येतें. परंतु वस्तुतः निगोशिएबल इन्स्ट्रूमेंटस्‌च्या कायद्याप्रमाणें तें निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट म्हणून मान्य केलेलें नाहीं.

बँकरनें कर्जाऊ दिलेल्या रकमेला तारण म्हणून बिल ऑफ लेडिंग घेतलें असेल व सदरहू बिल ऑफ लेडिंगवर उल्लेखित असलेल्या मालकानें आपली पावतीदाखल सही त्या बिल ऑफ लेडिंगवर करून तें जर बँकेचे स्वाधीन केलें असेल तर सदर बिल ऑफ लेडिंगप्रमाणें ताब्यांत येणाऱ्या मालावर बँकेचा कायदेशीर पूर्ण ताबा मान्य केला जातो. त्यामुळें १९३० च्या मालाबाबत विक्रीसंबंधीं कायद्याच्या कलमान्वयें प्रवासांत असलेल्या मालाची डिलिव्हरी थांबविण्याबाबत मूळ मालकास असलेल्या अधिकाराचा परिणाम बँकेला बाधक होऊं शकणार नाहीं. (स्टॉपेज इन ट्रँझीट)

डॉक वारंटः—डॉक वारंट हें एक डॉक (गोदी) कंपनी अगर अधिकारी यांजकडून देण्यांत येत असलेलें सर्टिफिकेट आहे. सदर सर्टिफिकेटांत नमूद केलेला माल त्यांचे ताब्यांत असून तो माल ते मालकाला अगर मालक सांगेल त्याला डिलिव्हर करतील अशा तऱ्हेची कबुली असते.

वेअरहौसकीपर्स सर्टिफिकेटः—बंदरांतून बांधण्यांत आली असलेली सरकारी अगर खाजगी वेअरहौसेस (गुदाम) मध्यें ठेवण्यांत आला असलेला माल अमुक एक माणसाचा म्हणून आमचे ताब्यांत आहे अशा अर्थाचें तें सर्टिफिकेट असतें. या सर्टिफिकेटावर बँकेकडून कर्जाऊ रकम मिळणें दुरापास्त आहे. कारण, कायदेशीर मालकीहक्क प्रस्थापित करण्याचे दृष्टीनें हें सर्टिफिकेट समाधानकारक नाहीं.

डिलीव्हरी ऑर्डरः—वेअरहौसमध्यें (गुदाम) ठेवलेला माल अमुक एका माणसाला डिलिव्हर करावा अशाबद्दल मालाच्या मालकानें वेअरहौसच्या अधिकाऱ्याला दिलेल्या लेखी हुकमास डिलिव्हरी ऑर्डर असें म्हणतात. अशा तऱ्हेची डिलिव्हरी ऑर्डर ज्याचे नांवाची असेल

त्याच्याकडून ती आपल्या नांवाची करून घेऊन मग त्याचे तारणावर बँक कर्जाऊ रक्कम देते.

रेल्वे रिसीट्स्:—आगगाडीनें वाहतुक होणाऱ्या मालाबाबत रेल्वे कंपनीकडून वाहतुकीकरितां माल ताब्यांत आला असल्याबद्दल व तो नमूद केलेल्या गांवीं आणून पोचता करण्याबद्दलच्या रेल्वेकंपनीच्या कबुलीचा दाखला अगर कबुलीची पावती यास रेल्वे रिसीट असें म्हणतात. रेल्वेनें पाठविण्यांत येणारा माल ज्या मनुष्याचे मालकीचा असतो तो आपलें नांव 'पाठविणार' म्हणून घालतो व सदर मालाचे पैसे अगर मोबदला त्यास मिळाला असल्यास ज्या माणसाकडून असा मोबदला मिळाला व त्यामुळें ज्यास तो माल डिलिव्हर करावयाचा त्याचें नांव कन्सायनी (माल घेणारे) म्हणून रेल्वे रसिदींत दाखल केलेलें असतें. परंतु जर माल रवाना केल्यानंतर मालाची किंमत रेल्वे रिसीट विकत घेणाऱ्याच्या हातांत देऊन मिळावयाची असें ठरलें असेल तर अशा वेळीं माल पाठविणार आपलेंच नांव कन्सायनी (घेणारे) म्हणून घालतो. त्यामुळें रेल्वेच्या दप्तरांत दुसऱ्या कोणाच्या मालकी हक्काची नोंद झालेली नसते. याप्रमाणें रेल्वेकंपनीकडून रसीद मिळवून तीवर ज्यास तो माल विकला असेल त्या माणसाचें नांव घालून, त्यास या रसिदींतील माल द्यावा अशा अर्थाचें वाक्य घालून त्याखालीं मालक (विकणारा) आपली सही करितो. यास एन्डॉर्समेंट म्हणतात. अशा तऱ्हेनें एन्डॉर्समेंट करून रसीद दुसऱ्याचे नांवची केली असतां ज्याचे नांवची ती केली असेल त्याचा मालकीहक्क सदर रसिदींतील मालावर पोंचतो. रसिदींतील मालाचे कायदेशीर रीत्या जे मालक ठरत असतील त्यांना रसिदींतील मालाच्या तारणावर बँकेकडून कर्ज मिळूं शकतें.

व्यापारोपयोगी वस्तू, उदाहरणार्थ भूईमुग, करडी वगैरे गळिताचीं धान्यें, गहूं, तांदूळ, गुळ, साखर वगैरे खाद्य पदार्थ, कापूस, ताग व

इतर शेतकीजन्य वस्तू, कापड, स्टेशनरी, मशीनरी वगैरे औद्योगिक माल यांचें तारणावर त्या त्या ठिकाणच्या परिस्थित्यनुरूप व प्रसंगोपात् बँकेकडून कर्जाऊ रकमा मिळूं शकतात.

आयुर्विमा पॉलिसीचे तारणावर कर्ज

विमा कंपनींत उतरलेल्या विम्याचे पॉलिसीचे तारणावर बँकेकडून कर्जाऊ रक्कम मिळूं शकते. पॉलिसीचे हप्ते पूर्णपणें भरले गेलेले असल्यास अशी पॉलिसी तारण म्हणून लवकर पत्करली जाते. अर्धवट भरपाई झालेल्या पॉलिसीचे तारणावर कर्जाऊ रक्कम द्यावयाची झाल्यास, ती, पॉलिसीच्या सरेंडर व्हॅल्यूपेक्षां कधींही जास्त असूं शकणार नाहीं. एखादी विमा पॉलिसी विमेदारानें रद्द केल्यास त्याला रद्द केलेल्या पॉलिसीचा मोबदला अगर किंमत म्हणून जी रक्कम विमा कंपनी देते तिला सरेंडर व्हॅल्यू असें म्हणतात. अशी सरेंडर व्हॅल्यू काय प्रमाणांत देण्यांत येईल याबद्दल विमा कंपन्यांनीं आपल्या माहितीपत्रकांतून बहुधा जाहीर केलेलें असतें. पॉलिसी आपले ताब्यांत घेऊन बँक त्याचे तारणावर कर्जाऊ रक्कम देईल. पॉलिसी जर कोणाचे नांवची (असाईन) केलेली असेल तर ज्याचे नांवची ती केलेली असेल त्याची संमति असें कर्ज काढण्यास आवश्यक होईल. तसेंच सदर तारण म्हणून देण्यांत येणाऱ्या पॉलिसीशीं इतर कोणाचा हक्कहितसंबंध पोचत असेल तर त्याविषयींही बँकेला आवश्यक ती माहिती पुरवावी लागेल व त्याबाबत बँकेचें समाधान झाल्यासच बँक कर्ज देण्याचा विचार करील.

जामिनकीचे तारणावर कर्ज

तारणाचा आणखी एक प्रकार म्हणजे जामिनकी होय. एकानें दुसऱ्याला देण्यांत येणाऱ्या कर्जाच्या फेडीबद्दल हमी घेणें अथवा जबाबदारी पत्करणें यास जामिनकी म्हणतां येईल. अशा तऱ्हेच्या जामिनकीचे तारणावर बँक

कर्जाऊ रक्कम देते. वैयक्तिक जामिनकीचे तारणावर कर्जाऊ रक्कम देण्याचा धंदा विशेषतः सहकारी बँकांमधून आढळून येतो. ज्याची जामिनकी पत्करावयाची त्याच्या ऐपतीबद्दल, धंदा करण्याच्या पद्धतीबद्दल व सचोटीबद्दल बँकेला पुरेपूर विश्वसनीय माहिती सदैव मिळणें मोठमोठ्याल्या शहरांतून कठीण असल्यानें मोटमोठाल्या शहरांत असले व्यवहार करणें विशेष धोक्याचें वाटतें. सहकारी बँकांचें कार्यक्षेत्र मर्यादित असून विशिष्ट लोकांमध्येंच व प्रदेशामध्येंच त्यांचे व्यवहार होत असल्यानें त्यांना त्याबाबत जास्त खात्रीलायक माहिती असूं शकते आणि म्हणून त्या बँकांच्या व्यवहारक्षेत्रांत या प्रकारच्या तारणावर कर्जाऊ रक्कम देण्याचा विशेष प्रघात असल्याचें दिसून येतें.

जामिनकी ज्यानें पत्करलेली असते त्यास शुअर्टी (जामीन) असें म्हणतात. आणि ज्या माणसानें काढलेल्या कर्जाबद्दल अगर कर्जाची फेड न झाल्यास ती करण्याबद्दल, हमी घेण्यांत आलेली असते, त्या कर्ज घेणाऱ्यास अगर ज्यास जामीन राहावयाचें असेल त्यास, मूळ कर्जदार संबोधण्यांत येतें आणि जामिनकी ज्यास कबूल करण्यांत अगर लिहून देण्यांत येते त्यास सावकार म्हणतात. हिंदी कराराच्या कायद्याप्रमाणें (इंडियन कॉंट्रॅक्ट ॲक्ट) जामिनकी लेखी अगर तोंडी कशीही असलेली चालते; इंग्लिश कायद्याप्रमाणें मात्र ती लेखीच असली पाहिजे. कायद्यानें तोंडी जामिनकी जरी चालत असली तरी बँका जामिनकी लेखीच लिहून घेतात व या जामिनकीचा कागद ते आपल्या कायद्याच्या सल्लागाराकडून तयार करवून घेतात. हा कागद फारच खबरदारीने तयार करावयास पाहिजे. कारण जामिनकीच्या तारणाची सर्व मदार, जामिनावर अथवा जामिनाच्या मालमत्तेवर सावकाराचा बोजा निश्चित प्रस्थापित होण्यावरच असते.

कर्जाची फेड करण्याची मुख्य जबाबदारी मूळ कर्जदारावरच असते

आणि मूळ कर्जदाराकडून ठरल्याप्रमाणें फेड न झाल्यास जामिनावर जबाबदारी येते. मूळ कर्जदार नाहीं, अथवा, मूळ कर्जदार निराळा असूनही जामिनदारानें कर्जाची जबाबदारी आपणा स्वत:वर घेतली असेल तर त्या ठिकाणीं जामिनदारच जबाबदार राहील. परंतु यास वास्तविक जामिनकी म्हणण्यापेक्षां हमी अथवा जिम्मेदारी म्हणावें लागेल.

जामिनकी परकरणें हा एक करारच असल्यानें कराराच्या कायद्यांतील मूळ तत्त्वांपैकीं ' कन्सिडरेशन ' (मोबदला)चें तत्त्व लागू होतें. मूळ कर्जदार, जामीन अथवा त्या व्यवहाराशीं हक्कहितसंबंध असणारा दुसरा कोणी मनुष्य यांपैकीं कोणासही, सावकारानें मोबदला दिला असतां अथवा देण्याचें कबूल केलें असतां, कन्सिडरेशनची तक्रार राहूं शकत नाहीं. जामिनदार हा मुख्यत: जबाबदार नसून मूळ कर्जदाराकडून कसूर झाल्यास जबाबदार होतो आणि म्हणून जामिनदारानें सावकाराच्या कर्जाची फेड केली तरी मूळ कर्जदार आपल्या जबाबदारींतून मुक्त होत नाहीं. जामिनाला सावकाराचे हक्क प्राप्त होतात व मूळ कर्जदाराकडून तो कर्जाची भरपाई करून घेऊं शकतो. कर्जाऊ देण्यांत येणारी रक्कम व तीवरील व्याज वगैरेबद्दलची जबाबदारी जामिनावर असते. जामिनकी विशिष्ट रकमेपुरतीच अथवा व्यवहारापुरतीच असूं शकते अगर कांहीं एका मुदतींत होणाऱ्या सर्व व्यवहाराबद्दल असूं शकते. पहिल्या प्रकारास स्पेसिफिक गॅरन्टी असें म्हणतात व दुसऱ्यास कंटिन्युइंग गॅरंटी असें म्हणतात. कंटीन्युइंग गॅरंटी कोणतेही वेळीं जामिनाला रद्द करतां येते. परंतु ती फक्त रद्द करण्याच्या नोटिशीच्या तारखेनंतर परिणामकारक होऊं शकेल. गॅरंटी रद्द करण्यापूर्वीं झालेल्या व्यवहारालगत उत्पन्न होणाऱ्या जबाबदारींतून अशी नोटिस देऊन जामिनदार सुटूं शकत नाहीं. कर्जाच्या व्यवहाराबाबत सावकार, मूळ कर्जदार आणि जामिन यांचे दरम्यान लिहून

घेण्यांत आलेल्या कर्जरोख्यांत कांहीं फेरफार जामिनाचे संमतीखेरीज करण्यांत आल्यास जामिनदार जामिनकीच्या जबाबदारींतून सुटतो. ज्या रकमेची अथवा ज्या मुदतींत दिल्या जाणाऱ्या रकमेची जामिनकी पत्करली असेल त्या मुदतीची अगर रकमेची वाढ बँकेनें केल्यास तें कृत्य फरक या सदरांत येऊन त्यामुळें जामिनदार, संमति दिली असल्याखेरीज करून, जामिनकीच्या जबाबदारींतून सुटतो. जामीन एक अथवा अनेक, व्यक्तिशः अथवा जथीमथीनें असूं शकतात. हिंदी कराराच्या कायद्याप्रमाणें करार करण्याची पात्रता अगर लायकी (कॅपसिटी टू एंटर इन्टू कॉन्ट्रॅक्टस्) ज्यांना असेल त्यांना जामिनकीचे करार करण्याची पात्रताही असते. एखाद्या भागीदारींत चाललेल्या दुकानानें जामिनकी पत्करिल्यास, त्या दुकानच्या सर्व भागीदारांची संमति असावयास पाहिजे अथवा सर्व भागीदारांनीं त्यांचेपैकीं कोणाही एकास दुसऱ्याची जामिनकी पत्करण्याचा कायदेशीर अधिकार दिला असला पाहिजे. समाईक भांडवलाची कंपनी (जॉइंट स्टॉक कंपनी) जामीन राहात असल्यास तिच्या मेमोरॅन्डम् व आर्टिकल्स् ऑफ असोसिएशन (घटना) अन्वयें कंपनीला अशा तऱ्हेनें दुसऱ्यास जामीन म्हणून राहतां येतें अथवा दुसऱ्याची जामिनकी पत्करतां येते कीं नाहीं याबद्दल बँक आपली खात्री करून घेईल. कारण अशा तऱ्हेचा अधिकार कंपनीच्या घटनेंत नसतांना, जर एखाद्या कंपनीनें जामीनकी पत्करली असेल, तर, जरी त्या कंपनीचे डायरेक्टर्स व्यक्तिशः अशा कर्जाबद्दल जबाबदार धरण्यांत येत असले तरी त्या कंपनीच्या समाईक मालमत्तेवर अशा कर्जाच्या जामिनकीचा बोजा लागू होणार नाहीं. विवाहित हिंदु स्त्रीला, स्त्रीधन अथवा कायद्यानें स्वतःच्या मालकीची ठरत असलेल्या जिंदगीपुरती जामिनकी पत्करितां येते.

———

बँकांच्या वाढीचा इतिहास.

इंग्रजींत ज्याला बँक असें म्हणतात त्यालाच समानार्थक असा आमच्याइकडील शब्द म्हटला म्हणजे पेढी हा होय. पण वास्तविक पाहतां अगदीं आधुनिक व सुधारलेल्या पद्धतीची बँक आणि पेढी यांच्या रूढार्थांत बराच फरक आहे. हा फरक या दोहोंच्या स्वरूपामुळें व त्याच्या द्वारें होणाऱ्या कार्यामुळें उत्पन्न होतो. परंतु हा फरक तूर्त वगळून आणि हे दोनही शब्द समानार्थकच आहेत असें घेऊन चालून बँक किंवा पेढी ही संस्था मुळीं अस्तित्वांत कशी येते याचा विचार करूं.

साधारणपणें असा कोणताही मनुष्य असत नाहीं कीं ज्याच्या जमेची व खर्चाची उपज व तोंडमिळवणी अगदीं बरोबर रोजच्या रोज होते. अशी स्थिति असल्यामुळें कोणत्याही क्षणीं मनुष्याला थोडेंसें तरी देणें अगर घेणें असतेंच अथवा स्वतःजवळ थोडी तरी शिल्लक असतेच. यांपैकीं तिसऱ्या प्रकारचे लोक संख्येनें जरी कमी, तरी त्यांची शिल्लक समाजाच्या पुष्कळशा व्यवहाराला भांडवल पुरवूं शकते. परंतु यांपैकीं प्रत्येकजण आपआपली शिल्लक स्वत:जवळ ठेवूं लागला तर व्यक्तिशः ती थोडी भासते; परंतु तिला सामुदायिक स्वरूप आलें असतां तिचें अल्पत्व नाहींसें होऊन समाजाची गरज भागविण्याची पात्रता तिच्यांत येते. मनुष्य मात्र इतक्या निरपेक्ष किंवा परोपकारबुद्धीनें फारसा पहात नाहीं. समाजाला आपल्या शिलकेचा फायदा असो वा नसो, आपली शिल्लक आपल्याजवळ न ठेवितां दुसऱ्याजवळ ठेवण्यास देण्यास तो सहसा तयार झाला नसता; परंतु मनुष्य मात्र पैशाची उपज जितकी होईल तितकी पाहात असतो व समाजांत रूढ असलेल्या पैशाच्या उपयोगाकरितां देण्यांत येणाऱ्या भाड्याच्या-व्याजाच्या पद्धतीमुळें तो आपली शिल्लक दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यास प्रवृत्त होतो. अशा या शिल्लक व्याजीं

लावूं पाहणाऱ्या मनुष्यास व्याजीं मागणाऱ्या मनुष्याची गरज असते. पण तो याच्याजवळ शिल्लक असेल तेव्हांच, कसा व कोठें मिळावा ? त्याच-प्रमाणें कर्जाऊ पैसे हवे असणाऱ्या माणसास अशा सुखवस्तु अथवा श्रीमंत मनुष्याला केव्हां व कोठें गांठतां येणार ? तेव्हां या दोहोंची गांठ घालून देण्याकरितां एखाद्या अडत्याची जरूर आहे व तो म्हणजे बँकर अथवा पेढीचा धंदा करणारा. यामुळेंच बँका अथवा पेढ्या अस्तित्वांत येतात.

शिल्लक संचय करण्याचे जे पूर्वापार प्रकार सर्वसाधारणपणें पाहाव-यास मिळतात ते म्हणजे जमिनींत पुरून ठेवणें व दागदागिन्यांत गुंतविणें. यांपैकीं पहिला प्रकार अगदीं निंद्य ठरतो व दुसरा जरी तो पहिल्याइतका असमर्थनीय नाहीं तरी कमीअधिक प्रमाणांत दोषार्हच ठरेल, आणि तो एक द्रव्याचा वांझोटाच प्रकार होय. खास द्रव्यानें द्रव्याला प्रसविणें हें सजीवतेचें लक्षण आहे. राष्ट्रीय व्यापाराला पुरेसें भांडवल मिळण्याकारितां शिल्लक संचय व्याजीं लावण्याकडेच जास्त प्रवृत्ति झाली पाहिजे. शिल्लक संचय जमिनींत पुरून ठेवणें अगर दागिन्यांत गुंतविणें या दोन्ही प्रकारांत सुरक्षिततेबद्दल काळजी आहेच.

बँकेशीं संबंध ठेविल्यानें होणारे फायदे अनेक असल्यानें अशा प्रकारची संस्था फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत असल्याचे अनेक उल्लेख सांपडतात. युरोपांतील निरनिराळ्या देशांत, निर-निराळ्या कारणांनीं पेढ्या अस्तित्वांत आल्या. जुन्या काळीं इटली देशाच्या द्वारें पूर्व व पश्चिम गोलार्ध यांचे दरम्यान व्यापार चालत असल्यामुळें व्हेनीस, जिनीवा, फ्लॉरेन्स वगैरे ठिकाणीं पेढ्या होत्या. एकट्या फ्लॉरेन्स शहरीं एके वेळीं सुमॉर ८० पेढ्या असल्याचा उल्लेख आहे. इंग्लंडांत हा धंदा प्रथमतः तेथील सोनार लोकांच्या हातीं होता व हे लोक राजांना

कर्जाऊ रकमा देत असत. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून हा धंदा करण्यांत येत असल्याचे उल्लेख असून, तो आरंभी व अद्यापही कित्येक ठिकाणीं दुकानदार अथवा सावकारवर्गाचे हातीं होता व आहे. ठेव ठेवण्याला योग्य असा मनुष्य साधारणपणें नगरशेठ म्हणून प्रसिद्ध असलेला गावांतील धनिक व प्रमुख व्यापारी हा योग्य मानला जात असल्यानें विशेषतः त्याजकडे अनेक ठेवी असत. देशांतील व्यापारीसंघाचे अध्वर्युत्व या नगरशेठकडे आल्यापासून या ठेवींचा ओघ व्यापारीसंघ कचेरीकडे वळल्याचें आढळून येतें. हा सर्व प्रकार चालू होता तो काळ म्हणजे साधारणपणें इसवी सनापूर्वी ३०० पासून २०० वर्षांचा काळ होय. ह्या वेळच्या कायद्याच्या पुस्तकांत अशा तऱ्हेच्या ठेवी ठेवून घेणाऱ्या इसमानें त्याची गैरवाजवी अफरातफर केल्यास त्याबद्दल त्यास द्यावयाच्या शिक्षेचाही उल्लेख सापडतो. या वेळच्या व त्यानंतर सुमारें २००० वर्षेपर्यंतच्या काळांत बँकिंगचा धंदा म्हणजे शिल्लक संचय ठेवून घेणें व ही ठेव कांहीं एका मुदतीनंतर अथवा वेळोवेळीं फारच अल्प प्रमाणांत परत करणें अशा प्रकारचा होता अथवा आहे. दरम्यानच्या काळांत ठेवींच्या रकमांचा उपयोग गरजू लोकांना घरें, जमिनी, सोनें, चांदी वगैरेंच्या तारणावर कर्ज देणें, सरकारला गांवच्या वसुलीच्या तारणावर कर्जाऊ देणें अथवा स्वतःचे व्यापारांत उपयोगी आणणें अशा तऱ्हेनें करण्यांत येत असे.

अशा तऱ्हेचे धंदा करणारे अनेक पेढीवाले सर्व देशभर व्यापारी पेठांच्या अनुरोधानें निरनिराळ्या ठिकाणीं वसलेले आढळून येतात. दळणवळणाच्या साधनांच्या प्रसाराबरोबर व्यापारी घडामोडीचा प्रसार वाढल्यानें या पेढीवाल्यांना प्रांतोप्रांतीं व्यापाराच्या मागोमाग जाणें भाग पडूं लागलें. अर्थात् नेहमीं हे स्वतःच न जातां यांच्या स्वदस्तुरचीं पत्रें रवाना होऊं लागलीं, आणि हीं या पेढीच्या धंद्याच्या बाबतींत पैशाच्या विनिमयाखातर लिहिलीं जाणारीं पत्रें म्हणजे हुंडी-पत्रें होत. अशा तऱ्हेनें

आंतर प्रांतीय व्यापारीसंबंध उत्पन्न झाल्यानें पैशाचा विनिमय हुंडीपत्रांच्या द्वारें करण्याचा प्रघात भराभर वाढत गेला व हा एक पेढीवाल्यांच्या कार्यक्षेत्रांतील मोठा भाग होऊन बसला. बाराव्या शतकांत हुंडी-पत्रांचा सर्रास उपयोग होत असल्याचा दाखला मिळतो. याप्रमाणें व्यापार करणारे पेढीवाले, सावकार, सर्व हिंदुस्थान देशभर पसरले असल्याचे उल्लेख सांपडतात.

मुसलमानी अमदानींत मुलतानी व श्रॉफ लोक अंतर्गत व्यापाराला पैसा पुरवीत असत इतकेंच नाहीं तर राजे लोकांनाही पैसा पुरवून त्यांचे बँकर्स म्हणून काम पहात असत. सरकारी वसूल गोळा करणें, नाणें बदलून देणें (एक्सचेंज) असेही व्यवहार हे करीत. यांचें राजे लोकांवर फार वजन असे. हल्लींच्या मध्यवर्ती बँकेची कामगिरी त्या कालीं जगत्शेठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या सावकारांकडून होत असे. मथुरेचे मथुरादासशेट यांची पेढी, इंदोरचे सरदार श्रीमंत किबेसाहेब यांची गणेशदास कृष्णाजी नांवाची पेढी, महाराष्ट्रांतील प्रसिद्ध सावकार बारामतीकर नाईक यांची पेढी, पैठण येथील वानवळे यांची पेढी, नागपूर येथील बन्सीलाल अबीरचंद यांची पेढी या सर्व पेढ्यांचे व्यवहार त्या त्या कालीं फारच विस्तृत प्रमाणांत चालले असल्याचे उल्लेख आहेत. याव्यतिरिक्त इतरही अनेक नामांकित पेढ्या होत्या. परंतु वर दिलेल्या पांच पेढ्यांचाच आम्ही नामनिर्देश केला, याचें कारण एवढेच कीं, व्यापाराव्यतिरिक्त ऐतिहासिक स्वरूपाचें असेंही महत्त्व या पेढ्यांना आहे. या तऱ्हेनें हा पेढीचा धंदा करणारे इसवी सनापूर्वी २०० वर्षांपासून तों इसवी सन १७७० पर्यंतच्या काळांतील पेढीवाले हा एक पेढीवाल्यांचा वर्ग होतो. याला आपण खाजगी पेढीवाले (प्रायव्हेट बँकर्स) असे म्हणूं या. अर्थात् या सुमाराला हा वर्ग नाहींसा झाला असें नसून अद्यापही अशा तऱ्हेचे पेढीवाले, सावकार ह्या देशांत दुय्यम दर्जानें कां होईना पण सर्वत्र आहेत. पूर्वी व

आजमितीसही या खाजगी पेढीवाल्यांकडून अथवा सावकारांकडून शेतकीला पैसा पुरविला जात असे व आहे; शेतकऱ्यांच्या नडी भागविल्या जात असत व आहेत, आणि या लोकांकडून शेतकऱ्याला फार महत्त्वाची मदत होत आहे. पाश्चात्य पद्धतीवर उभारण्यांत आलेल्या अलीकडील बँकिंगच्या संस्थांचा व्याप बहुधा बंदरांतून व मोठमोठाल्या शहरांतूनच असल्यानें, देशावर अद्याप या लोकांचे हातीं सावकारी आहे व त्यांचेच मार्फत अद्याप अंतर्गत व्यापार व शेती यांना पैसा पुरविला जात असून यांचे अस्तित्वामुळें एक प्रकारची उणीवच भरून निघत आहे. खेडेगांवीं अद्याप या लोकांचें वर्चस्व पूर्वीइतकेंच अपरिहार्य भासत आहे. बदलत्या परिस्थितींत पाश्चात्य पद्धतीवर बँकिंगचा धंदा करणाऱ्या जॉइंट स्टॉक बँक्स व देशावरील व्यापारी यांचे दरम्यान या खाजगी पेढीवाले अथवा सावकार यांना उत्तम दुवा बनतां येईल. यांना देशावरील व्यापाऱ्यावर हुंडी काढून ती कसर देऊन मोठ्या बँकेकडे जरूर पडेल तेव्हां विकून पैसे उभे करतां येतील. मुंबईमध्यें आजमितीस श्रॉफ म्हणून संबोधिले जाणारे लोक गांवांतील व्यापारी व बँक्स यांचे दरम्यान मध्यस्थ (मिड्लमन) म्हणून काम करतात. यांत प्रामुख्यानें मारवाडी आणि मुलतानी लोक आहेत. सन १७७० पर्यंतचा असा एक स्वतंत्र भाग काढला याचें कारण एवढेंच कीं या मुदतींत ज्या तऱ्हेचा धंदा चालू होता, त्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीही प्रगतिपर अशी घडामोड झाली नाहीं.

इसवी सन १७७० पासूनचा म्हणजे पाश्चात्य संस्कृति, पद्धति, विचारसरणी यांच्या संसर्गाचा परिणाम झाला असलेला काळ होय. येथपासून आतांपर्यंतचा जो काळ, त्या काळांतील पेढीच्या वाढीचा इतिहास लिहिला जाण्याला अद्याप अवकाशच आहे. कारण ही वाढ अद्याप झपाट्यानें चालू आहे. तथापि झाली आहे एवढ्या वाढीचा इतिहासही पूर्णत्वानें जरी नाहीं

तरी कमी अधिक प्रमाणांत सर्वांना, विशेषतः अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना फारच मनोरंजक वाटेल.

राज्ययंत्र खिळखिळे होणें, अंतर्गत बंडाळी माजणें, देशांत गैरविश्वासाचे वातावरण निर्माण होणें, वगैरे कारणांनीं सर्वस्वीं पतीवर उभारलेल्या या बँकिंगच्या धंद्याला म्हणजे पर्यायानें व्यापाराला नेहमीं धोकाच असतो.

ज्या मोंगल व मराठी राज्याचे वर्चस्वावर त्या काळच्या बँकर्सची भरभराट अवलंबून होती त्यांच्या पाडावामुळें व गिऱ्हाइकांकडून येणें बाकी असलेली वसुली देशांत माजलेल्या अंधाधुंदीमुळें वसूल करणें अशक्यप्राय झाल्यानें या बँकर्सना फार नुकसान पोंचलें व आपसांतील कलहानें देशांतील पतीवर उभारलेली सर्व रचना खिळखिळी झाली.

देशाच्या व्यापारी पेठांत घडून येणारा बदल, त्यामुळें होणारा व्यापाराचा व व्यापारी रिवाजाचा बदल, व दुसऱ्या देशांशीं वाढणारा व्यापार या सर्वांचा परिणाम आधींच घसरगुंडीस लागलेल्या या बँकर्सना आणखी खालीं ओढण्यांत झाला.

ईस्ट इंडिया कंपनीला व तिच्या पंखाखालीं व्यापार करणाऱ्या पाश्चात्य व्यापाऱ्यांना या बँकर्सचा उपयोग त्यांच्या प्रतिकूल परिस्थिति व कार्यपद्धतीमुळें व भाषेच्या अडचणीमुळें सर्रास करून घेतां येईना. म्हणून त्यांनीं आपल्या वाढत्या व्यापारास व राजकारणास उपयोगी पडतील असे आधुनिक पद्धतीनें धंदा करणारे बँकर्स निर्माण करण्याचें धोरण आंखलें, याचा परिणाम असा झाला कीं, हे खाजगी बँकर्स अथवा पेढीवाले कायमचे दुय्यम परिस्थितींत राहून देशाच्या नाणेंबाजारांची सूत्रें या पाश्चात्य पद्धतीवर उभारलेल्या बँकिंगच्या संस्थांच्या हातीं गेलीं.

आधुनिक बँकर्स

सुधारलेल्या पद्धतीनें धंदा करणारी पहिली समाईक भांडवलाची पेढी इसवी सन १७७० सालीं ॲलेक्झांडर आणि कंपनी यांनीं कलकत्ता येथें काढली. या पेढीचें नांव हिंदुस्थान बँक असे होतें. ही पेढी वर दर्शविलेल्या खाजगी पेढीवाल्यांचे धंदे करून शिवाय करंट अकाउंट बँकिंग, म्हणजे चालू खात्यावर ठेवी घेणें (याचा अर्थ ठेवींचे पैसे सर्व अथवा मागेल तेवढे मागेल त्या वेळीं खातेदारास परत करावयाचे) या प्रकारचा धंदा व पाश्चात्य राष्ट्रांतील बँकांच्या नोटा काढण्याच्या प्रसिद्ध धंद्याप्रमाणें स्वतःच्या चलनी नोटा काढण्याचाही धंदा करूं लागली. अर्थात् या दोन नव्या धंद्यांपैकीं हा दुसऱ्या प्रकारचा म्हणजे नोटा काढण्याचा धंदा इकडे अगदींच नवीन होय. हिंदुस्थानांत यापूर्वीं कोणी चलनी नोटा काढल्याचें आढळून येत नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांत चलनी नोटांचा प्रसार होऊन सुमारें ३०० वर्षे झालीं आहेत. हिंदुस्थानांत जरी नव्हे तरी आशिया खंडांत यापूर्वीं कोठें चलनी नोटा प्रचलित होत्या किंवा नाहीं याबद्दल माहिती मिळवीत असतां चीन मध्यें चलनी नोटा सुमारें ४००० वर्षांपूर्वीं प्रचलित असल्याचा पुरावा पेट्रोग्राड (लेनिनग्राड) येथील एशियाटिक म्युझिअम्‌मध्यें असणाऱ्या त्या काळच्या चिनी बँक नोटवरून मिळतो. ही नोट इसवी सनापूर्वीं २८०० वर्षे या काळीं पेकिंग येथें निघाली. ती जाड पांढऱ्या कागदाची असून, तिजवर निळया काळ्या शाईच्या रंगाच्या ठशांत क्रमांक, बँकेचे नांव, निघाल्याची तारीख व कॅशरची सही, वगैरेंचा उल्लेख आढळतो.

हिंदुस्थान बँकेच्या नोटांना जरी सरकारची मान्यता नव्हती तरी त्या कलकत्त्यामध्यें व आसपासच्या भागांत त्या काळीं बऱ्याच उपयोगांत आणल्या जात असून, त्याची संख्या ४० पासून ५० लाखांपर्यंत पोंचली होती. किती एक वेळां सरकारी तिजोरींतूनही या नोटा घेतल्या जात असत

असें म्हणतात. १८१९ व १८२९ या साली देशांतील अस्वस्थतेमुळें या बँकेच्या सुमारें वीस लाख किंमतीच्या नोटा लोकांनीं परत केल्या व त्यांचे पैसेही बरोबर दिले गेले. १८३२ सालीं ही बँक बुडाली. यानंतर कलकत्त्यांतील निरनिराळ्या धनिक लोकांच्या मदतीनें दुसरी एक बँक काढण्यांत आली. तिचें नांव **युनिअन बँक** असें होतें. हिनें १८४८ पर्यंत धंदा केला.

प्रेसिडेन्सी बँक्स

हिंदुस्थान बँकेनंतर व युनिअन बँकेचे पूर्वी सन १८०६ सालीं **बँक ऑफ बेंगाल** नांवाची एक बँक चालू करण्यांत आली आणि तिला सन १८०९ सालीं ईस्ट इंडिया कंपनीकडून सनद मिळाली. सन १८४० मध्यें पहिली **मुंबई बँक** निघाली व सन १८४३ मध्यें **बँक ऑफ मद्रास** स्थापण्यांत आली. पहिली मुंबई बँक सन १८६८ सालीं मोडली आणि त्याच वर्षांत पुनः दुसरी मुंबई बँक स्थापन झाली. मुंबई व मद्रास येथील बँका निघण्यापूर्वी १८३६ सालापासून हिंदुस्थानांत एक मध्यवर्ती बँक असावी ही जी एक कल्पना होती, ती बँक ऑफ बेंगॉल हीच मध्यवर्ती बँक होऊन मूर्त स्वरूपांत येईल असें वाटत होतें. परंतु मुंबई बँक व मद्रास बँक या स्थापन झाल्यामुळें ही आशा निष्फळ ठरली व प्रत्येक इलाख्याला एक एक बँक स्थापन होऊन तिला इलाख्यापुरतें मध्यवर्ती बँकेचे स्वरूप आलें. बँक ऑफ बेंगॉलच्या स्थापनेच्या वेळीं तिच्या भांडवलापैकीं एकपंचमांश भागाचें भांडवल ईस्ट इंडिया कंपनीनें दिलें होतें. व त्याबद्दल ईस्ट इंडिया कंपनीला तीन डायरेक्टर नेमण्याचा अधिकार होता. हा अधिकार सन १८६२ सालीं सरकारनें काढून घेतला. या बँकांच्या नोटा ज्या वेळेस निघत होत्या त्या वेळेस त्या जवळ जवळ मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन शहरींच दिल्या घेतल्या जात

असत. याच वेळेला इतर सर्व बँकांचा नोटा काढण्याचा अधिकार हिरावून घेतला गेला. सन १८७६ सालीं सरकारनें या बँकांतील भांडवल काढून घेतल्यानें भागीदाराचें त्यांचें नातें संपलें व डायरेक्टर्स नेमण्याचा अधिकारही गेला. असें करण्याचें एक कारण असें असावें कीं, सन १८६८ सालीं मुंबई बँक बुडाल्यामुळें सरकारच्या वांट्यास भागीदार या नात्यानें आलेल्या तोट्याच्या दृष्टीनें सरकारची मोटी पंचाईत उडाली, आणि या अनुभवावरून त्यांनीं वरील गोष्ट केली असावी असो. यामुळें सरकारचा त्या बँकेवरील ताबा वर पाहतां गेला असावा असें वाटतें. परंतु या बँका सन १८७६ च्या प्रेसिडेन्सी बँक ॲक्ट नांवाच्या विशिष्ट कायद्यानें चालवावयाच्या असल्यामुळें त्या कायद्यांत सरकारतर्फे डायरेक्टर नेमला जाण्याचा अधिकार असल्यानें, ही सत्ता गेली नाहीं असेंच दिसून येईल. १८६२ सालीं नोटा काढण्याचा अधिकार हिरावून घेऊन त्याचा मोबदला म्हणून सरकारनें आपल्या उत्पन्नाच्या रकमा या बँकांच्या स्वाधीन केल्या. १८७६ पर्यंत कांहीं अटींवर सरकारचें सर्व उत्पन्न जें साधारणत: सरकारी तिजोरींत राहावयाचें, तें या बँकांकडे ठेवण्यांत येत असे. परंतु पुष्कळ प्रसंगी सरकारनें पैसे मागतांक्षणींच बँकांना पैसे परत न देतां आल्यामुळें सरकारची फारच अडचण झाली आणि म्हणून सन १८७६ मध्यें रिझर्व्ह ट्रेझरीज स्थापन करण्यांत आल्या. तेव्हांपासून सरकारी उत्पन्नापैकीं कांहींसा परंतु बराचसा भाग या बँकांकडे राहूं लागला. सदरहू रकमांवर व्याज आकारण्यांत येत नसे. याप्रमाणें हिंदी पैशाच्या बाजारांतील प्रेसिडेन्सी बँक या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या या तीन बँकांच्या वर्गाला नं. २चा वर्ग म्हणूं या. हा वर्ग हल्लीं अस्तित्वांत नाहीं. परंतु ऐतिहासिक समालोचनांत त्यांचा उल्लेख करणे अवश्यक असल्यानें तसा तो वर केला आहे.

हिंदी समाईक भांडवलाच्या बँका

यानंतर नं. ३ चा वर्ग म्हणजे हिंदी समाईक भांडवलाच्या बँका (जॉइंट स्टॉक बँक्स) होत. ह्या बँका हिंदुस्थानांत कंपनी कायद्यान्वयें बँकिंगचा धंदा करणाऱ्या कंपन्या म्हणून नोंदल्या गेल्या असून त्यांच्या मुख्य कचेऱ्या हिंदुस्थानांत आहेत. यांना कमर्शिअल बँक्स असेंही म्हणतात.

सन १८७० सालीं अस्तित्वांत असलेल्या सात बँकांपैकीं दि बँक ऑफ अपर इंडिया, स्थापना १८६३ आणि दि अलाहाबाद बँक, स्थापना १८६५, या प्रमुख होत. अलाहाबाद बँकेचें आजमितीस वसूल झालेलें भांडवल रु. ४०,५०,००० असून रिझर्व्ह फंड १ कोटी रुपयांवर आहे.

१८७० ते १८९४ या काळांत अशाच तऱ्हेच्या आणखी सात बँका निघाल्या त्यापैकीच दि औध कमर्शिअल बँक, स्थापना १८८१, पंजाब बँकिंग कंपनी, स्थापना १८८९, पंजाब नॅशनल बँक, स्थापना १८९४, या होत. पंजाब नॅशनल बँकेचे आजमितीस वसूल झालेलें भांडवल रु. ८७ लक्षांवर असून रिझर्व्ह फंडही तितकाच आहे. लहानशा प्रमाणांत असलेल्या परंतु याच काळांत निघालेल्या अशा आणखी कांहीं बँका म्हणजे काश्मीर बँक स्थापना १८८२ व पूना मर्कंटाईल बँक स्थापना १८९३ वगैरे होत. सन १८९४ ते १९०४ या काळांत मोठाल्या बँका म्हणजे ज्यांचे वसूल झालेलें भांडवल ५ लाख आहे, अशा निघाल्या नाहींत.

वंगभंगाच्या प्रकरणांतून निघालेल्या स्वदेशी चळवळीच्या प्रोत्साहनामुळें १९०६ सालापासून बँकांच्या वाढीची लाट पुन्हां उसळली व नवीन बँका स्थापन होऊं लागल्या, व ती वाढ १९१३ पर्यंत होत गेली. या काळांत ५ लाखापेक्षां जास्त भांडवल व रिझर्व फंड असणाऱ्या अशा बँकांची संख्या ९ वरून १८ पर्यंत गेली व त्या सर्वांचें वसूल झालेलें

भांडवल व रिझर्व फंड रु. ४ कोटींवर गेलें व त्यांच्याकडील एकूण ठेवी २२ कोटी रुपयांवर गेल्या. १९१३ च्या सुमारास लहानमोठ्या मिळून एकूण बँकांची संख्या ५०० च्या सुमारास होती.

१९०६ सालीं दोन महत्त्वाच्या बँका स्थापन झाल्या. एक दि बँक ऑफ इंडिया. ही पारशी लोकांच्या खटपटीनें मुंबई येथें स्थापन झाली, व तेव्हांपासून आजतागायत मोठ्या जोमानें व शिस्तीनें धंदा करीत आहे. तिचें आजमितीस वसूल झालेलें भांडवल सुमारें अडीच कोटी रुपयांचें असून रिझर्व फंड साडेतीन कोटींचा आहे. दुसरी सुप्रसिद्ध कै. डॉक्टर चुनीलाल सरैया यांच्या नेतृत्वाखालीं चाललेली दि इंडियन स्पेसी बँक ही होय. परंतु ती फार काळ टिकली नाहीं.

१९०८ ते १९११ या काळांत ज्या कांहीं बँका निघाल्या त्यांत प्रमुख अशी दि बँक ऑफ बरोडा ही आहे. ही बडोदे येथें सन १९०८ मध्यें स्थापन झाली व तेव्हांपासून आज तागायत व्यवहार करीत आहे. हिचें वसूल झालेलें भांडवल रुपये एक कोटी असून रिझर्व्ह फंड एक कोटी २८ लक्ष आहे. तिच्या या देशांत ५० ठिकाणीं शाखा असून परराष्ट्रांतही एजंट आहेत. याच काळांत नांव घेण्यासारख्या आणखी दोन बँका म्हणजे दि बेंगॉल नॅशनल बँक आणि दि क्रेडिट बँक ऑफ इंडिया, या निघाल्या. परंतु त्यांनीं कांहीं दिवस जरी भरभराटींत काढलें तरी त्या पुढें बुडाल्या.

सन १९११ मध्यें आणखी एक महत्वाची बँक स्थापन झाली व ती म्हणजे कै. सर फिरोझशहा मेथा यांनी स्थापन केलेली दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही होय. ही आज तागायत कार्य करीत असून मोठ्या भरभराटींत आहे. १९१८ सालीं स्थापन करण्यांत आलेली दि टाटा इंडस्ट्रिअल बँक ही १९२३ मध्यें या बँकेंत अंतर्भूत करण्यांत आली.

हिचे वसूल झालेलें भांडवल आज मितीस रुपये तीन कोटीवर असून रिझर्व्ह व इतर फंड रु. ३ कोटी ९८ लक्ष आहे. हिच्या शाखा हिंदुस्थान ब्रह्मदेश व पाकिस्तान या देशांतून पसरलेल्या आहेत. शिवाय लंडन येथें बार्कलेज बँक व मिडलंड बँक सारख्या महत्त्वाच्या बँका यांचें एजंट आहेत.

आजमितीस बँकांचें प्रमुख-पंचायतन (बीग फाईव्ह) म्हणून जे संबोधिलें जाते त्यांत (१) दि अलाहाबाद बँक, (२) दि पंजाब नॅशनल बँक, (३) दि बँक ऑफ इंडिया, (४) दि बँक ऑफ बरोडा व (५) दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचा समावेश होतो. या सर्व येथपर्यंतच्या काळांत निघालेल्या बँका होत. या बँकांची अशी सातत्यानें झालेली वाढ हिंदी बँक मॅनेजमेंटला खात्रीनें भूषणावह आहे व त्यामुळें हिंदी उद्योग धंद्यांचेही पाऊल पुढें पडले आहे.

आंतरराष्ट्रीय आर्थिक बदल यामुळें कोणत्याही राष्ट्रांत आर्थिक वावटळी अधून मधून उत्पन्न होतातच. अशाच तऱ्हेची एक वावटळ १९१३ मध्यें येथें आली व ती १९१७पर्यंत टिकली. या वावटळीची झळ या देशांतील कमकुवत अशा बँकांना चांगलीच भोवली. सुमारें ८७ बँका बुडाल्या. ही बँकिंग क्रायसिसची लाट १९१३ सालांत बँकिंगच्या वाढीला तात्पुरती कुंठीत करणारी ठरली.

१९१७ सालानंतर मात्र हें शैथिल्य जाऊन आलेल्या अनुभवावरून शहाणपण शिकून पुन्हां कार्याला सुरुवात झाली. पहिल्या महायुद्धानंतर आलेल्या कांहीं पर्वणींची संधी साधून पुन्हां बँकांच्या वाढीस सुरुवात झाली आणि त्यामुळें १९१७ ते १९२१ च्या दरम्यान पुन्हां कांहीं नवीन बँका स्थापन झाल्या.

१९१३ते१९१७ च्या बँकिंग अरिष्टांतून आलेल्या अनुभवावरून जी एक महत्वाची व उत्कृष्ट घटना घडली ती म्हणजे १९२१ मध्यें

तीन प्रेसिडेन्सी बँकांचें दि इम्पिरीयल बँक ऑफ इंडियामध्यें झालेलें रूपांतर होय.

अशा तऱ्हेची ही पर्वणी १९२२ पर्यंत टिकली. तेथून पुढें मात्र जी एक मंदी आली ती जवळ जवळ दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत टिकली. या काळांत सुमारें ४४७ बँका बुडाल्या. तरी सुद्धां हिंदी समाईक भांडवलांच्या बँकांनीं आपली सावकाश परंतु निश्चित अशी प्रगती चालूच ठेवली. १९३९ च्या सुमारास रु. ५ लाखावर भांडवल व रिझर्व असणाऱ्या अशा बँकांची संख्या ५१ पर्यंत वाढली व त्यांच्याजवळील एकूण ठेवी रु. १०० कोटीवर गेल्या. एवढेंच नव्हें तर बँकांच्या शाखामध्येंही १९२२ ते १९३९ या काळांत सुमारें तिपटीने वाढ झाली.

दुसऱ्या महायुद्धानें मात्र समाईक भांडवलाच्या बँकांच्या वाढीला बराच हातभार लावला. १९३९ ते १९४१ मध्यें फारशी वाढ झाली नाहीं. परंतु १९४२ ते ४६ मध्यें मात्र चांगलीच वाढ झाली. बँकांची व त्यांच्या शाखांची संख्या वाढली. १९४२ ते १९४६ मध्यें इम्पिरियल बँक व एक्स्चेंज बँका धरून एकूण शेडयुल्ड बँकांची संख्या जी १९३९ मध्यें ५१ होती ती जून १९४६ मध्यें ९३ झाली आणि त्यांच्या मुख्य व शाखा कचेऱ्या मिळून झालेली वाढ १३२८ वरून ३१०६ वर गेली. दुसऱ्या महायुद्धापूर्वीं त्यांच्याजवळील एकूण ठेवी रु. २३८ कोटीच्या होत्या. त्या १९४६ अखेर रु. १०९७ कोटीवर गेल्या. या वाढींत कांहीं गुणदोष होते व आहेत. तथापि ही वाढ प्रशंसनीय झाली असेंच म्हणावयास पाहिजे. विशेषत: युद्धकालांतील आर्थिक आपत्तींना व उलाढालींना ज्या तऱ्हेनें या खेरेस बँकांनीं तोंड दिलें तें खरोखरच आश्चर्यकारक आहे. एवढेंच नव्हें तर नंतरच्या शांततेच्या काळांतही उत्पन्न झालेल्या परिस्थितीलाही त्यांनीं व्यवस्थित तोंड दिलें. मात्र पाकिस्तान

निर्मितीच्या वावटळींत बँकांना थोडेसें अस्वास्थ्य निर्माण झालें. परंतु त्याच्यांतूनही त्या सहीसलामत बाहेर पडल्या व स्वातंत्र्योत्तर काळांत निर्माण झालेल्या अनेक अडचणींना उत्कृष्टपणें तोंड देऊन देशाच्या आर्थिक प्रगतीशीं त्या बऱ्याच समरस झाल्या. मात्र या सर्व परिस्थतींतून तरून जाण्यास रिझर्व बँकेचें मार्गदर्शन फार उपयोगी पडलें.

अशा तऱ्हेची ही बँकांना पर्वणी येण्याचें मुख्य कारण म्हणजे युद्धकालांत झालेली चलनाची वाढ होय. आणि त्याचबरोबर ज्या निरनिराळ्या कारखानदारींत कदाचित् यापैकीं कांहीं पैसा अडकला गेला असतां तो परराष्ट्रांतून मिळणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या अभावीं बँकांकडे पडून राहिला. अशी ही वाढ १९४२ पासून १९४८ पर्यंत सारखी होत गेली. परंतु १९४९ पासून मात्र ही प्रगति थोडी कुंठीत झाली आहे. तथापि यापुढील कालांतही बँकांच्या वाढीला उत्कृष्ट कार्यक्षेत्र असून यापुढें दिवसेंदिवस बँकांची प्रगती जास्त जास्तच होत राहील. मात्र त्या कामीं रिझर्व बँकेचे उत्कृष्ट मार्गदर्शन, नियंत्रण व सहाय्य आवश्यक आहे. महाराष्ट्रांत अलीकडील या कालांत स्थापन झालेल्या कांहीं बँका पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्र, पुणें, स्थापना १९३५; प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, पुणें, स्थापना १९३७; युनायटेड वेस्टर्न बँक, सातारा, स्थापना १९३७; न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, मुंबई, स्थापना १९३८; भारत इंडस्ट्रिअल बँक, पुणें, स्थापना १९३८; देवकरण नानजी बँकिंग कंपनी (देना बँक), मुंबई, स्थापना १९३८, बँक ऑफ पूना, पुणें, स्थापना १९४५.

वरील सर्व बँका शिडयूल्ड बँका आहेत. भारतांत ४२८ नॉन–शिडयूल्ड बँका आहेत.

एक्स्चेंज बँक्स्

हिंदी पैशाच्या बाजारांतील आणखी एका प्रकारच्या बँकरच्या वर्गाला एक्स्चेंज बँक असें म्हणतात व त्यांचा आपण चौथा वर्ग करूं या. एक्स्चेंज बँकेचे मुख्यत: दोन भाग करतां येतील. एक ज्यांचा बराचसा व्यवहार हिंदुस्थानांत आहे अशांचा भाग, व दुसरा निरनिराळ्या पाश्चिमात्य बँकांच्या एजन्सीज म्हणून आशिया खंडांत व्यवहार करतात यांचा होय. यापैकीं दुसऱ्या भागांत येणाऱ्या बँका म्हणजे कॉमटायर नॅशनल डी. एस्. कॉमटी डी. पॅरिस, याकोहामा स्पेसी बँक स्थापना जपान १८८०, एशियाटिक बँक वगैरे. या बँका हिंदुस्थानांत, फ्रान्स, जर्मनी, जपान, अमेरिका रशिया वगैरे राष्ट्रांशीं होणाऱ्या व्यवहाराचें हिताहित पाहातात. आतां पहिल्या भागापैकीं महत्त्वाच्या अशा ज्या बँका आहेत, त्यांपैकीं पहिली व सर्वांत जुनी दि देहली अँड लंडन बँक ही १८४४ मध्यें स्थापन झाली; चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना स्थापना इंग्लंड १८५३, दि हॉंगकॉंग अॅण्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन स्थापना हॉंगकॉंग १८६७, मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया स्थापना इंग्लंड १८९३ व दि ईस्टर्न बँक स्थापना इंग्लंड १९१० या होत. याखेरीज बँक ऑफ टैवान स्थापना जपान १८९९, लॉइडस् बँक स्थापना इंग्लंड. नॅशनल बँक ऑफ इंडिया स्थापना युनायटेड किंग्डम १८६३, अमेरिकन एक्सप्रेस कंपनी, बँको नॅशिओनल आल्ट्रामरीनो स्थापना पोर्तुगाल १८६४, ग्रींडलेज् बँक, मिटसुई बँक, नॅशनल सिटी बँक ऑफ न्यू यॉर्क, नेदरलंड इंडिया कमार्शियल बँक वगैरे इतरही परकीय बँका आहेत. या सर्व बँकांचा खुद्द हिंदुस्थानांत व इतर देशांत व्यापार चालतो. यांपैकीं चार्टर्ड बँक आणि हॉंगकॉंग बँक ह्यांचा व्यवहार पूर्वेकडील भागांत, विशेषत: चीनमध्यें, फार आहे.

...८

एक्सचेंज बँकेच्या क्षेत्रांत वावरणाऱ्या व म्हणून एक्सचेंज बँकरच्या वर्गातही मोडल्या जाणाऱ्या अशा प्रमुख हिंदी एक्सचेंज बँका म्हणजे दी इंपीरियल बँक ऑफ इंडिया, दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, दि पंजाब नॅशनल बँक आणि दि इंडियन बँक या होत. एक्सचेंज बँकांचें एक्सचेंज बँक असोशिएशन नांवाचें एक मंडळ आहे. तें या बँकांच्या धंद्याचें हितसंरक्षण पहातें.

एक्सचेंज बँका व इतर बँका यांच्या धंद्यांच्या पद्धतींत फारसा फरक नाहीं. एक्सचेंज बँकेजवळ असणारा पैसा भांडवल, शिलकींत पडलेला नफा, मुदतीच्या ठेवी अथवा चालु खात्यावर असलेल्या ठेवी या सर्वां-मिळून जमविलेला असतो. या ठेवी खुद्द हिंदुस्थानांत व लंडन या दोन्ही ठिकाणीं जमविण्यांत येतात. परंतु विशेषतः त्यांच्या लंडनमधल्या कचेरींत जितक्या जास्त ठेवी जमवितां येतील तितक्या चांगल्या व याकडेच त्यांचें विशेष लक्ष असतें. या ठेवी ते इतर इंग्लिश बँकांपेक्षां जास्त व्याजाचा दर देऊं करून मिळवूं शकतात. या बँका आपला पैसा हिंदुस्थान व इतर देशांत व्याजीं लावतात परंतु त्यांचा बराचसा पैसा हुंडयांच्या व्यवहारा-करितां राखून ठेविलेला असतो. त्यांच्याजवळील हुंडयांपैकीं कांहीं हुंडया हिंदुस्थानांत पटावयाच्या असतात; परंतु बऱ्याचशा हुंडया लंडनवर पटावयच्या असतात.

मुंबई आणि कलकत्ता या ठिकाणच्या नाणें बाजारांत एक्सचेंज बँकांचा हात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे. सुरवातीला या बँकांचा पैसा बंदरांतून व विशेषतः निर्यात होणाऱ्या मालाच्या तारणावर कर्जाऊ देण्याचे कामीं विशेष गुंताविला जात असे. परंतु आतां देशांतील अंतर्गत व्यापारांतही या बँका पैसा गुंतवूं लागल्या आहेत. हिंदुस्थानांत निरनिराळ्या हंगामांत व्यापारोपयोगी वस्तूंची खरेदी व हालचाल चालू होते; त्या वेळीं लंडन, न्यूयॉर्क व इतर परदेशस्थ नाणेबाजार येथून या बँका हिंदुस्थानांत पैसा

आणवितात. यामुळें येथील नाणेंबाजारांत स्वस्त पैसा मिळूं शकतो. देशाच्या आयात निर्यात व्यापाराचे कामीं पैसा पुरविणें हें या एक्सचेंज बँकांचें मुख्य कार्यक्षेत्र असून आयात निर्यात व्यापार करणारे अगर करूं इच्छिणारे यांना या बँकांपासून मदत होते व होऊं शकेल. याखेरीज पाश्चात्य देशांतील व्यापारी वर्गाशीं हिंदी व्यापाऱ्यांचें संघटन घडवून आणण्याचे कामींही या बँका मदत करितात. पाश्चात्य देशांतील व्यापारी कंपन्या अथवा पेढ्या अथवा व्यक्ति यांच्या क्रेडिटसंबंधीं अवश्य ती माहिती या बँका पुरवितात.

इम्पिरीयल बँक ऑफ इंडिया

आतां अगदीं अलिकडे म्हणजे सन १९२१ सालीं नवीन स्थापन झालेल्या इम्पिरीयल बँक ऑफ इंडिया या बँकेविषयीं लिहावयाचें म्हणजे इतकेंच कीं, तिच्या स्थापनेनें आणखी एखादा बँकर्सचा वर्ग निर्माण न होतां नं. २ च्या प्रेसिडेन्सी बँक्सच्या वर्गाचे जागीं व हिंदी समायिक भांडवलाच्या बँकर्सचे वर्गातच मोडणारी अशी एक फार मोठी व बहुतांशीं मध्यवर्ती बँक असें म्हणतां येईल. सन १८३६ पासून हिंदुस्थानांत एक मध्यवर्ती बँक असावी अशी वारंवार निरनिराळ्या ठिकाणाहून इच्छा प्रदर्शित करण्यांत येत होती. परंतु ही इच्छा १९२० सालापर्यंत सफल झाली नाहीं. चेंबरलेन कमिशन बसलें असतां या विषयाची चर्चा फार जोरानें झाली. सन १९२० सालीं सप्टेंबर माहिन्यांत हिंदुस्थान सरकारनें **इम्पिरीयल बँक ऑफ इंण्डिया ॲक्ट** नांवाचा कायदा करून त्या कायद्यान्वयेंही त्यावेळीं मध्यवर्ती बँक म्हणून इलाखा बँक्सना (बँक ऑफ बेंगॉल, बँक ऑफ बॉम्बे, व बँक ऑफ मद्रास,) तिच्यांत समाविष्ट करवून घेऊन स्थापन करण्यांत आली.

इलाखा बँकेचे जे पूर्वीं भागीदार होते किंवा त्या बँकांचा स्टॉक

ज्या गृहस्थांजवळ होता किंवा जे कोणी नवीन भागीदार होऊं इच्छीत होते ते सर्व या नवीन बँकेचे घटकावयव समजण्यांत आलें. या बँकेचें भांडवल ११ कोटी २५ लक्ष रुपयांचें असून प्रत्येक भाग ५०० रुपयांचा आहे. यापैकीं वसूल झालेले भांडवल आजमितीस रुपये ५,६२,५०,००० असून रिझर्व फंड रु. ६,३५,००,००० आहे. एवढ्या मोठ्या भांडवलाची ही पहिलीच बँक होय. प्रत्येक भागीदाराची जबाबदारी त्यानें आपल्या भागावर जितकी रक्कम अजून द्यावयाची बाकी असेल तेवढ्यापुरतीच असावी असें ठरविण्यांत आलें आहे. अर्थात् ही बँक एक खाजगी व्यापारी कंपनीच असून, केवळ तिचें कार्य त्या वेळीं बहुतांशीं सरकारी नियंत्रणानें होणारें असल्यानें व रिझर्व्ह बँकेची स्थापना होईपर्यंतच्या कालांत तिचें नातें सरकारचे बँकर अशा तऱ्हेचें असल्यानें फार तर तिला निमसरकारी बँक म्हणतां येईल.

या बँकेची मुख्य कचेरी दिल्ली येथें राहावयाची असून, स्थापनेपासून पांच वर्षांचे आंत तिनें निदान १०० शाखा तरी निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन केल्याच पाहिजेत असा कायद्यानें तिजवर निर्बंध घालण्यांत आला होता. ब्रँच व सबऑफिसेस मिळून आजमितीस या बँकेचीं ३९८ ऑफिसेस सर्व हिंदुस्थानभर उघडण्यांत आलेलीं आहेत. बँकेच्या इलाखा-निहाय मुख्य कचेऱ्या अनुक्रमें मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणीं असून, एक कचेरी लंडनमध्येंही उघडण्यांत आली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपूर्वी ही बँक इतर सर्व बँकांची बँक, व सरकारचीही बँक म्हणून समजली जात असे. सरकारची बँक म्हणून हिंदुस्थान सरकारचा सर्व बँकिंग व्यवहार करणें, सरकारतर्फे रकमांचा वसूल स्वीकारणें व रकमा देणें, सरकारी शिलका संभाळणें आणि हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या कर्जासंबंधीं सर्व व्यवस्था पाहाणें, अशा तऱ्हेचीं कामें ह्या बँकेनें करावयाची असत. अद्यापही ज्या ठिकाणीं रिझर्व्ह बँकेच्या

बँकिंग डिपार्टमेंटच्या शाखा नाहींत, परंतु इम्पिरीयल बँकेच्या शाखा उघडलेल्या आहेत, अशा ठिकाणीं सरकारी कामकाजाकरितां रिझर्व बँकेचे सोल एजंट म्हणून ही बँक आपला पूर्वीचा सरकारी बँकेचा दर्जा उपभोगीत आहे.

सरकारी बँक म्हणून त्या वेळीं असलेल्या जबाबदारीमुळें व नात्यामुळें, एक्सचेंज बँकांचे व्यवहार, सहा महिन्यांतून जास्त मुदतीचीं कर्जे खुद्द बँकेच्याच भागांवर, स्टॉकवर किंवा कोर्ट ऑफ वॉर्डसच्या ताब्यांत असलेल्या इस्टेटीव्यतिरिक्त इतर कोणत्याही जंगम वस्तूंचे तारणावर किंवा स्थावर मिळकतीवर किंवा त्या मिळकतीच्या कागदपत्रांवर कर्ज देणें; वैयक्तिक तारणावर कर्ज देणें; कसर घेऊन हुंड्या पटविणें वगैरे स्वरूपाचे धंदे करण्याची त्या वेळीं मनाई करण्यांत आली होती. परंतु १९३४ च्या इम्पिरीयल बँक ऑफ इंडिया अमेंडमेंट (सुधारणा) कायद्यान्वयें पूर्वी घालण्यांत आलेल्या या निर्बंधांपैकीं बरेच निर्बंध हल्लीं कमी करण्यांत आले असून बँकेला आतां इतर जॉइंट स्टॉक व एक्सचेंज बँकांचे बहुतेक सर्व धंदे करतां येतात. परराष्ट्रांत पटावयाच्या असलेल्या हुंड्या विकत घेणें, हिंदुस्थानाबाहेर कर्जाऊ रकमा घेणें, आणि एक्सचेंज बँकांचे व्यवहार करणें या विशेष सवलती सुधारणा कायद्यानें प्राप्त झाल्या. याखेरीज बँकेच्या इलाखानिहाय शाखांत (मुंबई, कलकत्ता, मद्रास) एक्झीक्युटर आणि ट्रस्टी डिपार्टमेंट काढून त्यांमार्फत एका नवीन धंद्याचा उपक्रम करण्यांत आला आहे. या शहरांबाहेर राहणाऱ्या गिऱ्हाइकांचीं या बाबतींतील कामें बँकेच्या ज्या शाखेमध्यें त्यांचीं खातीं असतील त्या शाखेमार्फत करून देण्याची व्यवस्था होऊं शकते.

मृत्युपत्रान्वयें अथवा ट्रस्ट करून देऊं केलेल्या इस्टेटीची व्यवस्था लावणें, पहाणें, देखरेख करणें; अशा इस्टेटीबाबत येणें होणारें उत्पन्न वसूल करणें; मृत्युपत्र अथवा ट्रस्टअन्वयें देणें होत असलेल्या रकमांचा बटवडा करणें; वगैरे कामें या शाखेमार्फत होतात. मृत्युपत्र

चालविणारे (एक्झीक्युटर), मृत्युपत्रान्वयें विश्वस्त (ट्रस्टी), अज्ञानास मिळणाऱ्या देणगीबाबत ट्रस्टी, डिबेंचर-होल्डर्सचे ट्रस्टी, सार्वजनिक धर्मादाय अथवा इतर ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करण्याचें बँक पत्करते. वाटल्यास मृत्युपत्र अथवा ट्रस्ट करणाऱ्याना आपल्या नातेवाइकांतून अथवा स्नेह्यांतून आणखी कोणाला बँकेच्या जोडीला सहविश्वस्त म्हणून नेमतां येतें. मृत्युपत्र करून त्या अन्वयें बँकेस मृत्युपत्र चालविणारे म्हणून नेमूं इच्छिणारांनीं मृत्युपत्राचा मसुदा बँकेकडे पाठविल्यास बँक तो विनामूल्य तपासून देते. या सर्व कामगिरीबद्दल अर्थात् बँक कांहीं कमिशन घेते. बँक ही स्वतंत्र व निर्हेतुक सरकार-दरबारीं नोंदलेली संस्था असल्यानें सरळ, निःपक्षापाती व एकतंत्री कारभार अथवा व्यवस्था लाभूं शकते.

सहकारी (को-ऑपरेटिव्ह) बँका

आर्थिक व्यवसायक्षेत्रांत गुंतलेल्या समाजाचे वर्ग करावयाचे झाल्यास ते व्यापार–उद्योगधंद्याचे क्षेत्रांत वावरणाऱ्यांचा एक व शेतकीच्या व्यवसायांत गुंतलेल्यांचा दुसरा असे पडतात. यापैकीं पहिल्या वर्गाला समाईक भांडवलांच्या बँका व एक्सचेंज बँका यांचेकडून पैशाचा पुरवठा होतो, व दुसऱ्या वर्गाला खाजगी सावकार (मनीलेंडर्स) आणि सहकारी तत्त्वावर उभारण्यांत आलेल्या आधुनिक पद्धतीनें सावकारी करणाऱ्या संस्था यांचेमार्फत पैशांचा पुरवठा होतो.

शेतकीव्यवसायांतील लांब मुदतीच्या कर्जाची आवश्यकता, आनिश्चित उत्पन्न व इतरही अनेक अडचणींमुळें बँकिंगच्या दृष्टीनें असमाधानकारक परिस्थिति असल्यानें समाईक भांडवलाच्या बँकांना प्रत्यक्षपणें या क्षेत्रांत पैसा पेरतां येत नाहीं. ही परिस्थिति अनेक कारणांमुळें आहे. जमिनीचे लहान लहान तुकडे, निसर्गांतील फेरबदलांमुळें उत्पन्नाबाबत येणारा अनिश्चितपणा, कमी उत्पन्न, पडत्या बाजारभावामुळें मालाच्या मोबदल्यांत

येणारा कमी पैसा, मालाची विक्री करण्याबाबत शेतकऱ्याला किफायतशीर होईल अशा बाजारपेठेची उणीव, तारण या दृष्टीनें जमिनीची अनुपयुक्तता, शेतकींतून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त अन्य तऱ्हेनें मिळकत करतां येणाऱ्या साधनांचा अभाव, शेतकऱ्याकडून वसूली करण्याबाबत असणाऱ्या कायद्याचे कडक निर्बंध, लांब मुदतीपावेतों ऋणकोकडे मुद्दल रक्कम पडून देण्याची आवश्यकता, व सर्वसाधारण अज्ञान, हीं तीं कारणें होत. यामुळें या दुसऱ्या वर्गाचे हातीं या क्षेत्रांतील पैशाचीं सूत्रें आहेत.

सावकार (मनीलेंडर्स) या वर्गात अनेक लोकांचा समावेश होतो. धंदेवाईक सावकार, पठाण, जमीनदार, मोठाले शेतकरी, मारवाडी, व्यापारी, कमिशन एजंटस्, दलाल, अडते, सरकारचे सेवानिवृत्त नोकर (पेन्शनर्स), वकील, इतर सधन वगैरे सावकारी करतात. परंतु या सर्वांचा मूलभूत उद्देश शेतकीच्या व्यवसायाला केवळ पैसा पुरविणें इतकाच नसतो. मुलतानी, चेट्टिअर्स अगर गुजराथी श्रॉफ – ज्यांना प्रायव्हेट बँकर्स असें म्हणतात – यांची सावकारी आणि तिचें धोरण निराळ्या स्वरूपाचें असतें.

शेतकी व्यवसायांत गुंतलेले लोक हे आपल्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें सावकारवर्गावरच अवलंबून आहेत, आणि सावकारवर्गाची या वर्गाला महत्त्वाची मदत झालेली आहे. तथापि केवळ गरजा भागविण्याकरितां ऋणकोला कर्ज देणें, व अशा तऱ्हेच्या मदतीबद्दल योग्य मेहेनतान्याची अथवा मोबदल्याची अपेक्षा करणें एवढेंच धोरण या लोकांनीं ठेवलें नसल्यानें त्यांच्या महत्त्वाच्या व फार मोठ्या मदतीबद्दल लोकांना कृतज्ञता न वाटतां उलट सावकारवर्गाचे विरुद्धच लोकमत बनलें आहे. जबर व्याजाचा दर, हिशेबाची रांगडी पद्धत, ऋणकोची मालमत्ता अपहार करण्याची लालसा, या दुर्गुणांनीं हा धंदा कलंकित झाल्यानें अशा तऱ्हेचें लोकमत बनलें गेलें आहे. या प्रकारची सावकारी (शायलॉकीयन)

वृत्ति हिंदुस्थानांतच आहे असें नसून पाश्चात्य राष्ट्रांत अथवा जगांतील कोठल्याही भागांत असल्याचें दिसून येतें.

१७ नोव्हेंबर १९४७ पासून मुंबई प्रांतांत सावकारी नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यामुळें या व्यवसायांत आतां बरीच सुधारणा होऊं शकेल व अनिष्ट पद्धतीला पायबंद पडून ऋणको व धनको अशा उभयपक्षीं हिताच्या गोष्टी घडतील अशीं अपेक्षा आहे.

अशा तऱ्हेनें गांजलेल्या परिस्थितींत आलेल्या निकृष्टावस्थेंतील लोकांनीं एकमेकांच्या सहकार्यानें पैशाची गरज पुरविणारी अशी एक सांघिक संस्था निर्माण केली, ती सहकारी पतपेढी होय. या विचारसरणीचा व पद्धतीचा उगम पाश्चात्य राष्ट्रांत झाला व तिचे पुरस्कर्ते रफीसन व शूल हे होत. परस्परसहाय्य करण्याच्या उद्देशानें एकत्रित होणाऱ्या लोकांच्या पतीवर पैसा उभारून त्यामार्फत त्यांच्यांतील गरजू लोकांच्या नडी भागविण्याकरितां पैशाचा पुरवठा करणाऱ्या संस्था म्हणून सहकारी पतपेढ्या स्थापण्यांत आल्या. बँकिंगच्या सर्व प्रकारचे व्यवसाय या पेढ्या करतातच असें नाहीं; तथापि बँकिंगचा मूलभूत व्यवसाय जो लोकांकडून ठेवी ठेवून घेणें व लोकांना कर्जाऊ रकमा देणें, तो ह्या संस्था करित असल्यानें यांना बँकिंगच्या संस्थांमध्यें स्थान प्राप्त होतें. सहकारी चळवळींतून प्रस्थापित होऊं लागलेल्या अशा या संस्थांवर सरकारी व कायदेशीर नियंत्रण असावें म्हणून सन १९०४, १९१२ व१९२५सालीं या मंडळ्यांबाबत सरकारकडून कायदे करण्यांत आले व त्या कायद्यांच्या नियंत्रणान्वयें सहकारी पतपेढ्या व तिचे सभासद आपला कारभार हाकीत आहेत. अशा तऱ्हेनें खेडयापाडयांतून बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या एका आधुनिक बँकर्सची वाढ या कारणानें झालेली आहे व बँकिंगच्या क्षेत्रांत बँकर्सचा म्हणून हा एक स्वतंत्र वर्गच 'सहकारी बँका' या नांवानें संबोधिला जातो.

खेडोपाडीं व निकृष्टावस्थेंतील लोकांकडून स्थानिक श्रीमान् अगर सावकार वर्गाला वगळून स्थापन करण्यांत आलेल्या या संस्थांजवळ ठेवीच्या रूपानें येणारा शिल्लक संचय असा कितीसा असणार व तो पुरेसा कसा होणार हा एक प्रश्न आणि निरनिराळ्या ठिकाणीं स्थापण्यांत आलेल्या या सहकारी पतपेढ्यांचें धोरण एकमेकांना मारक न होतां पूरक व्हावें म्हणून त्यांचें एकीकरण करण्याची आवश्यकता हा दुसरा प्रश्न असे हे दोन्ही प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें स्थापन करण्यांत आलेल्या ज्या सहकारी संस्था त्या डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक्स् या होत.

जिल्ह्याच्या ठिकाणीं असणाऱ्या धनिक व व्यापारी वर्गाकडून ठेवी मिळवून व भांडवलाचे रूपानें पैसा गोळा करून जमणाऱ्या निधींतून खेडोपाडीं असणाऱ्या सहकारी पतपेढ्यांना कर्जाऊ रक्कम देणाऱ्या अथवा खेड्यांतील पतपेढीमध्यें ठेवीदार म्हणून तेथील मानानें भली मोठी रक्कम पेढीमध्यें ठेव म्हणून ठेवणाऱ्या अशा या खेडेगांवची पतपेढी व जिल्हा-निहाय शिल्लक संचय असलेला वर्ग यांचे दरम्यान दुवा म्हणून उभारण्यांत आलेल्या सहकारी संस्था होत.

याच विचारसरणीनें इलाखाशहरीं स्थापन करण्यांत आलेल्या मध्यवर्ती सहकारी इलाखा बँकेचा आणखी एक वर्ग या क्षेत्रांत निर्माण होतो. आपल्या इलाख्यांत मुंबई शहरीं दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड म्हणून सहकारी क्षेत्रांतील पतपेढ्यांची व निरनिराळ्या डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक्स, अर्बन बँक्स व इतर सहकारी पेढ्या या सर्वांची मध्यवर्ती बँक म्हणून स्थापन करण्यांत आलेली आहे. इलाखाशहरीं असणाऱ्या अत्यंत मोठ्या धनिक लोकांचा शिल्लक संचय ठेव म्हणून मिळवून त्यापैकीं कांहीं भाग, डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँक्स अथवा ज्या ठिकाणीं अशा डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँक्स स्थापन झालेल्या नसतील त्या ठिकाणीं आपल्या स्वतःच्या शाखांमार्फत, त्या त्या जिल्ह्यांतील सहकारी पतपेढ्यांना कर्जाऊ

देण्याचा व्यवसाय ही मध्यवर्ती बँक करिते. अशा तऱ्हेनें मुंबईसारख्या इलाख्याच्या राजधानींतील पैसा वर दर्शविलेल्या निरनिराळ्या दालनांतून शेवटलें दालन म्हणजे खेडोपाडीं स्थापलेली सहकारी पतपेढी हिचे मार्फत खेडयापाडयांतून आर्थिक व्यवसायक्षेत्रांत गुंतलेल्या व विशेषत: शेतकीशीं संलग्न अशा व्यवसायांत गुंतलेल्या वर्गाला आपआपल्या व्यवसायाच्या गरजा भागविण्याचे कामीं पुरविला जातो.

हिंदुस्थानांत आजमितीस एकूण १,७३,०९० सहकारी संस्था असून त्यांतील एकुण सभासद १ कोटी २५ लाखांवर आहेत व त्यांतील खेळतें भांडवल २ अब्ज, ३३ कोटी १० लाख रुपये आहे. यापैकीं १,२४,००६ पतपेढ्या (क्रेडीट सोसायट्या) आहेत. म्हणजे एकूण सहकारी संस्थांच्या ७३ टक्के संस्था पतपेढ्या आहेत. यांत शेतकी पतपेढ्या १,१६,५३४ असून बिगर शेतकी (अर्बन) पतपेढ्या ७४७२ आहेत.

शेतकी पतपेढ्यांमधील सभासदांची एकूण संख्या ४८,१७,५४५ आहे. एका कुटुंबांत पांच माणसें धरल्यास खेडोपाडीं असणाऱ्या सुमारे अडीच कोटी लोकांच्या आर्थिक गरजा सहकारी चळवळीनें आज भागविल्या जात आहेत. यांचें एकुण खेळतें भांडवल रुपये ३५ कोटींवर असून यांचे मार्फत सुमारे २५ कोटी रुपये शेतकऱ्यांना कर्जाऊ दिले गेले आहेत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची एकुण संख्या ४९८ असून त्यांत एकूण सभासद १,८९,७२२ आहेत. पैकीं ९९१२३ पतपेढ्या सभासद असून ९०५९९ व्यक्ती सभासद आहेत. त्या सर्वांचें खेळतें भांडवल सुमारें ५० कोटी आहे. यापैकीं मुंबई राज्यांत एकूण ४३, पश्चिम बंगाल ४०, मद्रास ३१, उत्तर प्रदेश ६७, मध्यप्रदेशांत ४१, पंजाबांत ६५, बिहार ४५, हैद्राबाद ४६, मध्यभारत २५ अशा प्रामुख्यानें आहेत.

मुंबई राज्यांतील ४३ बँकांमध्यें एकूण ३८३३० सभासद आहेत.

पैकीं ३१०९९ व्यक्ती–सभासद असून ७२३१ पतपेढ्या–सभासद आहेत. यांचें एकूण खेळतें भांडवल १२ कोटींवर आहे.

इलाखानिहाय सहकारी बँका (प्रॉव्हिन्शियल को. ऑ. बँकस्) एकूण १४ असून त्या मद्रास, मुंबई, पं. बंगाल, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब, बिहार, ओरिसा, म्हैसूर, हैद्राबाद, अजमेर व कुर्ग या प्रांतांत प्रत्येकीं एक व आसाममध्यें दोन अशा आहेत. यांची एकूण सभासद-संख्या १८६१८ असून खेळतें भांडवल ३० कोटी रुपयांवर आहे.

सहकारी शेतकी पतपेढ्या, अर्बन व डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँका आणि बिगरशेतकी पतपेढ्या या सर्व संस्था समाईक भांडवलाच्या कंपन्यां-प्रमाणेंच संघटित संस्था असून, कंपनी कायद्यान्वयें कंपनी रजिस्ट्रारकडे नोंदविण्याऐवजीं त्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, यांचेकडे नोंदविलेल्या असतात. त्यांचीही लेखी घटना (उद्देश आणि नियम [बायलॉज]) असते व त्या अनुरोधानें आणि आधारेंच त्यांचा कारभार चालतो. शेतकी पतपेढ्यांखेरीज बाकी सर्व प्रकारच्या सहकारी पेढ्या, भागांचें भांडवल (शेअर कॅपिटल) उभारतात. खेडोपाडीं असणाऱ्या शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांची जबाबदारी अमर्यादित (अन्‌लिमिटेड लायबिलिटी) असते आणि दुसऱ्या सर्व प्रकारच्या सहकारी पेढ्यांचे सभासदांची जबाबदारी मर्यादित (लिमिटेड लायबिलिटी) असते. कंपनीमध्यें ज्याप्रमाणें शेअरहोल्डर्स व डायरेक्टर्स असतात त्याचप्रमाणें सहकारी पेढ्यांमध्येंही शेअरहोल्डर्स आणि डायरेक्टर्स असतात परंतु त्यांना अनुक्रमें सभासद (मेंबर्स) व मॅनेजिंग कमिटीचे सभासद या नांवानें संबोधतात.

सहकारी पतपेढ्यांचें पुढें दिल्याप्रमाणें वर्गीकरण करण्यांत येतें : (१) रीसोर्स सोसायट्या, (२) प्रोड्यूसर्स, (३) कंझ्यूमर्स, (४) हौसिंग व (५) जनरल.

यांपैकीं नं. १ मध्यें शेतकी पतपेढ्या, अर्बन (शहरांतून असणाऱ्या) पतपेढ्या व बँका, सेंट्ल को-ऑपरेटिव्ह बँक्स यांचा समावेश होतो. नं. २ चे वर्गामध्यें धंदे करणाऱ्या, उदाहरणार्थ प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशिंग सोसायटी, सहकारी साबू तयार करणारी मंडळी, सहकारी डेअरी सोसायटी, सहकारी विणकर सोसायटी वगैरेंचा समावेश होतो. नं. ३ चे वर्गामध्यें सहकारी वस्तुभांडारें व मालाचा पुरवठा करणाऱ्या मंडळ्या यांचा समावेश होतो. नं. ४ चे वर्गामध्यें घरें बांधून देण्याकरितां स्थापण्यांत आलेल्या सहकारी सोसायट्या येतात व नं. ५ चे वर्गांत इतर, उदाहरणार्थ मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, तालुका डेव्हलप्मेंट असोसिएशन, सहकारी वाचनालय सोसायटी, सहकारी पाणीपुरवठा (इरिगेशन) सोसायटी वगैरे येतात.

नं. १ चे वर्गामध्यें येणाऱ्या शेतकी पतपेढ्यांमध्यें सभासदांना फक्त कर्जाऊ रक्कम देण्याचाच व्यवहार करणाऱ्या (क्रेडिट सोसायटीज) व सभासदांना खत पुरविणाऱ्या, धान्य पुरविणाऱ्या, सहकारी खरेदीविक्री करून देणाऱ्या, विमा उतरणाऱ्या, आउतें पुरविणाऱ्या, कुंपण घालून देणाऱ्या वगैरे प्रकारच्या प्रत्यक्ष पैशाऐवजीं इतर गरजा पुरविणाऱ्या (नॉन-क्रेडिट) सोसायट्याही असतात.

जिल्हानिहाय असणाऱ्या सेंट्ल को-ऑपरेटिव्ह बँक्स, प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक आणि तिच्या शाखा व शहरांतून असणाऱ्या अर्बन बँक्स या समाईक भांडवलाच्या बँकांप्रमाणेंच सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करतात. फक्त त्याच्या सभासदाखेरीज इतरांशीं त्यांना व्यवहार करतां येत नाहीं.

दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

मुंबई इलाख्यांतील सर्व सहकारी बँकांची व पतपेढ्यांची मध्यवर्ती अशी ही बँक मुंबई येथें ऑक्टोबर १९११ मध्यें कै. सर विठलदास डी.

ठाकरसी व कै. सर लल्लुभाई सामळदास यांच्या खटपटीनें व पुढाकारानें स्थापन करण्यांत आली. हिचें आरंभीचें नांव " बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक " असें होतें. परंतु पुढें जिल्हानिहाय सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक्स स्थापन होऊं लागल्यानें व हिचें कार्यक्षेत्र सर्व मुंबईइलाखाभर असल्यानें सन १९२४ मध्यें हिनें पूर्वीचें नांव बदलून " दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक " असें नांव स्वीकारलें. यानंतरही आतां पुन्हां १ ऑक्टोबर १९५२ पासून " दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक " असें नामाभिधान करण्यांत आलें आहे.

गेल्या ४० वर्षांत बँकेची झपाट्यानें व शिस्तीनें प्रगति होत गेली असून त्याचें बरेंचसें व प्रमुख श्रेय मुंबई राज्याचें माजी अर्थमंत्री श्री. वैकुंठलाल लल्लुभाई मेहता यांना आहे. मंत्रीपदापूर्वी बरींच वर्षे ते या बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर होते.

बँकेचे वसूल झालेले शेअर भांडवल रु. ४८,८५,२०० आहे. रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ३९,४८,७०० असून खेळतें भांडवल आजामितीस रु. १३,८०,४९,८०० आहे. निरनिराळ्या ठिकाणीं मिळून मुंबई राज्यांत तिच्या १५ जिल्ह्यांतून ६२ शाखा आहेत.

लँड मॉर्गेज बँका

शेतकरी काढीत असलेल्या कमी मुदतीच्या अथवा लांब मुदतीच्या कर्जाला द्यावयास त्याजपाशीं असणारें एकच एक तारण म्हणजे जमीन होय. कमर्शियल बँकिंगच्या दृष्टीनें हें तारण निरुपयोगी अथवा गौण समजण्यांत येत असल्यानें, तत्त्वतः शेतकऱ्याजवळ तारणच नाहीं असें प्रस्थापित होतें. ही परिस्थिती दूर करावयाची झाल्यास त्याजपाशीं असलेल्या वस्तूला म्हणजे जमिनीला व्यवहारमान्य अथवा सरकारमान्य तारणाचें स्वरूप देणें आवश्यक आहे. हल्लीं हिंदुस्थानांतील शेतीवर अव-

लंबून असणाऱ्या लोकांची संख्या लक्षांत घेतां, जी सुमारें ७० टक्के आहे, शेतकीव्यवसायाला भांडवल पुरविण्याची आवश्यकता किती आहे याचें महत्व लक्षांत येईल. जमीनदार व कूळ यांचे परस्पर हक्कहितसंबंध, शेतकरी-ऋणविमोचन कायदे व त्यांअन्वयें शेतकऱ्यास मिळणारें संरक्षण वगैरे गोष्टींचा साध्या कमर्शियल बँकिंगच्या दृष्टीनें शेतकऱ्यास पैसा पुरविण्याचे प्रश्नावर अनिष्ट परिणाम होत असल्यानें देशांत उपलब्ध असलेल्या बँकापासून शेतीला उपयोग होत नाहीं. इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांतही असाच अनुभव आहे कीं, शेतकीव्यवसायाला सर्वसाधारण बँकिंग संस्थांचा उपयोग होऊं शकत नाहीं आणि म्हणून शेतकीव्यवसायाला मदत करण्याकरितां विशिष्ट हेतूनें प्रेरित झालेल्या, विशिष्ट घटनेनुसार अस्तित्वांत येणाऱ्या, शेतकीस पैसा पुरविणें या मूलभूत उद्देशानें स्थापित होणाऱ्या अशा स्वतंत्र बँकिंग संस्थांची आवश्यकता आहे असेंच सिद्ध झालें आहे.

शेतकऱ्यांच्या गरजा दोन प्रकारच्या असतात; चालू व्यवहाराकरितां लागणारा पैसा, व उत्पादनशक्ति वाढविण्याचे दृष्टीनें गुंतविण्यास हवा असलेला पैसा, ह्या त्या दोन गरजा होत. बीं–बियाणें विकत घेणें, खत विकत घेणें, शेतकीचीं आयुधें, बैल, विकत घेणें वगैरेकरितां लागणारा पैसा कमी मुदतीनें मिळाला असतां चालतें व या कामाकरितां आजघटकेला सहकारी बँकामार्फत शेतकऱ्यांची गरज भागविली जात आहे परंतु ताली घालणें, जमिनी ओढणें बिगरलागवडींत असलेली जमिन लागवडीस आणणें विहिरी खणणें, घरें बांधणें वगैरे प्रकारच्या गरजा भागविण्याचें कामीं गुंतवावा लागणारा पैसा लवकर परत येण्याचा संभव अगर शक्यता नसल्यानें सहकारी बँकामार्फत पुरवठा होऊं शकत नाहीं आणि म्हणून या तऱ्हेचे खर्च करून जमिनीची सुधारणा करणें व त्यामार्फत धनोत्पादनाचें साधन वाढविणें या गोष्टी दुरापास्त झालेल्या आहेत.

शेती सुधारण्याबरोबर शेतकरी सुधारण्याचाही जो एक प्रश्न हिंदुस्था-

नांत आहे तो सोडविण्याचेंही काम अशा विशिष्ट बँकेलाच करावयाचें आहे. शेतकरी सुधारणे म्हणजे त्याच्यावरील अवजड कर्जाचा बोजा कमी करणें. त्याला आपलें कर्ज फेडून टाकण्याचे कामीं हवा असलेला पैसा पुरविणें आणि तो त्याचेकडून लांब मुदतीनें व त्याला देतां येईल अशा सवलतीच्या हप्त्यानें परत घेणें अशी व्यवस्था करावयास हवी आहे. वास्तविक जमिनींची सुधारणा करण्याचे कामीं देण्यांत येणारा पैसा या संस्थांच्या ध्येयाला धरून होणारा आहे. जुनीं कर्जे जर जमिनी सुधारण्याचे कामीं काढलेल्या पैशामुळें असतील तर एकवार तीं फेडण्यास मदत करण्याचे कामीं उपयोगांत आणलेला पैसा जमीन सुधारण्याचे कामीं उपयोगांत आणल्यासारखाच ठरवितां आला असता. परंतु आपल्या शेतकऱ्याच्या कर्जापैकीं बराचसा भाग फालतू प्रापंचिक खर्च, गैरशिस्त व्याज व अनागोंदी हिशोब या कारणांनीं झाला असल्यानें या कामीं करण्यांत येणारी मदत धनोत्पादक ठरत नाहीं. तथापि आज हा प्रश्न सोडविल्याखेरीज शेतकरी व पर्यायानें शेती, सुधारणें अशक्य झालें असल्यानें इतर सर्व उद्देशांबरोबर हाही उद्देश स्वीकारावा लागत आहे.

वरील सर्व कारणांकरितां लांब मुदतीनें व स्वल्प व्याजाच्या दरानें कर्ज देणें, परतफेडीचा हप्ता शेतकऱ्याचे उत्पादनशक्तीच्या मर्यादेंत राहील असा ठरविणें आणि शेतकऱ्याजवळ असलेल्या एकच एक प्रकारच्या तारणावर म्हणजे जमिनीवर कर्ज देण्याचे मूलभूत उद्देशानें स्थापन झालेली जी बँक तिला लँड मॉर्गेज बँक असें म्हणतात.

लँड मॉर्गेज बँकांचे पुढें दिल्याप्रमाणें प्रकार आहेतः–(१) कर्जाऊ रक्कम घेणारे (ऋणको) यांचीच केवळ बनलेली अशी संस्था हा एक प्रकार होय. ही संस्था सभासदांच्या मालकीच्या जमिनींची एकूण होणारी किंमत अजमावून त्या किंमतीच्या कांहीं प्रमाणांत, उदाहरणार्थ शेंकडा ५० टक्के, किंमतीचे डिबेंचर बॉंडस् (कर्जरोखे) काढून विकतात व त्या विक्री-

पासून गोळा होणारा पैसा आपापसांमध्यें ज्याची त्याची जमीन व तिची किंमत यांचे प्रमाणांत कर्जाऊ म्हणून वांटून घेतात. हे कर्जरोखे (डिबेंचर बॉंडस्) बेअरर (ज्याच्याजवळ असतील त्याची मालकी प्रस्थापित करणारे) असतात व त्यांवर देऊं होणारे व्याज ते जो कोणी धारण करीत असेल त्याला मिळतें. या प्रकारच्या बँका जर्मनीमध्यें विशेष आहेत. (२) व्यापारी तत्त्वावर व धोरणानें फार मोठी गंगाजळी अगर अन्य तऱ्हेनें लांब मुदतीच्या ठेवी ज्यांचेजवळ आहेत अशा व्यक्ति अगर संस्था यांनीं चालविलेली लँड मॉर्गेज बँक हा दुसरा प्रकार होय. फ्रान्समधील क्रेडिट फॉनशिअर ही संस्था याचा नमुना होय. (३) तिसरा प्रकार सहकारी लँड मॉर्गेज बँकांचा. सहकारी तत्त्वावर व सहकारी कायद्यान्वयें या संस्था स्थापन केलेल्या असतात व त्यांमध्यें कर्ज घेणारे व कर्ज न घेणारे अशा दोन्ही प्रकारचे सभासद असतात.

कर्जाच्या परतफेडीची मुदत २० ते ७५ वर्षेपर्यंत देण्याचें प्रचलित आहे. हिंदुस्थानांत २० वर्षे, फिनलंडमध्यें ३० वर्षे, चिलीमध्यें ३३ वर्षे, न्यूझिलंडमध्यें ३६ वर्षे, ऑस्ट्रेलिया ४२ वर्षे, इटली व जपानमध्यें ५० वर्षे, जर्मनी ५३ वर्षे, ऑस्ट्रिया ५५ वर्षे, स्वित्झर्लंड ५७ वर्षे, डेन्मार्क ६० वर्षे, इंग्लंड ६० वर्षे, हंगेरी ६३ वर्षे, आयर्लंड ६८ वर्षे व फ्रान्स ७५ वर्षे याप्रमाणें जास्तींत जास्त मुदतीनें त्या त्या देशांतून शेतकऱ्याला कर्ज दिलें जातें.

लांब मुदतीनें कर्जे द्यावयाचीं असल्यानें या बँकांनाही लांब मुदतीच्या ठेवींचे रूपानें अगर अटीवर रकमा मिळाल्या पाहिजेत. म्हणून साधारणतः या बँका आपला निधि डिबेंचर्स (कर्जरोखे) काढून त्यांमार्फत उभा करितात. परंतु इतक्या लांब मुदतीचीं डिबेंचर्सही सरास खपतील असें नाहीं व हा पैसा शेतीसारख्या आजमितीस किफायतशीर नसलेल्या व्यवसायांत गुंतला जाणार हें लोकांना माहित असल्यानें त्या पैशाच्या सुरक्षितपणाबद्दल व त्यावर मिळावयाच्या व्याजाबद्दल कोणातरी जबाबदार

संस्थेनें हमी घेतल्याखेरीज या मार्गानें आवश्यक तो निधि जमणेंही दुरापास्त आहे. याकरितां देशाच्या सरकारनें या बँकांकडून काढण्यांत आलेल्या डिबेंचर्सच्या मुद्दल रकमेची व त्यावरील व्याजाची हमी घ्यावयाची अगर घेतलेली असते. याखेरीज सरकारला आणखीही निरनिराळ्या उपायांनीं शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्याकरितां हवा असलेला निधि उभा केला जाण्याचे कामीं मदत करतां येते.

जमिनीची बँकेच्या नांवें केलेलीं गहाणखतें सरकारी कर्जरोख्यां- (प्रॉमिसरि नोटां) प्रमाणें तीं धारण करणारांस व्याज मिळण्याचा हक्क ठेवून त्यांची खरेदीविक्री शेअरबाजारांत होऊं शकेल अशी व्यवस्था करणें; जमिनीवरील कर्ज निवारण्याबाबतचा फंड म्हणून स्वल्प व्याजाच्या दरानें, ३०–४० वर्षें मुदतीनें परतफेड करण्याचे बोलीनें, सरकारनें कर्जरोखे काढावयाचे; शेतकऱ्यांच्या जमिनी लॅण्ड मॉर्गेज बँकेस तारण लावून घेऊन शेतकऱ्यांस त्यांच्या जमिनीच्या किंमतीचें रोखे (बॉण्डस) सरकारमान्यतेनें दिले जाण्याची व्यवस्था करणें, म्हणजे जरूर पडेल तेव्हां शेतकरी ते सावकाराकडे गहाण ठेवून त्यांवर कर्ज काढूं शकेल व आपली गरज परस्पर भागवूं शकेल असे रोखे देशांतील मध्यवर्ती बँकेनें आपणांकडे गहाण ठेवून घेऊन त्यांवर पैसे देणें. या कामीं बँकेला करन्सी नोटा काढतां याव्या व त्याबाबत कायद्यान्वयें ऐवज म्हणून ठेवाव्या लागणाऱ्या सोन्याऐवजीं हे बॉंडस ऐवज म्हणून ठेवून घेतां यावे; याप्रमाणें निरनिराळ्या मार्गांनीं जमिनीच्या कागदांना सरकारी रोख्याप्रमाणेंच सरकारमान्यता व महत्व आणून दिल्यास ते विकत घेऊन त्यांत शिल्लक संचय गुंतवून ठेवण्यास समाज तयार होतो.

लॅंड मॉर्गेज बँका प्रारंभीं जर्मनीमध्यें स्थापन करण्यांत आल्या. सर्वांत पहिली अशी संस्था जर्मनीमध्यें सन १७७९ मध्यें स्थापन करण्यांत आली.

अमेरिकेंत १९१६ च्या फेडरल फार्म लोन ॲक्टान्वयें फेडरल लँड मॉर्गेज बँका स्थापन करण्यांत आल्या आहेत. या बँकामार्फत शेतकऱ्यांना २० ते ३० वर्षांच्या मुदतीने जमिनीच्या ५० टक्के किंमतीपावेतों कर्ज देण्यांत येतें व परतफेडीचे हप्ते वार्षिक अगर सहामाही असतात.

इंग्लंडमध्यें ॲग्रिकल्चरल् मॉर्गेज कॉर्पोरेशन ही संस्था १९२९ मध्यें शेतकऱ्यांना लांब मुदतीनें कर्ज देण्याच्या उद्देशानें स्थापन करण्यांत आली. या संस्थेचें शेअर भांडवल ६,५०,००० पौंड आहे. जमिनीच्या किंमतीच्या $\frac{2}{3}$ इतकें कर्ज देण्यांत येतें. कर्जाची मुदत जास्तींत जास्त ६० वर्षें पर्यंतची असते व परतफेडीचे हप्ते सहामाही असतात.

हिंदुस्थानांत पहिली लँड मॉर्गेज बँक म्हणजे दि झांग सहकारी लँड मॉर्गेज बँक होय व ती पंजाबांत सन १९२० मध्यें स्थापन करण्यांत आली.

हिंदुस्थानांत दोन प्रकारच्या लँड मॉर्गेज बँका आहेत. (१) सेंट्रल लँड मॉर्गेज बँका व (२) प्रायमरी लँड मॉर्गेज बँका. यांची एकूण संख्या अनुक्रमें ५ व २८३ अशी १९४९-५० अखेर आहे. यापैकीं प्रायमरी लँड मॉर्गेज बँका खेडयापाडयांतून असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्ज पुरवितात. या बँका खेडया खेडयांतून अशा नसून साधारणतः बहुतेक जिल्हानिहाय किंवा फार तर तालुकानिहाय शहरांतून आहेत व या बँकांना सेंट्रल लँड मॉर्गेज बँका मदत करितात.

लँड मॉर्गेज बँकांचा सर्वांत जास्त प्रसार मद्रास राज्यांत झाला आहे. तेथें १२६ प्रायमरी लँड मॉर्गेज बँक्स असून त्यांचेमार्फत सुमारें ४ कोटी रुपये कर्जाऊ देण्यांत आले आहेत. सेंट्रल लँड मॉर्गेज बँक एकच असून ती मद्रास येथें १९२९ मध्यें स्थापन करण्यांत आलेली आहे. या बँकेनें काढलेल्या डिबेंचर्सची हमी सरकारनें घेतली आहे. या बँकेचें खेळतें भांड-

चल रु. ५ कोटी ११ लक्ष असून सुमारें रु. ४ कोटीपर्यंत तालुकानिहाय प्रायमरी बँकामार्फत कर्जाऊ दिलेलें आहेत.

मुंबई राज्यांत प्रायमरी लँड मॉर्गेज बँक्स १९ आहेत व त्यांचेमार्फत सुमारें ५० लाख रुपये कर्जाऊ देण्यांत आलेले आहेत. सेंट्रल लँड मॉर्गेज बँक एकच असून ती म्हणजे दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल कोऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक ही होय. ही बँक मुंबई येथें ७ डिसेंबर १९३५ रोजीं कै. सर लल्लूभाई सामळदास यांच्या प्रयत्नानें, प्रोत्साहनानें व अध्यक्षतेखालीं स्थापन करण्यांत आली. या बँकेनेंही डिबेंचर्स काढली असून त्यांची व्याजमुद्दलासकट हमी सरकारनें घेतलेली आहे. हिचें खेळतें भांडवल आजमितीस रु. ६७ लाखांवर असून सुमारें ४० लाख रुपये प्रायमरी बँकांमार्फत कर्जाऊ दिले गेले आहेत.

वरील दोन राज्याखेरीज ओरिसा, म्हैसूर व त्रावणकोर–कोचीन येथें प्रत्येकीं एकेक प्रमाणें ३ सेंट्रल लँड मॉर्गेज बँक्स आहेत. तसेंच मद्रास व मुंबईखेरीज इतर राज्यांतूनही पुढीलप्रमाणें प्रायमरी लँड मॉर्गेज बँक्स स्थापन झालेल्या आहेत. म्हैसूर ७९, मध्य प्रदेश २६, अजमेर १२, राजस्थान १०, उत्तर प्रदेश ६, प. बंगाल २, आसाम २ व मध्य-भारत १.

हिंदुस्थानांतील सर्व प्रायमरी लँड मॉर्गेज बँकांमार्फत मिळून एकूण ५ कोटी ३४ लक्ष रुपये शेतकरी वर्गामध्यें कर्जाऊ देण्यांत आलेले आहेत.

वरील सर्व ठिकाणच्या बँकांकडून देण्यांत आलेलीं कर्जें बहुधा जास्तींत जास्त २० वर्षांच्या मुदतीचीं आहेत. ह्या सर्व बँका जुनी कर्जफेड, जमीन सुधारणा आणि जमीनखरेदी या कामीं उपयोगांत आणण्याकरितां कर्ज देतात. प्राधान्येंकरून जुनीं कर्जें निवारण करण्याचे कामींच सध्या या बँकांचा पैसा वापरला जात आहे, व आणखीही कांहीं दिवस तो याच कामीं वापरावा लागेल. परंतु शेतीची सुधारणा, उत्पादनशक्तीची वाढ,

शेतींतून उत्पन्न होणाऱ्या मालाला भरपूर मोबदला मिळवून देणाऱ्या बाजारपेठांची सोय, गोडाऊन सोसायट्यांची स्थापना, वगैरे स्वरूपाची मदत शेतकऱ्यास मिळवून देण्याचे कामीं पैसा गुंतविला गेल्याखेरीज केवळ जुनीं कर्जे देऊन टाकण्याचे कामीं शेतकऱ्याला मदत करण्यानें तो सुखी होईल हें बरेचसे काल्पनिक वाटतें. शेतीचा व्यवसाय किफायतशीर झाल्याखेरीज आणि नवीन कर्ज होण्याचीं कारणें नाहींशीं झाल्याखेरीज शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नाहींसा होणें बरेंच दुरापास्त आहे.

लँड मॉर्गेज बँकिंगचा व्यवसाय बराच कठीण स्वरूपाचा असून अगदींच अपरिचित आहे. अशा बँकांचा चालकवर्ग विशेष अनुभवी, तज्ज्ञ व लायक लोकांचा असावा लागतो. तारण म्हणून घेण्यांत येणाऱ्या जमिनीची योग्य किंमत ठरविणें, मालकी हक्काची पूर्णपणें छाननी करणें, ऋणकोच्या पतीसंबंधीं बिनचुक अंदाज करणें, त्याच्या परतफेड करण्याच्या पात्रतेसंबंधीं योग्य अंदाज करणें आणि बँकेचा कारभार दक्षतेनें चालविणें या सर्वांवर लँड मॉर्गेज बँकिंगच्या चळवळीचें यश अवलंबून आहे. हिंदुस्थानांत या प्रकारच्या बँकांची अद्याप किती तरी वाढ व्हावयास हवी आहे. त्याकरितां अवश्यक असणारा चालकवर्ग व कामगारवर्ग शिकवून तयार करण्याचें कामींही सरकारनें व समाजानें लक्ष पुरवावयास हवें आहे.

———

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

कोणत्याही देशाच्या शासनसंस्थेला—सरकारला—देशांतील नाणेबाजाराचें व त्यांत मिळणाऱ्या अथवा फिरणाऱ्या वस्तूंचें इतर सर्व प्रकारच्या नियंत्रणा प्रमाणेंच नियंत्रण करणें आवश्यक असतें. त्याचप्रमाणें समाजाला व्यवहार करण्याचे कामीं आवश्यक असणारें विनिमयाचें साधन—पैसा—वेळोंवेळीं भरपूर पुरविणें व तो अवास्तव न होईल याची खबरदारी घेणें हीही कामें शासनसंस्थेचींच आहेत.

विनिमयाच्या ज्या ज्या उपलब्ध साधनांच्याद्वारें देणीं दिलीं अथवा फेडलीं जातात आणि वस्तूंच्या किंमती मोजल्या जातात त्या त्या विनिमयाच्या सर्व साधनांना पैसा अथवा नाणें असें म्हणतात. व्यवहारांत विनिमयाच्या सरकारमान्य वस्तूलाच केवळ पैसा अथवा नाणें असें आपण म्हणतों. उदाहरणार्थ रुपये, आणे, पै व नोटा. परंतु याच्या जोडीला देशांतील व्यापारी समाजानें मान्य केलेली विनिमयाची जीं साधनें उदा. हुंडया व चेक्स् यांचाही समावेश वरील अर्थशास्त्रदृष्ट्या केलेल्या पैशाच्या अथवा नाण्यांच्या व्याख्येंत होतो.

सामाजिक हिताचे दृष्टीनें देशांतील बाजारभावांची सदैव स्थिरता राखणें आवश्यक असतें आणि तें ज्याप्रमाणें बाजारांतील निरनिराळ्या वस्तूंच्या मागणी आणि पुरवठ्याचे प्रमाणावर अवलंबून असतें त्याचप्रमाणें पैशाच्या अथवा नाण्याच्या मागणी आणि पुरवठ्याचे प्रमाणावरही अवलंबून असतें. मालाला येणारी मागणी उपलब्ध असलेल्या पैशाच्या संख्येवर अवलंबून असते. आपल्या खिशांत ज्या मानानें व जेव्हां पैसे असतील त्या मानानें व तेव्हां आपण खरेदी करूं. कमी पैसे असल्यास कमी माल घेऊं व कमी माल घेतल्यास देशांत उत्पादन झालेल्या मालापैकीं बराच

माल तसाच पडून राहील व त्यामुळें उत्पादन करणाऱ्या वर्गाचें नुकसान होईल व त्यांना उत्पादन करण्यास प्रोत्साहन राहाणार नाहीं. तसेंच खिशांत जास्त पैसे झाल्यास जास्त माल घेऊं व त्यामुळें असलेल्या मालापेक्षां जास्त मागणी झाल्यानें मालाच्या किंमती चढून गरीब वर्गाला त्रास पोचतो. वस्तूंना येणारी मागणी, मागणी करणाऱ्याच्या खिशांत असणाऱ्या साधनांवर अथवा पतीवर अवलंबून असते. म्हणून वस्तूंच्या किंमतींत अवास्तव चढ उतार होऊं नये याकरितां मागणीचे जें साधन —पैसा—–त्यावर नियंत्रण ठेवणें आवश्यक आहे व तें कार्य शासन–संस्थेनें करावयाचें असतें.

या पैशामध्यें वर दिलेल्या व्याख्येप्रमाणें सरकारमान्य व समाजमान्य अशा दोन्ही प्रकारच्या विनिमयाच्या साधनांचा समावेश आहे. त्याचे दोन भाग करण्यांत येतात व ते असे कीं (१) धात्वात्मक पैसा—रुपये आणे, पै व (२) कागदी पैसा—नोटा, चेक्स्, हुंडया, पोस्टल ऑर्डर्स वगैरे.

पैशाचा भरपूर व हंगामशीर पुरवठा करणें, तो अवास्तव होऊं न देणें याबरोबरच देशांतील पैसा सुदृढ राखणें हेंही एक शासन-संस्थेचेंच कार्य आहे. खोटीं अथवा ज्यांची किंमत घटली आहे अशीं नाणीं अथवा असा पैसा बाजारांत फिरूं देण्यानें राष्ट्रीय व्यापाराची पायमल्ली होते व त्यांत राष्ट्रीय आपत्तीचें बीज रोवलें जातें.

पैशामध्यें समाविष्ट होणाऱ्या दोन प्रकारच्या नाण्यांपैकीं धात्वात्मक नाणीं व नोटा सरकारकडून पुरविल्या जातात आणि कागदी नाणें—चेक्स् व हुंडया—व्यापारी वर्गाकडून पुरघिलें जातें. पाश्चात्य देशांत नोटा देखील व्यापारी वर्गाकडून (बँकांकडून) पुरविल्या जातात. या दोन्ही टिकाणा-मार्फत निघणाऱ्या नाण्यांचा मिळून होणारा निधि राष्ट्रीय मागणीचें प्रमाण

निश्चित करणारा असल्यामुळें या दोन्ही ठिकाणांवर नियंत्रण ठेवणें आवश्यक आहे. सरकारमार्फत निघणारें धात्वात्मक नाणें धातूंच्या सांठ्यावर अवलंबून असल्यानें त्याला वस्तुस्थितीनेंच पायबंद बसतो परंतु व्यापारीवर्गामार्फत निघणाऱ्या कागदी चलनाला तशी कांहीं आडकाठी नसल्यानें आणि त्याची प्रमाणाबाहेर वाढ झाल्यास त्याचा अनिष्ट परिणाम बाजारभावावर होणारा असल्यानें त्यावर विशेष नियंत्रण करणें आवश्यक असतें.

नाण्याचा अथवा पैशाचा पुरवठा करणाऱ्या या निरनिराळ्या संस्थांना एकत्रित करून त्यांवर सामाजिक हिताच्या व स्थैर्याच्या दृष्टीनें नियंत्रण करण्याच्या उद्देशानें आधुनिक कालांत बहुतेक सर्व देशांतून एक मध्यवर्ति बँक स्थापन करण्याची प्रथा पडलेली आहे. कांहीं देशांत आधींच स्थापन झालेल्या व कांहीं निमित्तानें महत्त्वास पोचलेल्या अशा बँकेला मध्यवर्ती बँकेचें स्वरूप देण्यांत आले आहे तर कांहीं देशांत मुद्दाम म्हणून मध्यवर्ती बँक स्थापन करण्यांत आली आहे. जगांतील बहुतेक सर्व प्रमुख राष्ट्रांतून त्या त्या राष्ट्राची अशी एक एक मध्यवर्ती बँक आहे व तिचे मार्फत देशांतील नाणेंबाजारावर व नाण्याचें नियंत्रण करण्यांत येतें.

यांपैकीं पहिल्या प्रकारच्या संस्थेचें उदाहरण म्हणून बँक ऑफ इंग्लंडचें नांव घेतां येईल. ही बँक इसवीसन १६९४ मध्यें प्रामुख्यानें त्या वेळच्या इंग्लिश राजांना—तिसरा वुईल्यम—कर्ज पुरविण्याच्या उद्देशानें स्थापन करण्यांत आली. परंतु वेळोवेळीं देण्यांत आलेल्या सवलती मुळें तिला मध्यवर्ती बँकेचें स्वरूप प्राप्त होत गेलें व तें पुढें १८४४ च्या बँक चार्टर कायद्यानें मान्य करण्यांत आलें. तेव्हांपासून ती आजतागायत धंदा करीत असून इंग्लंडची ती मध्यवर्ती बँक आहे. १ मार्च १९४६ रोजीं बँक ऑफ इंग्लंडचे राष्ट्रीयकरण करण्यांत आले असून आतां ती सरकारी मालकीची बँक झाली आहे.

सर्व हिंदुस्थानची मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही हिंदुस्थान सरकारच्या १९३४ च्या रिझर्व बँक ऑफ इंडिया ॲक्टान्वयें १ एप्रिल १९३५ रोजी स्थापन करण्यांत आली. हिंदुस्थान सरकारची व हिंदुस्थानांतील सर्व बँकांची बँक म्हणून हिचा दर्जा आहे. एवढ्या मोठ्या दर्जाचा तिनें गैरफायदा घेऊं नये म्हणून तिच्यावर कायद्यानें नियंत्रणें घालण्यांत आलीं आहेत व त्यापैकीं एक नियंत्रण असें कीं, तिनें नफेबाजीचें व्यापारी धोरण ठेवतां कामा नये अथवा देशांतील इतर बँकांशीं चढाओढ करतां कामा नये. याकरितां असें ठरविण्यांत आलें आहे की या बँकेनें बिनव्याजी ठेवी घ्यावयाच्या. कर्ज घ्यावयाचें झाल्यास तें शिडयुल्ड (जोडलेल्या)बँकेकडून अगर परदेशांतील एखाद्या मध्यवर्ती बँकेकडूनच घेतलें पाहिजे व तें बँकेच्या शेअर भांडवलाचे रकमेपेक्षां केव्हांही जास्त असतां कामा नये.

मध्यवर्ती बँक सरकारी मालकीची असावी कारण प्रामुख्यानें देशांतील नाणेबाजाराबाबतचीं सरकारचीं कर्तव्यें ती पार पाडीत असते. अशी एक विचारसरणी आहे. तर त्याच्या उलट देशांतील आर्थिक व्यवसायांशीं निकटवर्ती संबंध असणाऱ्या साधनांचा विनिमय करणाऱ्या या संस्थेवर लोकपक्षीय सरकारांतील निरनिराळ्या राजकीय पक्षाचें वर्चस्व पडूं नये म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाचें वर्चस्वापासून मध्यवर्ती बँक अलित ठेवण्यांत यावी अशी दुसरी विचारसरणी आहे. बँक ही स्वतंत्र संस्था करण्यानें सरकारची लुडबुड अथवा वर्चस्व मर्यादित राहून बँकेनें परिस्थित्यनुरूप आंखलेल्या धोरणामुजब तिला वागतां येईल. जगांतील बहुतेक राष्ट्रांतून मध्यवर्ती बँका आतां आतांपर्यंत स्वतंत्र संस्था असून त्या शेअरहोल्डरांच्याच बनविलेल्या होत्या. यालाच अनुसरून ही बँक समाईक भांडवलाच्या बँकाप्रमाणेंच शेअरहोल्डरांची बनलेली अशी एक सांघीक संस्था त्यावेळीं कर-

ण्यांत येऊन ती कंपनी कायद्याऐवजीं स्वतंत्र कायद्यान्वें आस्तित्वांत आली आहे व कार्य करित आहे. हिचें भांडवल रुपये पांच कोटि आहे.

मध्यवर्ती बँक सरकारी मालकीची असावी या पहिल्या विचारसरणीचा पगडा दुसऱ्या महायुद्धानंतर जास्त जास्त बसूं लागला. बँक ऑफ इंग्लंड चेंहि राष्ट्रीयकरण १९४६ मध्यें करण्यांत आलें. या घटनेमुळें व स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यामुळें रिझर्व्ह बँकेचेंही राष्ट्रीयकरण करण्यांत आलें. रिझर्व्ह बँक राष्ट्राच्या मालकीची करण्याकरितां व त्यामुळें निर्माण होणाऱ्या बाबींची पूर्तता करण्याकरितां "दि रिझर्व्ह बँक ट्रान्सफर टु पब्लिक ओनरशिप अॅक्ट, १९४८" या नांवाचा नवीन कायदा करण्यांत आला आहे. या कायद्याच्या तरतुदींनुसार १ जानेवारी १९४९ पासून ही बँक सरकारी मालकीची बँक म्हणून कार्य करीत आहे.

गेलीं १४ वर्षे शेअरहोल्डरांच्या मालकीची म्हणून ही बँक असल्यानें राष्ट्रीयकरणाचें वेळीं त्यांचे हितसंबंध नाहींसे करण्याकरितां त्यांना पूर्वींच्या दर रु. १०० च्या शेअरामागें रु. ११८–१०–० या प्रमाणांत मोबदला सरकारच्या ३ टक्के व्याजाच्या परतफेडीच्या कर्जरोख्यामध्यें देण्यांत आला.

बँकेचें कारभारी मंडळ एकूण १४ सभासदांचें बनविण्यांत आलें असून त्याची घटना पुढें दिल्याप्रमाणें आहे. त्यास सेंट्रल बोर्ड असें म्हणतात.

१ गव्हर्नर (बँकेच्या मुख्याधिकाऱ्यास गव्हर्नर हा हुद्दा देण्यांत आला आहे.)

२ डेप्युटी गव्हर्नर्स दोन.

वरील तीन सभासद पगारी नोकर असून ते बँकेचें पूर्ण वेळ काम पहातात.

४ डायरेक्टर्स, मध्यवर्ती सरकारनें नेमलेले. हें विभागीय लोकल-बोर्डांतून प्रत्येकीं एक याप्रमाणें नेमावयाचे.

६ डायरेक्टर्स मध्यवर्ती सरकारनें नेमलेले.

१ डायरेक्टर, सरकारी अधिकारी.

कारभारी मंडळास मार्गदर्शन करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास आहे. कारभारी मंडळाचे देखरेखीखालीं, सल्ल्यानुसार व मार्गदर्शनान्वयें बँकेचा दैनंदिन कारभार पहाण्याचें काम गव्हर्नरकडे आहे.

बँकेच्या स्थापनेचे वेळीं नेमण्यांत आलेले पहिले गव्हर्नर सर ऑस्बोर्न स्मीथ हे होते, त्यानंतर सर जेम्स टेलर हे गव्हर्नर झाले. यांच्या नंतर गव्हर्नर पदाचा मान हिंदी गृहस्थास मिळाला व त्या अन्वयें पहिले हिंदी गव्हर्नर हल्लीचें हिंदुस्थान सरकारचें अर्थ-मंत्री नामदार सर चिंतामणराव देशमुख हे होत. यांच्या मागून सर बी. रामा राव गव्हर्नर झाले व हल्लीं तेच कारभार पहात आहेत.

हिंदुस्थानचे चार विभाग पाडण्यांत आले असून त्यांना पश्चिम विभाग, पूर्व विभाग, उत्तर विभाग व दक्षिण विभाग अशी नांवे देण्यांत आलीं आहेत. मुंबई प्रांत, मध्यप्रांत व वऱ्हाड, हैद्राबाद, बडोदे, कच्छ, काठेवाडांतील संस्थानें (सौराष्ट्र), कोल्हापूर, ग्वाल्हेर, इंदूर व माळव्यातील संस्थानें (मध्यभारत), भोपाळ आणि मुंबई प्रांत व मध्यप्रांत यांत सामील झालेली इतर संस्थानें या सर्वांचा पश्चिम विभागांत समावेश करण्यांत आला आहे. पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम हे प्रांत व त्यांत सामील झालेलीं संस्थानें, अंदमान–निकोबार बेटे, मणिपूर, कुचबिहार, मयुरभंज, विंध्यप्रदेशातील सामील संस्थानें यांचा पूर्वविभाग बनला आहे. यु. पी. पूर्व पंजाब व त्यांत सामील झालेलीं संस्थानें, दिल्ली अजमीर–मेरवाडा, पंथ पिंपलोदा, हिमाचल प्रदेश, काश्मीर, पेप्सु, राजस्थान युनियन, मत्स्य युनियन, जैसलमीर या सर्वांचा मिळून उत्तर विभाग बनला आहे. मद्रास प्रांत व त्यांत सामील झालेलीं संस्थानें कूर्ग, कोचीन, त्रावणकोर व म्हैसूर यांचा समावेश दक्षिण विभागांत होतो.

वरील प्रत्येक विभागाकरितां लोकल बोर्ड—स्थानिक मंडळ-स्थापन केलें आहे व त्यांत मध्यवर्ती सरकारनें नेमलेले प्रत्येकीं पांच सभासद असतात. हे सभासद विशेषेकरून विभागानिहाय आर्थिक व शेतकी हितसंबंध, सहकार व स्थानिक सावकारी यांचें प्रतिनिधित्व राखिलें जाईल अशा धोरणानें नेमलें जातात. लोकल बोर्डाचें काम म्हणजे मध्यवर्ती बोर्डाला विशिष्ट बाबींबाबत सल्लामसलत देणें व मध्यवर्ती बोर्डानें विशिष्ट तऱ्हेनें सोंपविलेलीं कामें करणें हें होय.

रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कचेऱ्या अनुक्रमें मुंबई, कलकत्ता, दिल्ली व मद्रास या ठिकाणीं उघडण्यांत आल्या असून लंडन शहरींही एक कचेरी आहे.

देशांतील मध्यवर्ती बँकेच्या कामगिरीपैकीं एक फार महत्त्वाची कामगिरी म्हणजे चलनी नोटा काढणें व त्यांमार्फत राष्ट्रीय गरजा भागविण्यास हवा असलेला निधि पुरविणें. जगांतील सर्व मध्यवर्ती बँका त्या त्या राष्ट्रांत फिरणाऱ्या नोटा काढतात. त्याचप्रमाणें याही बँकेला हिंदुस्थान सरकारनें आपला नोटा काढण्याचा अधिकार सुपूर्त केला आहे. रिझर्व्ह बँकेच्या रु. २, ५, १०, ५०, १००, ५००, १००० व १००००च्या नोटा सर्व हिंदुस्थानांत सरकारमान्य नाणें म्हणून समजलें जाण्याची सरकारी घोषणा करण्यांत आली आहे. या नोटा हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नाचे तारणावर व हमीवर देशांत चलन म्हणून दिल्या घेतल्या जात आहेत. इंडियन स्टँप् अॅक्टान्वयें द्यावी लागणारी ड्यूटी (कर) या नोटांपुरती माफ करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत यापुढें या बँकेखेरीज इतर कोणालाही चलनी नोटा काढण्याचा अधिकार नाहीं व काढल्यास तो गुन्हा समजण्यांत येतो. सध्यां प्रचलित असलेल्या एकरुपयाच्या नोटा फक्त हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या आहेत.

६ डायरेक्टर्स मध्यवर्ती सरकारनें नेमलेले.

१ डायरेक्टर, सरकारी अधिकारी.

कारभारी मंडळास मार्गदर्शन करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास आहे. कारभारी मंडळाचे देखरेखीखालीं, सल्लयानुसार व मार्गदर्शनान्वयें बँकेचा दैनंदिन कारभार पहाण्याचें काम गव्हर्नरकडे आहे.

बँकेच्या स्थापनेचे वेळीं नेमण्यांत आलेले पहिले गव्हर्नर सर ऑस्बोर्न स्मीथ हे होते, त्यानंतर सर जेम्स टेलर हे गव्हर्नर झाले. यांच्या नंतर गव्हर्नर पदाचा मान हिंदी गृहस्थास मिळाला व त्या अन्वयें पहिले हिंदी गव्हर्नर हल्लीचें हिंदुस्थान सरकारचें अर्थ-मंत्री नामदार सर चिंतामणराव देशमुख हे होत. यांच्या मागून सर बी. रामा राव गव्हर्नर झाले व हल्लीं तेच कारभार पहात आहेत.

हिंदुस्थानचे चार विभाग पाडण्यांत आले असून त्यांना पश्चिम विभाग, पूर्व विभाग, उत्तर विभाग व दक्षिण विभाग अशी नांवे देण्यांत आलीं आहेत. मुंबई प्रांत, मध्यप्रांत व वऱ्हाड, हैद्राबाद, बडोदे, कच्छ, काठेवाडांतील संस्थानें (सौराष्ट्र), कोल्हापूर, ग्वाल्हेर, इंदूर व माळव्यातील संस्थानें (मध्यभारत), भोपाळ आणि मुंबई प्रांत व मध्यप्रांत यांत सामील झालेली इतर संस्थानें या सर्वांचा पश्चिम विभागांत समावेश करण्यांत आला आहे. पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम हे प्रांत व त्यांत सामील झालेलीं संस्थानें, अंदमान–निकोबार बेटे, मणिपूर, कुचबिहार, मयुरभंज, विंध्यप्रदेशातील सामील संस्थानें यांचा पूर्वविभाग बनला आहे. यु. पी. पूर्व पंजाब व त्यांत सामील झालेलीं संस्थानें, दिल्ली अजमीर–मेरवाडा, पंथ पिंपलोदा, हिमाचल प्रदेश, काश्मीर, पेप्सु, राजस्थान युनियन, मत्स्य युनियन, जैसलमीर या सर्वांचा मिळून उत्तर विभाग बनला आहे. मद्रास प्रांत व त्यांत सामील झालेलीं संस्थानें कूर्ग, कोचीन, त्रावणकोर व म्हैसूर यांचा समावेश दक्षिण विभागांत होतो.

वरील प्रत्येक विभागाकरितां लोकल बोर्ड–स्थानिक मंडळ-स्थापन केलें आहे व त्यांत मध्यवर्ती सरकारनें नेमलेले प्रत्येकीं पांच सभासद असतात. हे सभासद विशेषेकरून विभागानिहाय आर्थिक व शेतकी हितसंबंध, सहकार व स्थानिक सावकारी यांचें प्रतिनिधित्व राखिलें जाईल अशा धोरणानें नेमलें जातांत. लोकल बोर्डाचें काम म्हणजे मध्यवर्ती बोर्डाला विशिष्ट बाबींबाबत सल्लामसलत देणें व मध्यवर्ती बोर्डानें विशिष्ट तऱ्हेनें सोंपविलेलीं कामें करणें हें होय.

रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कचेऱ्या अनुक्रमें मुंबई, कलकत्ता, दिल्ली व मद्रास या ठिकाणीं उघडण्यांत आल्या असून लंडन शहरींही एक कचेरी आहे.

देशांतील मध्यवर्ती बँकेच्या कामगिरीपैकीं एक फार महत्त्वाची कामगिरी म्हणजे चलनी नोटा काढणें व त्यांमार्फत राष्ट्रीय गरजा भागविण्यास हवा असलेला निधि पुरविणें. जगांतील सर्व मध्यवर्ती बँका त्या त्या राष्ट्रांत फिरणाऱ्या नोटा काढतात. त्याचप्रमाणें याही बँकेला हिंदुस्थान सरकारनें आपला नोटा काढण्याचा अधिकार सुपूर्त केला आहे. रिझर्व्ह बँकेच्या रु. २, ५, १०, ५०, १००, ५००, १००० व १००००च्या नोटा सर्व हिंदुस्थानांत सरकारमान्य नाणें म्हणून समजलें जाण्याची सरकारी घोषणा करण्यांत आली आहे. या नोटा हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नाचे तारणावर व हमीवर देशांत चलन म्हणून दिल्या घेतल्या जात आहेत. इंडियन स्टँप् अॅक्टान्वयें द्यावी लागणारी ड्यूटी (कर) या नोटांपुरती माफ करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत यापुढें या बँकेखेरीज इतर कोणालाही चलनी नोटा काढण्याचा अधिकार नाहीं व काढल्यास तो गुन्हा समजण्यांत येतो. सध्यां प्रचालित असलेल्या एकरुपयाच्या नोटा फक्त हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या आहेत.

गेल्या दोन शतकांत व्यवहारामध्यें नाण्यांपेक्षां चलनी नोटा विशेष सोईस्कर वाटूं लागल्या असून त्यांचा प्रसार आपखुषीनें वाढत आहे. परंतु नोटांवर नियंत्रण ठेवलें नाहीं, नोटेचें रूपान्तर प्रत्यक्ष पैशांत करतां येण्याची पात्रता राखण्याकरितां आवश्यक असलेला सुवर्णनिधि जवळ ठेवला नाहीं व नोटांचा फैलाव होऊं दिला तर देशावर दुर्धर अथवा अनावस्था प्रसंग गुदरतो. याकरितां नोटा काढण्याचें कार्य चोखपणें चालावें व त्याची स्थिति काय आहे हें समाजाला स्पष्टपणें समजावें म्हणून सर्व मध्यवर्ती बँकांमध्यें नोटांची एक स्वतंत्र शाखा ठेवण्याची व त्या शाखेची परिस्थिति दर्शविणारा स्वतंत्र तक्ता प्रसिद्ध करण्याची प्रथा आहे. याला अनुसरून या बँकेनेंही दोन स्वतंत्र शाखा ठेवल्या आहेत व त्यांचीं नांवें अनुक्रमें ' इश्यु डिपार्टमेंट ' व ' बँकिंग डिपार्टमेंट ' अशीं आहेत. बँकेतर्फे दर आठवड्याला प्रसिद्ध करण्यांत येणाऱ्या बँकेची परिस्थितिदर्शक तक्त्यामध्यें पहिल्या भागांत इश्यु डिपार्टमेंटसंबंधीं विगत व दुसऱ्या भागांत बँकिंग डिपार्टमेंटसंबंधीं विगत देण्यांत येते. अशा तऱ्हेचा तक्ता प्रसिद्ध करण्याची कायद्यानें बँकेवर सक्ति आहे.

इश्यु डिपार्टमेंटः—या शाखेचें काम फक्त नोटा काढावयाच्या व त्या बँकिंग डिपार्टमेंटला ऐवज घेऊन द्यावयाच्या. काढलेल्या नोटांना तारण म्हणून सोन्याचीं नाणीं व लगडी, परराष्ट्रीय सिक्युरिटिज् चांदीचीं नाणीं व रुपये, रुपी सिक्युरिटिज् (हिंदुस्थान सरकारचे रुपयामध्यें देऊं केलेले कर्जरोखे) याप्रमाणें ऐवज या शाखेनें ठेवला पाहिजे. या एकूण जिंदगीपैकीं चाळीस टक्क्यापेक्षां कमी नाहीं इतका ऐवज सोन्याचीं नाणीं, लगडी, (बुलियन) व परराष्ट्रीय सिक्युरिटिज् मिळून असेल. तथापि त्यांत कमींत कमी ४० कोटि रुपयांचें सोनें (नाणीं व लगड) असलेंच पाहिजे. परराष्ट्रीय सिक्युरिटिजमध्यें (१) परराष्ट्रांतील मध्यवर्ती बँकेमध्यें या बँकेच्या इश्यू खात्याला अस-

णारी त्या त्या राष्ट्राच्या नाण्यांतील शिल्लक, (२) ९० दिवसांपेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीच्या दोन ऐपतदार लोकांच्या सह्या असलेल्या व परराष्ट्रामध्यें पटावयाच्या असलेल्या अशा हुंडया आणि (३) पांच वर्षात देऊं होणारे परराष्ट्रीय सरकारचे कर्जरोखे, यांचा समावेश होतो. विशिष्ट परिस्थितींत मात्र सरकारची आगाऊ परवानगी घेऊन कमींत कमी ६ टक्क्यांपर्यंत स्पेशल टॅक्स (कर) देण्याचें कबूल करून तीस दिवसांच्या मुदतीपुरता चाळीस टक्क्यांपेक्षां कमी ऐवज ठेवतां येईल अशी सवलत ठेवण्यांत आली आहे. बाकी जिंदगी रुपयाचीं नाणीं, हिंदुस्थान सरकारचें रुपयांमध्यें देऊं केलेले कर्जरोखे आणि बँकेला कायद्यान्वयें विकत घेतां येत असलेल्या हुंडया, अशा मिळून असेल. या शाखेंतील जिंदगीवर फक्त हिंदुस्थान सरकारनें यापूर्वीं काढलेल्या नोटा व बँकेनें काढलेल्या नोटा मिळून होणाऱ्या रकमेचाच बोजा असेल. बँकेच्या इतर देण्याचा बोजा या शाखेवर असणार नाहीं. नोटांच्या एकुण रकमेच्या बोजाला ऐपत म्हणून ठेवण्यांत यावयाच्या वर निदर्शित केलेल्या एकुण जिंदगीचा निधि, नोटांमुळें उत्पन्न होणाऱ्या बोजाचे रकमेपेक्षां कमी असतां कामा नये. तसेंच सोन्याचीं नाणीं व लगड मिळून असणाऱ्या संचयांपैकीं $\frac{१}{२०}$ पेक्षां कमी नाहीं इतका संचय हिंदुस्थानांत बँकेजवळ ठेवण्यांत आला पाहिजे.

हिंदुस्थानांत सोन्याचीं नाणीं लीगल टेंडर (सरकारमान्य चलन) नसल्यानें तीं सोनें म्हणून पत्करलीं जातात व त्याच्या मोबदल्याचें प्रमाण रुपयास ८.४७५१२ ग्रेन्स शुद्ध सोनें या भावानें ठरविण्यांत आलें आहे. रुपये त्याच्या दर्शनी किंमतीनें मोजले जातात व सिक्युरिटीज् त्या त्या वेळीं असणाऱ्या बाजारभावानें मोजण्यांत येतात.

एखाद्या ऋणकोनें आपल्या देण्यापोटीं सावकाराला जें नाणें अथवा चलन दिलें असतां सावकारानें तें पत्करलेंच पाहिजे असें सरकारनें ठरविलेलें असतें त्या नाण्याला अथवा चलनाला " लीगल टेंडर " असें

म्हणतात. हिंदुस्थानांत सरकारच्या व बँकेच्या नोटा आणि चांदीचे रुपये व नाणीं लीगल टेंडर आहेत. लीगल टेंडरचें अमर्यादित व मर्यादित लीगल टेंडर असे दोन पोटभेद आहेत. अमर्यादित म्हणजे सर्व देणें त्या चलनांत दिले असतां सावकारानें घेतलेंच पाहिजे असें ठरविलेलें असणें आणि मर्यादित म्हणजे कांहीं रकमेपर्यंत त्या चलनांत वसूल स्वीकारण्यास फक्त सावकार बांधलेला असणें.

रुपयाचें कायदेशीर वजन १८० ग्रेन (ट्रायवेट) असून त्यांत १९४०पर्यंत १६५ ग्रेन शुद्ध चांदी व १५ ग्रेन अलॉय (मिसळ) असे. परंतु तेव्हांपासून आतां याचें प्रमाण ९० ग्रेन शुद्ध चांदी व ९० ग्रेन मिसळ असें ठरविण्यांत आले आहे. इतर चांदीचीं नाणीं हिस्सेराशीनें वजनाचीं व शुद्ध चांदीचीं असलीं पाहिजेत. रुपया आणि अधेली जोंपर्यंत वजनांत कायदेशीर प्रमाणाच्या खालीं शेकडा दोन टक्क्यांहून कमी वजनाचीं नाहींत व वापरल्यानें होणाऱ्या घसाऱ्या-खेरीज अन्य तऱ्हेनें घासलेलीं अगर बिघडलेलीं नाहींत तोंपर्यंत ती अमर्यादित लीगल टेंडर आहेत. नोटा अमर्यादित लीगल टेंडर आहेत. पावल्या, चवल्या, आणेल्या व पैसे मात्र एक रुपयापर्यंत लीगल टेंडर आहेत. म्हणून त्यांस मर्यादित लीगल टेंडर असें म्हणावें लागेल.

बँकिंग डिपार्टमेंटः—या शाखेमार्फत सर्वसाधारण बँकिंगचीं कामें केलीं जातात व त्यांशिवाय सरकारचे बँकर आणि मध्यवर्ती बँक म्हणून असणारीं विशिष्ट कामेंही केलीं जातात.

या बँकेचीं मुख्य कामें पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

१. रुपयाची आंतरराष्ट्रीय किंमत समतोल राखणें.

२. हिंदुस्थानांतील नाणेंबाजार ताब्यांत ठेवणें.

३. सरकारच्या कॅश शिल्लका संभाळणें व सरकारचे बँकर, ट्रेझरर, आणि एजंट म्हणून काम पहाणें.

४. देशांतील चलनाबाबत धोरण ठरविणें, नियंत्रण करणें व नाण्यांची व्यवस्था ठेवणें.

५. सरकारी रकमांची रवानगी सरकारचे ट्रेझरर म्हणून करणें.

६. राष्ट्रीय कर्जाची (पब्लिक डेट) व्यवस्था राखणें व सरकारला हवीं असणारीं नवीं कर्जें उभारणें.

७. परराष्ट्रीय नाणें बाजारांत मिळणारे नाणें विकत घेणें व विकत देणें.

८. नोटांच्या बदला रुपये व रुपयांच्या बदला नोटा देणें.

९. खाजगी व्यक्ति, संस्था, कंपन्या, बँका, सरकार, यांजकडून ठेवी घेणें; मात्र त्यांवर व्याज देता येणार नाहीं.

१०. नव्वद दिवसापेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीच्या दोन ऐपतदार गृहस्थ अगर संस्था यांच्या सह्यांच्या (पैकीं एक शिडयुल्ड बँक पाहिजे), हिंदुस्थानांत काढलेल्या व पटावयाच्या असलेल्या, अशा हुंडया कसर घेऊन पटविणें अगर धारण करणें.

११. प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँका यांना कायद्यांत नमूद करण्यांत आलेल्या शर्ती व तरतुदीअन्वयें व जिंदगीच्या तारणावर कर्ज देणें. नऊ महिन्यांपेक्षां जास्त नाहीं अशा मुदतीच्या, दोन ऐपतदार गृहस्थ अगर संस्था यांच्या सह्यांच्या (पैकीं एक शिडयूल्ड बँक किंवा प्रांतिक सहकारी बँक पाहिजे), हिंदुस्थानांत काढलेल्या व पटावयाच्या असलेल्या आणि शेतकींतील हंगामी व्यवसायांना पैसा पुरविण्याकरितां काढलेल्या, अशा हुंडया कसर घेऊन पटविणें अगर धारण करणें.

१२. प्रांतिक सरकारचें उत्पन्न स्वीकारणें, सांभाळणें.

१३. सभासद (शिडयूल्ड) बँकांकडून आपखुषीनें अगर कायद्यानें येणाऱ्या ठेवी स्वीकारणें; त्यांच्याजवळील हुंडया रि-डिस्काउंट

करणें. (फेरकसर घेऊन पटविणें); बँकेच्या पसंतीच्या तारणावर सभासद बँकांना कर्ज देणें; चेकचें क्लिअरिंग (हवाले पटविणें) व पैशाची ने-आण, अशा स्वरूपाची मदत सभासद बँकांना करणें.

१४. ट्रस्टी सिक्युरिटीज्, सोनें, कायद्यानें संमत असणाऱ्या अशा हुंड्या प्रॉमिसरी नोटा व मालाच्या मालकीबाबतचे कागदपत्र यांचे तारणावर राज्य सरकारें, स्थानिक स्वराज्य संस्था, शिड्युल्ड बँका व प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह बँका यांना अडव्हान्सेस (कर्ज) देणें. मात्र अशीं कर्जे अल्प मुदतीचीं म्हणजे जास्तीत जास्त ९० दिवस मुदतीचीं असतील. प्रत्यक्ष मालाचे तारणावर मात्र बँक कर्ज देत नाहीं. ही बँक तिच्यावरील राष्ट्रीय स्वरूपाच्या जबाबदाऱ्या लक्षांत घेतां फारच अल्प मुदतीचीं कर्जे देऊं शकते. वस्तुतः कर्ज देणें हा तिचा मूलभूत उद्देश नसून तात्पुरती नडें भागविणें हा तिचा प्रामुख्यानें उद्देश असतो.

शिड्युल्ड (जोडलेल्या) बँका—कमर्शियल क्रेडिटवर (व्यापारी चलनावर) नियंत्रण ठेवणें, नाणेबाजाराची स्थिरता राखण्याचे दृष्टीनें अवश्यक असल्यानें हें कार्य ज्या मध्यवर्ती बँकेकडे सोपविण्यांत आलें आहे त्या मध्यवर्ती बँकेला देशांतील इतर सर्व बँकांशीं निकट संबंध ठेवणें व शक्यतोंवर त्यांचे व्यवहारावर नियंत्रण करणें अवश्यक असतें. याकरितां कायद्यानें जरूर त्या तरतुदी करण्यांत येत असतात. मध्यवर्ती बँकेमार्फत मिळणाऱ्या क्लिअरिंगच्या व इतर अनेक मदतीमुळें देशांतील बहुतेक बँका आपखुषीनें या बँकेंत आपापलीं खातीं ठेवतात. नाणेबाजारांत क्रेडीटची वाढ अथवा घट होणें बँकांच्या शिल्लक संचयावर अवलंबून असल्यानें अशा शिल्लक संचयाचा अंदाज मध्यवर्ती बँकेला करतां येणें अवश्यक असतें आणि तो देशांतील बँकांनीं कांहीं एका प्रमाणांत आपल्या रोख शिलका मध्यवर्ती

बँकेंत ठेवल्याच पाहिजेत असें नियंत्रण घातल्यानें करतां येतो. या पद्धतीमुळें मध्यवर्ती बँकेला नाणेबाजार ताब्यांत ठेवतां येतो.

मध्यवर्ती बँकेशीं विशेष हितसंबंध जडवून आणलेले असण्यांत बँकांना अडीअडचणीचे प्रसंगीं व इतर वेळींही व्यवहार करण्याचे कामीं मदत होते म्हणून देशांतील बँकांची मध्यवर्ती बँकेशीं आपणांस जोडून घेण्याची प्रवृत्ति साहजिक होत असते. ज्या बँकेचें वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी रुपये पांच लाख अगर त्यापेक्षां जास्त असेल अशा बँकेला शिडयुल्ड बँक म्हणून आपणांस रिझर्व बँकेच्या दप्तरीं नोंदवून घेतां येते. शिडयुल्डबँकेला आपल्या मागतांक्षणींच द्यावयाच्या असणाऱ्या देण्याचें (डिमांड लायबिलीटीज्) रकमेच्या शेंकडा ५ टक्के या प्रमाणांत व मुदतीच्या देण्याचे (टाईम लायबिलीटीज्) रकमेच्या शेंकडा २ टक्के या प्रमाणांत कमींत कमी रोख शिल्लक रिझर्व बँकेंतील आपल्या खात्याला दररोज ठेवावी लागते. या तरतुदीमुळें देशांतील बँकिंग रिझर्व्हस् (बँकांचे शिल्लक संचय) मध्यवर्ती बँकेजवळ एकत्रित होतात. दर शुक्रवारीं शिडयुल्ड बँकेनें रिझर्व्ह बँकेला आपल्या ताबडतोब मागणींच्या व मुदतीच्या देण्याबाबत काय परिस्थिति आहे हें दाखविणारे तक्ते पाठवावयाचे असतात. वर निदर्शित केलेल्या प्रमाणापेक्षां कमी रोख शिल्लक असल्याचें आढळून आल्यास शिडयुल्ड बँकेला, बँक रेट अधिक तीन टक्के या दरानें पीनल इंटरेस्ट (दंडादाखल व्याज) द्यावें लागतें.

बँक रेटः—कोणत्याही देशांतील मध्यवर्ती बँक ज्या व्याजाच्या दरानें इतरांना कर्ज देते अगर त्यांच्या हुंडया कसर कापून विकत घेते त्या दराला बँक रेट अशी संज्ञा आहे. असा हा दर मध्यवर्ती बँकेकडून वेळोवेळीं जाहीर करण्यांत येत असतो. नाणेंबाजारांतील वेळोवेळची परिस्थिति बँक रेट कमी जास्त होण्यास कारणीभूत असतें. कर्जाकरितां असलेली मागणी, बाजारां-

तील सोन्याचा पुरवठा आणि बँकेची गंगाजळी या तीन बाबी प्रामुख्यानें दर ठरवितांना विचारांत घेतल्या जातात. अर्थशास्त्रांतील मागणी व पुरवठा याबाबत सिद्धांत नाण्यालाही लागू होतो व म्हणून नाण्याच्याही किंमती चढतात अगर उतरतात. नाण्याची किंमत म्हणजे कर्जाऊ देण्यांत येणाऱ्या रकमेवर आकारण्यांत येणाऱ्या व्याजाचा दर होय. म्हणून आपण असें म्हणतो कीं पैसा महागला अथवा पैसा स्वस्त झाला. महाग पैसा याचा अर्थ जास्त व्याज द्यावें लागणें, व स्वस्त पैसा म्हणजे अल्प व्याजानें कर्जाऊ पैसा मिळणें.

मध्यवर्ती बँक साधारणतः आपल्या जवळील सोन्याची गंगाजळी कमी होऊं नये म्हणून कर्जाची मागणी थबकाविण्याचे हेतूनें आपला दर वाढविते. उलट ज्या वेळीं सोन्याचा भरपूर सांठा बँकेजवळ होतो त्या वेळीं ती आपला दर उतरविते.

देशांतील बँकांना ज्या मध्यवर्ती बँकेकडून कर्जाचा अथवा पैशाचा पुरवठा होत असतो त्या मध्यवर्ती बँकेकडून जो व्याजाचा दर आकारला जाईल त्यापेक्षां केव्हांही कांहींतरी जास्त व्याजाच्या दरानें आकारणी करून ह्या इतर बँका आपापल्या क्षेत्रांत कर्जाऊ रकमा देणार. म्हणून ज्या ज्या वेळीं मध्यवर्ती बँक आपला दर वाढवितें त्या त्या वेळीं देशांत इतरत्र कर्जाऊ मिळणाऱ्या रकमेस द्यावे लागणाऱ्या व्याजाच्या दरांत त्या त्या प्रमाणांत वाढ होत असतें. त्यामुळें मध्यवर्ती बँकेनें हा दर फार व वेळोवेळीं वाढविणें जसें सर्वस्वी इष्ट होणार नाहीं तसेंच कांहीं वेळीं तिला तो वाढवूं देणेंही देशाच्या एकंदर आर्थिक स्थैर्याला आवश्यक असतें; आणि म्हणूनच ही महत्त्वाची सत्ता मध्यवर्ती केंद्रित अशा जबाबदार संस्थेकडे (मध्यवर्ती बँक) सोंपविलेली असते.

ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंटः—१ एप्रील १९३५ रोजीं बँकेनें हें एक खातें उघडलें. अशा तऱ्हेनें खातें उघडून त्यामार्फत शेतकीशीं संलग्न असणाऱ्या अर्थशास्त्रीय, व्यापारविषयक आणि बँकिंगचे प्रश्नांचें

निरीक्षण, अभ्यास आणि ऊहापोह करण्याबाबत कायद्यानें बँकेवर जबाबदारी टाकली आहे. म्हणून ॲग्रिकल्चरल क्रेडीटसंबंधीं सर्व साधकबाधक प्रश्नांचा अभ्यास करण्याकरितां निष्णात नोकरवर्ग ठेवून, अशा अभ्यासूचें सहकार्य व सल्लामसलत सरकार आणि बँका यांना केव्हांही मिळूं शकेल अशी व्यवस्था बँकेनें केली आहे. तसेंच प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक्स् व शेतकीला भांडवल अथवा कर्जाचे रूपानें पैसा पुरविणाऱ्या इतर व्यक्ति अथवा संस्था यांचे व बँकेचे हितसंबंध आणि परस्पर कामगिरी यांचा मेळ घालण्याची कामगिरीहि या खात्यानें करावयाची आहे.

या खात्यानें आतांपर्यंत सहकारी चळवळीबाबत चार रिव्ह्यूज् प्रसिद्ध केले असून त्यांतील अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेला चौथा रिव्ह्यू १९४८-५० अखेर मुदतीचा आहे. त्यांत एक उत्कृष्ट नकाशा दिला असून त्यावरून सहकारी चळवळीची प्रगती किती व कशी झाली आहे हें चटकन् समजूं शकतें. पतपेढया, अर्बन, सेंट्रल व प्रॉव्हीन्शियल को-ऑपरेटिव्ह बँका व इतर नॉन-क्रेडीट सोसायट्या यांच्या प्रगति बाबत आकडेवारीनें उत्कृष्ट माहिती दिली आहे. सेंट्रल बँकाना त्यांच्या भांडवल, रिझर्व्ह फंड, डिपॉझिटस्, संशयित-कर्ज व व्यापारोपयोगी कामगिरी यासंबंधीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेंच या चळवळीला रीझर्व्ह बँकेकडून होऊं शकणाऱ्या आर्थिक मदतीबाबत व सहकारी क्षेत्रांतील कामगारांच्या शैक्षणिक गरजा पुरविण्याबाबत निश्चित अशा सूचनाही केल्या आहेत. अशा तऱ्हेची अभ्यासूवृत्तीनें गोळा केलेली माहिती उपलब्ध करून देण्यांत बँकेच्या या खात्यानें खरोखरच प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

बहुतेक राष्ट्रांतून बँकिंगची उभारणी एखाद्या पिरॅमिडसारखी आंखण्यांत आली आहे व त्याच धर्तीवर हिंदुस्थानांतही रचना करण्यांत आली आहे. पायांत हजारों गणती इंडिजीनस बँकर्स (सावकार), सहकारी पतपेढ्या, त्यांवर समाईक भांडवलाच्या व सहकारी बँका आणि सर्वांत वर रिझर्व्ह बँक अशी ही मांडणी आहे.

——

बँकांचें नियंत्रण

बँका समाजांतील शिल्लकसंचय एकत्रित करून त्या संचयाचा राष्ट्राची उत्पादनशक्ति व व्यापार वाढविण्याच्या कामीं खेळतें भांडवल म्हणून उपयोग करण्याची सुसंधी व्यक्तींना प्राप्त करून देतात. अशा तऱ्हेनें बँका राष्ट्राची संपत्ति व उत्पन्न वाढविण्यास महत्त्वाचा हातभार लावीत असतात. देशाची औद्योगिक प्रगति ही बँकांच्या कार्यपद्धतीवर व कुशलतेवर अवलंबून असते. औद्योगिक समाजाची आर्थिक व्यवस्थाही बँकाशी निगडित झालेली असते. कारण हल्लीची आर्थिक व्यवस्था ही पतीवर (क्रेडिट) आधारलेली आहे, व ही पत निर्माण करण्याचे व पुरविण्याचें बहुमोल कार्य बँका करितात. जगांतील जवळजवळ सर्व महत्त्वाचे उद्योगधंद हें बँकांनीं दिलेल्या कर्जावरच चालविले जात आहेत. तेव्हां समाजाचे आर्थिक जिवितच बँकांच्या हातीं असतें. अशा तऱ्हेनें राष्ट्राच्या आर्थिक जीवनांत व व्यवस्थेंत बँकांना महत्त्वाचें व जबाबदारीचें स्थान मिळालें असल्यामुळें त्या एक प्रकारानें सार्वजनिक संस्थाच (पब्लिक युटिलिटी कन्सर्न्स) बनलेल्या आहेत. अर्थात् बाकीच्या अशा संस्थांप्रमाणेंच बँकावरही खास निर्बंध असणें व सरकारनें त्यांच्यावर नियंत्रण व देखरेख ठेवणें हें अत्यावश्यक आहे. अशा प्रकारची विचारसरणी समाजाला पटत चालली असून तिचें अवलंबनही जगांतील बहुतेक सर्व देशांत होत आहे.

बँकांच्या व्यवहारांत व कारभारांत जास्तींत जास्त पद्धतशीरपणा, चोखपणा व सुरक्षितता निर्माण करण्याकरितांही नियंत्रणाची जरूरी आहे. बँकांची सांपत्तिक स्थिति चांगली असणें व तशी ती कायम राहणें हें राष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें आवश्यक आहे. बँकांचा कारभारही कुशलतेनें व धडाडीनें चालविला गेला पाहिजे. गैरशिस्त, अव्यवस्थित व अनिष्ट कार-

भार व कार्यपद्धत मर्यादित व जमल्यास नष्ट करण्याच्या कामीं नियंत्रणाचा खासच उपयोग होऊं शकतो.

वरील विचारसरणी ही सर्वमान्य झालेली नाहीं. कांहींच्या मतें बँक-नियंत्रणाच्या केवळ कायद्यांनीं अव्यवस्थित कारभार, नुकसानी व अनर्थ टाळतां येणार नाहींत. उलट असे कायदे जास्तच गोंधळ निर्माण करतील व बँकांना परिस्थितीनुरूप आपोआप बदल वा सुधारणा करणे अशक्य होईल. अशा कायद्याचा दुष्परिणाम व निरर्थकता दर्शविण्याकरितां ते नेहमीं अमेरिकेचे उदाहरण पुढे मांडीत असतात. "बँका व बँकर्स हे कायद्यांनीं निर्माण करतां येत नाहींत." ह्या प्रख्यात सूत्राचा पाठपुरावा नियंत्रण विरोधक करीत असतात.

भारतांतही बँकांवरील नियंत्रणाची वाढ वरील दोन परस्परविरोधी विचारसरणींमधूनच झालेली आहे. भारतीय बँकनियंत्रणाचा इतिहास त्या दृष्टीनें अतिशय मनोरंजक व मार्गदर्शक असा आहे.

सन १९३६ पर्यंत हिंदुस्थानांत बँकांसंबंधीं वेगळा कायदा वा कलमें अस्तित्वांत नव्हतीं. बँकिंग कंपन्या १९३६ पर्यंत १९१३ च्या हिंदी कंपनी कायद्याखालीं इतर सर्वसाधारण कंपन्यांप्रमाणेंच नियंत्रित केल्या जात असत. म्हणजे बँकिंग कंपन्या व इतर कंपन्या यांमध्यें कोणत्याही प्रकारचा फरक केला गेला नव्हता. कंपनी कायद्याचीं कांहीं मोजकीं कलमें बँकिंग कंपन्यांना विशेष लागू होतीं. परंतु या कायद्यानें बँकांचें व त्यांच्या व्यवहारांचें नियंत्रण केलें जात नसे. वार्षिक ताळेबंद व सहामाही कामकाजपत्रके कशीं तयार करावीत यासंबंधीच फक्त या कायद्यांत विशेष तजवीज करण्यांत आली होती.

अशा परिस्थितींत १९१३ ते १९१७ या कालांत बँकांवर अरिष्ट कोसळलें. या काळांत सुमारे दोन कोटि रुपये भरणा केलेल्या भांडवलाच्या ८७ बँका बुडाल्या. त्यामुळें ठेवीदारांचें फार मोठें नुकसान होऊन बँकां-

वरील जनतेचा विश्वास उडाला. यानंतर थोडासा विश्वास उत्पन्न होऊन बँका सुरळीत चालूं लागतात न लागतात तोंच १९२३ च्या एप्रिलमध्यें अलायन्स बँक ऑफ सिमला हिनें दिवाळें पुकारलें.

या वारंवार घडणाऱ्या आपत्तींचा विचार करण्याकरितां व बँकांची सुदृढ वाढ व प्रगति कशी करतां येईल यासंबंधीं सूचना देण्याकरितां सेंट्रल बँकिंग एन्कायरी कमिटीची १९३० मध्यें योजना करण्यांत आली. १९३१ मध्यें या कमिटीनें या प्रश्नांचा विचार करून व साक्षी घेऊन बँकिंग कंपन्यांसंबंधींच्या नियंत्रणाचा एक मसुदा तयार केला. १९१३च्या कंपनी कायद्यांत असलेल्या तरतुदींसह खास बँकांविषयक कायदा पास करण्याची शिफारस कमिटीनें केली व तो परदेशी बँकांनाही लागू करावा असें सुचविलें. शिवाय या स्वतंत्र कायद्यांत संघटना, कारभार, हिशेब–तपासणी व देखरेख आणि कारभार गुंडाळणें व बँकिंग कंपन्यांचें एकीकरण या बाबींसंबंधीं अधिक तरतुदीचा समावेश करावा असेंही सुचविण्यांत आलें. परदेशस्थ तज्ञांचींही मतें सरकारनें मागविलीं. परंतु या कमिटीच्या शिफारसींविरुद्ध चालू कंपनी कायद्याच्या तरतुदींमध्यें सुधारणा करूनही बँकाचें नियंत्रण करतां येईल असें त्यांचें मत पडलें.

परदेशी तज्ज्ञांचें मत ग्राह्य धरून १९३६ मध्यें हिंदुस्थान सरकारनें बँकिंग कंपन्यांसंबंधीं कांहीं खास तरतुदी १९३६ च्या कंपनी–कायदा सुधारणा बिलांत समाविष्ट करण्याचें ठरविलें. हें बिल 'इंडियन कंपनीज (अमेंडमेंट) ॲक्ट, १९३६' या नांवानें पास करण्यांत आलें. या कायद्यानुसार २७७ एफ् ते २७७ एन् हीं कलमें १९१३ च्या कंपनी कायद्याला जोडण्यांत आलीं. सरकारनें अशा तऱ्हेनें खास बँकांसंबंधीं कायदा करण्याचें टाळून सेंट्रल बँकिंग एन्कायरी कमिटीच्या शिफारशीला कलाटणी दिली. वेगळा कायदा करण्यास फार विलंब लागेल अशी सबब सरकारनें पुढें केली. शिवाय मध्यंतरीच्या १९३४ च्या रिझर्व्ह बँक–

कायद्याखालीं महत्त्वाच्या व मुख्य बँकांचें नियंत्रण सुरू झालें होतेंच. यामुळें वेगळ्या कायद्याची आवश्यकता त्यावेळीं सरकारला वाटली नाहीं. मात्र या सुधारणा–कायद्यांतील कलमें सेंट्रल बँकिंग एन्कायरी कमिटीनें सुचविलेल्या शिफारशींस अनुसरूनच तयार केलीं गेलीं.

या १९३६ च्या सुधारणा कायद्यांतील बँकिंग कंपन्यासंबंधीच्या तरतुदी अशा आहेत:—

(१) 'बँकिंग कंपनीची' व्याख्या प्रथमच बनविण्यांत आली.

(२) बँकिंग कंपन्यांचे व्यवहार हे कलम २७७ एफ्‌मध्यें निर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण बँकिंग कामकाजांपुरते मर्यादित करण्यांत आले. जानेवारी १९३७ नंतर अस्तित्वांत येणाऱ्या प्रत्येक बँकिंग कंपनीच्या मेमोरँडममध्यें ते असलेच पाहिजेत व त्याशिवाय अशी कंपनी रजिस्टर केली जाणार नाहीं असें स्पष्ट करण्यांत आलें. म्हणजे जवळजवळ बँकिंग कंपन्यांच्या मेमोरँडममधील उद्देशकलम निश्चित करण्यांत आलें.

(३) मॅनेजिंग एजंटची यापुढील काळांत नेमणूक करण्यांस बँकिंग कंपन्यांना मनाई करण्यांत आली.

(४) खपलेल्या शेअरांवरील भरणा झालेली रक्कम म्हणून रु. ५०,००० रोख जमा झाल्याखेरीज बँकिंग कंपन्यांना कामकाज सुरू करण्यांस बंदी घालण्यांत आली.

(५) बँकिंग कंपनीचें भरणा न केलेलें भांडवल कर्जास तारण म्हणून देण्यास मनाई करण्यांत आली.

(६) प्रत्येक बँकिंग कंपनीला रिझर्व्ह फंड ठेवणें सक्तीचें करण्यांत आलें. दरसाल नफ्यांतून कमीत कमी २० टक्के रक्कम रिझर्व्ह फंडांत जमा करून रिझर्व्ह फंड भरणा केलेल्या भांडवलाच्या बरोबरीएवढा करावा अशी तरतूद करण्यांत आली.

(७) प्रत्येक बँकिंग कंपनीनें मुदतीच्या ठेवींच्या १॥ टक्के व चालू

खात्यावरील व चचतींच्या ठेवींच्या ५ टक्के इतकी कमींत कमी रक्कम रोखींत ठेवली पाहिजे.

(८) कांहीं विशिष्ट बँकविषयक कामांकरितां स्थापन केलेल्या दुय्यम कंपनीशिवाय (सब्सिडरी कंपनी) इतर दुय्यम कंपन्या उभारणें वा त्यांत भाग घेणें हें बँकिंग कंपनीला मना करण्यांत आलें.

(९) तात्पुरत्या आर्थिक संकटांत सांपडलेल्या बँकिंग कंपन्यांना व्यवहार स्थगित करण्याची तात्पुरती परवानगी (मोरॅटोरियम) देण्याचा व त्यांचेवर हुकूमनाम्याची कांहीं काळ बजावणी होऊं नये अशी ताकीद देण्याचा अधिकार कोर्टांना प्राप्त झाला.

या सुधारणा—कायद्यांतील कलमें ज्या हेतूनें करण्यांत आलीं होतीं तो बँकांच्या नियंत्रणाचा हेतु मात्र साधला नाहीं. वेगळ्या कायद्याची आवश्यकता जास्तच भासूं लागली. 'बँकिंग' च्या व्याख्येंत येणाऱ्या अशा पुष्कळ संस्थांनीं स्वतःला 'बँका' म्हणवून घेतलें; पण या कायद्याच्या तरतुदी पाळण्यास नकार दिला. व्याख्येंतील 'मुख्य उद्योग' या शब्दांचा श्लेष काढून पळवाट काढण्यांत आली. शिवाय कित्येक बँकांचें अगदीं तुटपुंजें भांडवल असून त्यांच्या एकूण ठेवींमध्यें मुदतीच्या ठेवींचा प्रामुख्यानें भरणा होता व रोख पैसा व सरकारी कर्जरोखे यासारखी ताबडतोब पैशांत रूपांतरित होणारी जिंदगी (लिक्विड अॅसेटस्) मात्र अपुरी होती. या परिस्थितींत अशा बँका बुडण्याचा व त्यामुळें देशाच्या पतीच्या डोलाऱ्यास (क्रेडिट स्ट्रक्चर) धक्का बसण्याचा फार मोठा संभव होता. त्याशिवाय अनेक लहानमोठ्या बँका स्थापन होत होत्या, व शाखांचें जाळेंही दूरवर पसरत होतें. बँका बुडण्याचे प्रसंगही वारंवार येत असत. १९२२ ते १९३९ पर्यंतच्या काळांत एकूण ४४७ लहानमोठ्या बँका बुडाल्या. त्यांचें एकूण भरणा केलेलें भांडवल ८ कोटींचें होतें. वर उल्लेखिलेल्या अलायन्स बँकेशिवाय १९३२ त पीपल्स बँक ऑफ नार्दर्न

इंडिया ही मोठी बँक बुडाली. १९३६ चा सुधारणा–कायदा होऊनही व रिझर्व्ह बँकेची १९३५ त मध्यवर्ती बँक व बँकांची बँक म्हणून स्थापना झाल्यावरही १९३८ त त्रावणकोर नॅशनल व क्विलॉन बँक ही ७७ शाखा असलेली मोठी बँक बुडालीच. यांतूनच दक्षिण भारतांतील बँकांवर अरिष्ट कोसळलें.

या बँक–अनर्थामुळें लोकांनीं बँकांवर जास्त कडक नियंत्रण असावें अशी ओरड सुरू केली. या लोकमतास मान देऊन रिझर्व्ह बँकेनें १९३९ मध्यें एका बिलाचा मसुदा तयार करून सरकारला सादर केला. परंतु युद्धजन्य परिस्थितीमुळें हें बिल १९४४ पर्यंत मध्यवर्ती असेंब्लीमध्यें विचारार्थ मांडतांच आलें नाहीं. नंतरही असेंब्लीची नवीन निवडणूक, सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट, हिंदी स्वातंत्र्य कायदा, फाळणी वगैरे राजकीय घडामोडींमुळें हें बिल पास होण्यास फार विलंब लागला. अखेर हें बिल "१९४९ चा बँकिंग कंपन्यांचा कायदा" या नांवानें १७ फेब्रुवारी १९४९ ला पास झालें. १० मार्चला गव्हर्नर–जनरलनीं त्या कायद्याला मान्यता दिली; व त्याच दिवशींच्या सरकारी गॅझेटमध्यें तें प्रसिद्ध करण्यांत आलें. १६ मार्च १९४९ पासून हा कायदा अखिल भारतास लागू करण्यात आला आहे.

१९१३ च्या कंपनी कायद्यामध्यें १९३६ च्या सुधारणा–कायद्यानें बँकिंग कंपन्यासंबंधीचा जो भाग जोडण्यांत आला होता तो भाग या १९४९ च्या कायद्यानें रद्द ठरविला गेला आहे. कारण त्या भागांतील कलमांचा नवीन कायद्यांत समावेश करण्यांत आला आहेच. या १९४९ च्या कायद्याचा हेतु बँकिंग कंपन्यांसंबंधीच्या वेळोवेळीं करण्यांत आलेल्या तरतुदी एकत्रित आणण्याचा व सुधारण्याचा असल्यानें या कायद्यानें जुने कायदे वा वटहुकूम रद्द केले आहेत; व सुधारणांसहित असा हा नवा एकत्रित कायदा तयार केला गेला आहे.

या १९४९च्या बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत एकूण ५५ कलमें आहेत. हा कायदा दोन कारणांकरितां केला आहे. एक म्हणजे ठेवीदारांचें हित साधणें व दुसरें म्हणजे देशाच्या आर्थिक भरभराटीकरितां व प्रगतीकरितां बँकांची देशव्यापी व भरभक्कम आर्थिक आधारावर उभारणी करणें हें होय. ठेवीदारांचें हित रक्षण करण्याकरितां रिझर्व्ह बँकेला महत्त्वाचे अधिकार व हक्क देण्यात आले आहेत. या कायद्यांतील एकूण ५५ कलमांपैकीं २७ कलमें या ना त्या तऱ्हेनें रिझर्व्ह बँकेला अधिकार वा हक्क मिळवून देतात किंवा तिला नवीन कर्तव्यें पार पाडण्यांस भाग पाडणारीं अशीं आहेत.

१९४९ च्या बँकिंग कंपन्यांच्या कायद्यामध्यें, १९३६ च्या कंपनी सुधारणा कायद्यांतील वर नमूद केलेल्या तरतुदींखेरीज, खालील महत्त्वाच्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत.

(१) 'बँकिंग' या व्यवसायाची सर्वव्यापी व्याख्या बनविण्यांत आली आहे. कर्ज देण्याकरितां किंवा पैसा गुंतविण्याकरितां जनतेकडून सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारणें हाच बँकांचा मुख्य धंदा ठरविण्यांत आला असून मागतांक्षणींच अथवा अन्य तऱ्हेनें आणि चेक, ड्राफ्ट वगैरे साधनांनीं परत करावयाच्या अथवा काढूं द्यावयाच्या अटीवर ठेवी स्वीकारणाऱ्या सर्व संस्था या कायद्याच्या व्याप्तींत आणिल्या आहेत.

(२) बिगर बँकिंग कंपन्यांना मागणी करितांक्षणींच परत कराव्या लागणाऱ्या ठेवी स्वीकारण्यास बंदी घालण्यांत आली आहे. (करंट व सेव्हिंग्ज खात्यावर घेण्यांत येणाऱ्या ठेवी.)

(३) बिगर बँकिंग कंपन्यांना 'बँक' 'बँकर' किंवा 'बँकिंग' हे शब्द त्यांच्या नांवांत वापरण्यास बंदी करण्यांत आली आहे. तसेंच प्रत्येक बँकिंग कंपनीच्या नांवांत या शब्दांपैकीं एक तरी शब्द असलाच पाहिजे अशी सक्ति करण्यांत आली आहे.

(४) बँकिंग कंपन्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या व्यापारांत भाग घेण्यास (मालाच्या देवघेवीस) बंदी घालण्यांत आली आहे.

(५) बँकिंग कंपन्यांत मॅनेजिंग एजंट नेमतां येणार नाहीत. तसेंच कमिशनवर अथवा नफ्यांत हिस्सा देऊं करून व्यवस्थापक नोकरही नेमतां येणार नाहीं. तसेंच कोणाही पगारी व्यवस्थापकाची (मॅनेजिंग डायरेक्टर) नेमणूक एका वेळीं ५ वर्षांहून जास्त मुदतीची असूं शकणार नाहीं, व अशा मुदतीची वाढ करावयाची झाल्यास तीही एका वेळीं ५ वर्षांपेक्षां जास्त मुदतीची असूं शकणार नाहीं. याचप्रमाणें कारभाराबाबत दुसरी महत्त्वाची तरतूद म्हणजे एकाच इसमास एकांहून जास्त बँकांमध्यें संचालक (डायरेक्टर) म्हणून राहतां येणार नाहीं.

(६) प्रत्येक बँकिंग कंपनीचें तिच्या कार्यव्याप्तीनुसार कमींत कमी भरणा केलेलें भांडवल व रिझर्व्ह फंड किती असावेत याबद्दल या कायद्यानें विशेष तरतूद केली आहे. मध्यंतरी ज्या कांहीं बँकांचा कारभार गुंडाळला गेला त्यांच्या तपासणींत असें दिसून आलें कीं, त्यांचा भांडवलनिधी अत्यंत कमी होता. १९३६ च्या सुधारणा-कायद्यांत केलेली रुपये५०,००० किमान भांडवलाची तरतुदही अपुरी पडते असें दिसून आल्यावरून या कायद्यांत विशेष दखलगिरी घेतली गेली आहे. मुंबई व कलकत्ता या शहरीं धंदा करणाऱ्या बँकेचें भरणा केलेलें भांडवल व गंगाजळी मिळून १० लाख रुपये पाहिजे. तसेच ही दोन शहरें सोडून इतरत्र कोणत्याही एकाहून जास्त प्रांतांत धंदा करणाऱ्या बँकेचें भरणा केलेलें भांडवल व गंगाजळी मिळून रुपये ५ लाखांचा निधी असावयास पाहिजे. तसेंच एकाच प्रांतात मुंबई व कलकत्ता सोडून अनेक ठिकाणीं धंदा करणाऱ्या बँकेचा हा निधी कमी प्रमाणांत परंतु निश्चित केला गेला आहे.

(७) १५ जानेवारी १९३७ नंतर स्थापन झालेल्या बँकिंग कंपन्यांचें

खपलेलें भांडवल हें अधिकृत भांडवलाच्या निम्याहून कमी असतां कामा नये, व भरणा केलेलें भांडवल हें खपलेल्या भांडवलाच्या निम्याहून कमी असतां कामा नये. शिवाय येथून पुढें अशा कंपन्यांचें सर्वच्या सर्व भांडवल फक्त ऑर्डिनरी शेअर्समध्येंच असलें पाहिजे.

वरील तरतुदीनें अधिकृत भांडवलाच्या खूप मोठ्या आंकड्यांवरून होणारी दिशाभूल थांबली जाईल ही फार महत्त्वाची बाब आहे. याच्याच जोडीला दुसरी अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे ती मतासंबंधी आहे. कांहीं थोड्या व्यक्तींत अथवा गटांत सपाटून मताचे अधिकार केंद्रीत करण्याच्या पूर्वीच्या अनिष्ट पद्धतीला पायबंद घालण्यांत आला आहे. कोणाही एका शेअर होल्डराचीं मतें, भरणा केलेल्या भांडवलांत त्याची जी जमा असेल, तिच्या प्रमाणांतच असतील व तीं मतें सर्व शेअरहोल्डरांच्या एकूण मतांच्या संख्येच्या ५ टक्क्यांहून जास्त अशीं कोणाही एकास असणार नाहींत.

(८) बँकिंग कंपन्यांकडून देण्यांत येणाऱ्या कर्जावर नियंत्रण करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला मिळाला आहे. रिझर्व्ह बँकेनें कर्जाबाबत पुरस्कारिलेल्या धोरणाचा अवलंब सर्व वा विशिष्ट बँकांनीं करावयाचा आहे. कोणत्या कार्याकरितां कर्ज द्यावयाचें, तारणावर दिलेल्या कर्जाबाबत किती मार्जिन ठेवावयाचें, कर्जावर आकारण्यांत येणाऱ्या व्याजाचे दर काय असावयाचे, याबाबत रिझर्व्ह बँकेला सर्व वा कांहीं विशिष्ट बँकांना हुकूमवजा सूचना देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. या तरतुदीमुळें रिझर्व्ह बँकेला देशांतील पतीचें नियंत्रण करणें व सट्टा अथवा वाढत्या किंमतींना आळा घालणें सुलभ होईल अशी अपेक्षा आहे.

(९) नवीन बँका स्थापन करण्यास, नवीन शाखा उघडण्यास, चालू शाखांमध्यें बदल करण्यास रिझर्व्ह बँकेची लेखी परवानगी आवश्यक करण्यांत आली आहे. एकूण ठेवींच्या निदान २० टक्के प्रमाणांत तरती जिंदगी प्रत्येक बँकेनें ठेवलीच पाहिजे असेंही एक नियंत्रण आहे.

तसचें कोणत्याही बँकेकडून माहिती–पत्रकें, दाखले मागाविण्याचा आणि हिशेब तपासण्याचा हक्क रिझर्व्ह बँकेला प्राप्त झाला आहे एकाद्या बँकिंग कंपनीचा व्यवहार ठेविदारांच्या हितसंबंधास बाद आणणारा होत आहे असें जर दिसून आलें तर मध्यवर्ती सरकार अशा कंपनीला नवीन टेवी घेण्यास मनाई करूं शकेल किंवा अशा बँकेचा कारभार गुंडाळला जाण्याबद्दल अर्ज करण्यास रिझर्व्ह बँकेला फर्मावील.

(१०) बँकिंग कंपनीचा कारभार सक्तीनें गुंडाळावा लागल्यावेळीं रिझर्व्ह बँक ऑफिशियल लिक्विडेटर म्हणून काम करूं शकेल; आणि स्वखुषीनें कारभार गुंडाळणें झाल्यास रिझर्व्ह बँकेची आगाऊ परवानगी घेणें जरूर आहे.

(११) हा कायदा लागू होण्याच्या सुमारास धंदा करीत असलेल्या प्रत्येक बँकिंग कंपनीनें आणि त्यानंतर बँकिंगचा धंदा करणाऱ्या अगर करण्याकरितां स्थापन होणाऱ्या प्रत्येक कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे लेखी अर्ज करून याबाबत परवाना (लायसेन्स) मिळविला पाहिजे; अशा तऱ्हेचा परवाना धारण केल्याखेरीज हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रांतांत बँकिंगचा धंदा एकाद्या कंपनीला करतां येणार नाहीं.

(१२) प्रत्येक बँकिंग कंपनीनें आपल्या एकूण ठेवींच्या ७५ टक्क्यापेक्षां कमी नाहीं इतकी जिंदगी हिंदुस्थानांतील प्रांतांतून राखली पाहिजे, असेंही एक कलम आहे.

या कलमाचा रोख विशेषतः परराष्ट्रीय एक्सचेंज बँकाबाबत आहे. कारण त्याही आतां या कायद्याच्या कक्षेत येतात. यामुळें या बँकांकडे असणाऱ्या हिंदी टेवींचा उपयोग परराष्ट्रीय व्यापार, उद्योगांना, पैसा पुरविण्याचें कामी होण्यास पायबंद बसेल अशी अपेक्षा आहे.

(१३) प्रायव्हेट जॉइंट स्टॉक कंपनीला कंपनी–कायद्यानें ज्या सवलती व जे हक्क दिलेले आहेत ते ती कंपनी जर बँकिंगचा व्यवसाय करणारी असेल तर तिला उपभोगतां येणार नाहींत असें या कायद्यानें ठरविण्यांत आलें आहे.

(१४) इंपिरिअल बँक ही १९२० च्या इंपिरिअल बँक कायद्यान्वयें कारभार करीत असते. परंतु तिलाही या नव्या कायद्याच्या कांहीं तरतुदी लागू करण्यांत आल्या आहेत.

कायद्याचे दोष म्हणून असें दाखविण्यांत येतें किंवा येईल कीं 'बँकिंग'ची व्याख्या ही फक्त कमर्शिअल बँकिंग कंपन्यांनाच सामाऊन घेते. खाजगी सराफी पेढ्या व सावकार यांतून वगळले जातात. यामुळें त्यांचे व्यवहार अनियंत्रितच राहतील. अर्थात् सावकारी नियंत्रण कायद्यानें कांहीं प्रांतांतून कांहीं प्रमाणांत नियंत्रण होत असलें तरी या कायद्यानें रिझर्व्ह बँकेला जे व ज्या उद्देशानें नियंत्रणाचे अधिकार देण्यांत आले आहेत ते खाजगी बँकर्सचें बाबतींत उपयोगितां येणार नाहींत. तसेंच कायद्याच्या कक्षेतून सहकारी बँका अलग केल्या गेल्या आहेत. या सर्वांवरून बँकिंगच्या नियंत्रणाचें केंद्रीकरण करण्याचा उद्देश पूर्णपणें साध्य होत नाहीं. असा हा बाहेर राहिलेला वर्गच खेडयापाडयांतील व लहानलहान गांवांतील धंद्यांना व व्यापाराला आर्थिक साहाय्य पुरवितो. शिवाय त्यांची व त्यांच्या व्यवहारांची संख्याही लहान नाहीं. म्हणून देशांतील पतींचें नियमन करणारी संस्था (कंट्रोलर ऑफ क्रेडिट) या नात्यानें रिझर्व्ह बँकेला आर्थिक अरिष्टें टाळणें दुरापास्त होईल असें वाटतें.

कांहीं अर्थवेत्यांच्या मतें हा कायदा पाहिजे तितका कडक नाहीं. उलट बँकिंग क्षेत्रांत वावरणाऱ्यांचें मत असें आहे कीं, हा कायदा किंवा त्यांतील कांहीं तरतुदी अतिशयच कडक आहेत. कित्येकजण असेंही म्हणतात कीं या कायद्यामुळें बँकांच्या प्रगतींत अडथळा येण्याचा संभव आहे. या कायद्यामागील हेतु उच्च व प्रशंसनीय असले तरी कायद्याची अंमलबजावणी कशी होते यावरच त्याचें यशापयश अवलंबून राहील. एवढें मात्र खरें कीं, रिझर्व्ह बँकेवर व देशांतील सर्व बँकिंग कंपन्यांवर या कायद्यानें बरीच मोठी जबाबदारी टाकली आहे.

परिशिष्ट १

रिझर्व्ह बँकेनें खालीं दिल्याप्रमाणें नमुन्याचा ताळेबंद दर आठवड्यास प्रसिद्ध करावयाचा असतो.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

ता. — रोजीं पुऱ्या होणाऱ्या आठवड्यांतील परिस्थिति–निदर्शक तक्ता.

इश्यु डिपार्टमेंट

देणीं		जिंदगी	
बँकिंग डिपार्टमेंटजवळ		अः—जवळ असलेलें सोनें–नाणीं व लगड	
असलेल्या नोटा	रु................	(अ) हिंदुस्थानांत	रु................
प्रचारांत असलेल्या नोटा	रु................	(ब) हिंदुस्थानाबाहेर	रु................
		परराष्ट्रीय सिक्युरिटीज्	रु................
एकूण काढलेल्या नोटा	रु................	वरील सर्वांची बेरीज	रु................
		बः—रुपये (नाणें.)	रु................
		हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्युरिटीज्	रु................
		बिल्स ऑफ एक्सचेंज व इतर व्यापारी क्रेडीटस्	रु................
		वरील सर्वांची बेरीज	रु................

अ जिंदगीच्या एकूण बेरजेचें देण्याशीं प्रमाण —— याप्रमाणें आहे.

बँकिंग डिपार्टमेंट

भांडवल (वसूल झालेलें)	रु................	नोटा	रु................
रिझर्व्ह फंड (गंगाजळी)	रु................	रुपये (नाणें.)	रु................
ठेवी:—		चिल्लर नाणें	रु................
अ—सरकारी:—		कसर घेऊन पटविलेल्या हुंडया (बिल्स डिस्काऊंडेड)	रु ....
(१) मध्यवर्ती सरकारच्या	रु................		
(२) राज्य सरकारच्या	रु................	(अ) देशांतील रु	
ब—बँकांच्या	रु................	(ब) परदेशांतील रु.......	
क—इतर	रु................	(क) सरकारी ट्रेझरी	
बिल्स पेयेबल (हुंडया)	रु................	बिल्स रु.......	
इतर देणीं	रु................	परदेशांत असलेल्या रोख शिलका व थोडया मुदतीचें कर्जरोखे	रु ....
		सरकारला दिलेलें कर्ज व ॲडव्हान्सेस	रु............
		इतरांना दिलेलें कर्ज व अडव्हान्सेस	रु............
		इन्व्हेस्टमेंटस्	रु............
		इतर जिंदगी	रु............
एकूण बेरीज	रु................	एकूण बेरीज	रु............

F
298